८०

# नवीं क्षितिजें नवी दृष्टि

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १२३९



REFBK-0010852

ग. वि. अकोलकर

सोनवणी

# नवीं क्षितिजें
# नवी दृष्टि

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ... वि: निबंध
क्रमांक 1238 नों: दि: 24/12/1980

ग. वि अकोलकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 10852

REFBK-0010852

सरस्वती प्रकाशन : पुणें

प्रकाशक :
सौ. सिंधु वझे,
सरस्वती प्रकाशन,
४१४ सदाशिव पेठ, पुणें २.

प्रथमावृत्ति : गणेशचतुर्थी, शके १८८२

मूल्य तीन रुपये फक्त

© सौ. इंदिरा अकोलकर

मुखपृष्ठ : पंडित सोनवणी

मुद्रक :
चिं. ग. वझे,
साधना प्रेस,
४३०-३१ शनिवार पेठ, पुणें २.

: ४ :
सरस्वती

चि. शशि व प्रकाश
नि विद्या व विनय
या नव्या पिढीच्या
प्र ति नि धीं स—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम .................. वि: ..........
क्रमांक .................. नों: दि: ..........

## प्रकाशाच्या वाटेवर....

'नवीं क्षितिजें-नवी दृष्टि' हा माझ्या गेल्या तीनचार वर्षांतील स्फुट लेखांचा संग्रह आहे. त्यांना मी 'शैक्षणिक ललित निबंध' असें नांव देऊं इच्छितों. सामान्यतः शिक्षणाचा विषय हा तात्त्विक, जड व रूक्ष अशी समजूत आहे. तसेंच तो खास तज्ज्ञांचा प्रांत असेंहि मानण्याची—व्यवहारांत नसली, तरी तत्त्वतः—प्रथा आहे. ह्या दोन्ही समजुती चुकीच्या आहेत, असें माझें मत आहे. शिक्षणाचा विषय सर्वांच्या जिव्हाळ्याचा असेल, तर त्यांना तो समजला पाहिजे व समजेल अशा तऱ्हेनें मांडला पाहिजे, ही ह्या लेखनामागची भूमिका आहे.

आपल्या सर्व जीवनाच्या अंगोपांगांत नवचैतन्य यावें असें सर्वांना वाटतें. शिक्षण त्याला अपवाद नाहीं. शिक्षणांतला महत्त्वाचा घटक म्हणजे 'विद्यार्थी'. त्याच्या वृत्ति व प्रवृत्ति, स्वभाव, गरजा व हालचाली यांच्याकडे बघण्याची **नवी दृष्टि** यावी, **नवी निष्ठा** निर्माण व्हावी, हा या लेखांचा हेतु. जीवनाचीं क्षितिजें विस्तारत असतांना जुनी दृष्टि, परंपरागत विचार-सरणी अपुरी पडते. ती समूळ टाकावी असें लेखकाचें म्हणणें नाहीं, तिचा विकास व्हावा, ही अपेक्षा आहे.

अभ्यासानुषंगिक (Co-curricular) या नात्यानें विद्यार्थ्यांच्या जीवनाचें जेवढें म्हणून क्षेत्र आहे, त्यांतील विविध प्रश्न यांत विवरलेले आढळतील. त्या प्रश्नांची चर्चा विद्यार्थ्यांच्या, शिक्षकांच्या पालकांच्या व मुख्यतः सामाजिक जीवनाच्या गरजा-अपेक्षें-ध्येयें यांच्या दृष्टिकोणांतून केली आहे. 'प्रगमनशील शिक्षण,' 'नवशिक्षण' वा 'नयी तालिम' या आधुनिक विचार-सरणींच्या परंपरेला धरून हें विवेचन केलेलें आहे, एवढें सांगितलें म्हणजे त्यांतील तात्त्विक बैठक विशद करायला नको. (१) लोकशाही जीवन हा सामाजिक जीवनाचा आदर्श, (२) त्यासाठीं व्यक्तिस्वातंत्र्याचा आदर, (३) व्यक्तीच्या विकासाला स्वातंत्र्य, (४) स्वातंत्र्य व प्रेम, सहकार्य व

सद्‌भाव यांवर आधारलेली कार्यपद्धति, ही चतुःसूत्री या नवशिक्षणाचा मूळ गाभा व आधार म्हणून सांगतां येईल.

ज्यांना केवळ तात्त्विक विचार करणें झेपत नाहीं असें नव्हे, तर रूचत वा आवडत नाहीं, अशा लोकांनाहि प्रचलित शैक्षणिक सुधारणांचें ध्येय व स्वरूप समजण्यास साहाय्य व्हावें, व निव्वळ तात्त्विक अभ्यास करणाऱ्या शिक्षण-शास्त्राच्या अभ्यासकांना एक साहाय्यक साधन-' कम्पॅनियन ' बुक–म्हणून या पुस्तकाच्या उपयोग व्हावा, अशी अपेक्षा आहे.

या पुस्तकाची मुद्रण प्रत तयार करण्याचे कामीं चि. सुधाकर पवार यानें आपुलकीनें खूपच परिश्रम घेतले. तसेंच श्री. देवीदास बागूल व श्री. रामचंद्र ढेरे यांनीं हस्तलिखित वाचून दिलेलें प्रोत्साहन व चि. शशिकान्त याचें मुद्रितें तपासतांना झालेलें चोखंदळ साहाय्य पुस्तकाच्या सौंदर्यांत सहभागी आहेत. मुखपृष्ठाचें काम श्री. पंडित सोनावणी यांनीं नेहमींप्रमाणें अतिशय तत्परतेनें व तन्मयतेनें केलें. या सर्व मित्र-सुहृदांच्या सौजन्याचा लाभ असाच होत राहो, एवढेंच म्हणतों. प्रकाशनाची जबाबदारी मोठ्या हौसेनें पत्करून प्रकाशन सर्वांगसुंदर करण्याच्या कामीं सरस्वती प्रकाशनच्या सौ. सिंधुताई वझे व माझे स्नेही श्री. चिं. ग. वझे यांनीं घेतलेल्या परिश्रमांच्या ऋणांतून मुक्तता होणें कठिणच ! शिक्षणप्रेमी रसिकांना पुस्तक आवडलें कीं मी कृतार्थ झालों.

नासिक
१२ एप्रिल
१९६०

ग. वि. अकोलकर

## अनुक्रम

● ● ● ● ● ● ● ●


१ एक कैफियत

२ स्वातंत्र्य-लढयांतील वानरसेना......

३ बालवीर चळवळ

४ नवमहाराष्ट्राचा शक्तिस्त्रोत १ , २

५ रिकामे हात

६ छंद-मंडळें

७ ओसाड पडलेलीं क्रीडांगणें......१, २, ३

८ विद्यार्थी आणि रंगभूमि......१, २

९ ते सप्ताह, त्या मिरवणुका......

१० गणराया, पालकांना सुबुद्धि दे !

११ मानव तितुका एकच आहे

१२ विद्यार्थ्यांच्या रंगीत चष्म्यांतून

१३ भीष्म-द्रोणांचे नवे अवतार

१४ सोवळे पालक आणि ओवळे शिक्षक

१५ विविध परीक्षांचा हव्यास

१६ मार्गदर्शक पुस्तकांवरील अनाठायीं अनुराग

१७ स्वस्तिवाचन पुरें !

★

## लेखकाचीं अन्य पुस्तकें

१ : रशियांतील विद्यामंदिर ( अनुवादित )

२ : मादाम मेरी क्यूरी

३ : वाढतं क्षितिज

४ : अमृत-तुषार

५ : लोकशाही आणि शिक्षण ( अनुवादित )

आगामी

६ : शिक्षणाचीं मूलतत्त्वें व शैक्षणिक मानसशास्त्र

७ : शैक्षणिक तत्त्वज्ञानाची रूपरेषा

( प्रा. ना. वि. पाटणकर यांच्या समवेत )

८ : मराठीचें अध्यापन

९ : शालेय व्यवस्था

१० : नवशिक्षण : प्रवाह आणि प्रवृत्ति

★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ....................
क्रमांक ........................ नों: दि: ..................
दा. क्र. 10542

# एक कैफियत

अमुक एका गांवीं गेलें कीं अमुक ठिकाणें पाहावयाचीं, अमुक जागीं गेलें कीं अमुक खाद्यपेयांचा समाचार घ्यावयाचा, त्याप्रमाणें अमुक माणसें भेटलीं कीं अमुक विषयावर गप्पा मारायच्या, हें जणुं ठरल्यासारखेंच आहे. व्यापारी भेटला कीं त्याला म्हणायचें : ‘ काय शेटजी, काय भाव वाढवून ठेवले आहेत तुम्हीं ? ’ तसेंच, शिक्षक भेटला कीं, ‘ काय गुरुजी, काय प्रयोग चालवले आहेत तुम्हीं ? काय नवीं खुळें आणतां आहांत ! ’ हें म्हणायचें, असा सामान्य जनांचा जणुं शिरस्ताच झाला आहे. व्यापारी जरा व्यवहारी असतो; तो एखाद्या ‘ देशमुखांकडे ’, एखाद्या ‘ कृष्णम्माचारी ’कडे किंवा दुसऱ्या एखाद्या अर्थमंत्र्याकडे बोट दाखवून आपली जबाबदारी झटकून मोकळा होतो. शिक्षकाला मात्र असें उपरणें झटकून मोकळें होतां येत नाहीं. राष्ट्राच्या पुनर्रचनेंत आपला वांटा आहे, असें त्याला वाटत असतें. करावयाच्या प्रयोगाबद्दल त्याला श्रद्धा बाळगावी लागते आणि म्हणून तो जरा गंभीर चेहरा करून किंवा चेहऱ्यावर उसनें हंसू आणून वेळ निभावून नेतो. ‘ तुमचा होतो प्रयोग, पण आमच्या पोरांचा जातो जीव ! सगळ्या शिक्षणाचा नुसता खेळ-खंडोबा चालवलाय ! ’ असा शेवटीं पालक स्वतः शेर होऊन शेरा देतच असतात. जरा शाब्दिक कोटी करून या पालकांना खिजवायचें असेल तर असें म्हणतां येईल कीं, ‘ अहो, खेळ ही बालकांची जीवन-प्रवृत्ति आहे, त्यांचा तो स्वभावच आहे आणि खंडोबा हें तर आपलें दैवत आहे ना ? ’

खरें असें आहे कीं, इतर सर्व सुधारणांप्रमाणेंच शिक्षण-क्षेत्रांतल्या सुधारणांनाहि सामान्य जनांचा–पालकांचा विरोध आहे. येथेंहि त्यांची वादाची पद्धति तीच आहे. 'आमच्या वाडवडिलांची पद्धति काय वाईट होती ? त्यांना काय अक्कल नव्हती ?' तर्खडकरांचीं भाषांतरें घोकणें हा इंग्रजी शिकण्याचा ज्ञानमार्ग, रूपावलि घोकणें हा संस्कृतवर स्वामित्व मिळवण्याचा भक्तिमार्ग, छडीच्या छम छम आवाजांत शिस्तीचें बाळकडू पाजणें हा कर्ममार्ग–अशी त्यांची निष्ठा आहे. हा मनुष्यस्वभाव आहे. जें चालत आलेलें, स्थिर झालेलें असेल त्याला चिकटून राहणें, यांत त्याला सुरक्षितता वाटते. जुनी चाकोरी व नवें वातावरण यांत त्याला विसंगति दिसत नाहीं. गादी-तक्क्याच्या बैठकीला धोतर चालत असे, यंत्रांचीं चाकें जिथें फिरतात, तिथें तें धोक्याचें असतें, हें सामान्य माणसाच्या चटकन् लक्षांत येत नाहीं. तसेंच, बदलत्या राजवटीबरोबर शिक्षण बदलावें लागतें, हें परंपरेचा आग्रह धरणाऱ्याला सहज उमगत नाहीं. नव्या शास्त्रीय शोधांमुळें कामाच्या पद्धति बदलाव्या लागतात, हें त्याला चटकन् आकलन होत नाहीं. उलट, समंजस मनुष्य पूर्वजांना व त्यांच्या चालीरीतींना दोष देत नाहीं, पण परिस्थितीमुळें त्यांत निर्माण झालेल्या उणीवा त्याला दिसतात. उणीवांमुळें झालेलें नुकसानहि त्याच्या लक्षांत येतें. पण तो खेद करीत नाहीं, तो केशवसुतांप्रमाणें म्हणतो—

'आम्ही नव्हतों अमुचे बाप
उगाच कां मग पश्चात्ताप ?'

आपल्या शिक्षण-पद्धतींत पुनःपुन्हां जे बदल होऊं पाहत आहेत, त्यासाठीं आपली तयारी हवी. आपण त्यांचें स्वागत करायला हवें. बरोबर वीस वर्षांपूर्वीं कॉंग्रेस मंत्रिमंडळें अस्तित्वांत आलीं आणि शैक्षणिक सुधारणांची मुहूर्तमेढ त्यांनीं रोवली. जरा मागें फिरून पाहिलें आणि या सुधारणांचें वरवर मूल्यमापन केलें तरी त्या सुधारणांना आज आपण कुधारणा तरी खास म्हणणार नाहीं. वर्धाशिक्षणानें किंवा मूलोद्योगी शिक्षणानें शिक्षण आणि उद्योग यांचा सांधा जोडण्याचा प्रयोग केला. त्यांतलीं मूलतत्त्वें पाश्चिमात्य शिक्षणतज्ज्ञांच्या विचारसरणीशीं मिळतीं-जुळतींच आहेत. आणि या शिक्षण-पद्धतीचा विकास परदेशांत जाऊन आलेल्या शिक्षणतज्ज्ञांनींच केला आहे.

पण तिच्यामागें कांहीं राष्ट्रीय तत्त्वज्ञान आहे, तिला मानसशास्त्राचा आधार आहे, हें कितीकांनीं समजून घेण्याचा साधा प्रयत्न तरी केला आहे? कमरेभोंवतीं हातभर कपडा गुंडाळणाऱ्या एका फकिराकडे तिचें जनकत्व जातें, म्हणूनच पूर्वग्रहानें तिचा तिरस्कार करायचा असेल तर गोष्ट वेगळी! सामान्य मनुष्याला प्रयोगाचीं फळें 'पी हळद, हो गोरी' अशा घाईनें हवीं असतात. शिक्षणांतलीं फळें कलमी आंब्यांप्रमाणें पुढल्या पिढ्यांनीं चाखायचीं असतात. गणित, भूगोल, शास्त्र हे विषय मातृभाषेंतून शिकवायला सुरुवात झाली, विद्यार्थ्यांना या विषयांचें आकलन चांगलें होऊं लागलें, यांत वाईट काय झालें? इंग्रजीशिवाय अनेक जण मॅट्रिक झाले, पोटा-पाण्याला लागले, यांतहि दूषणास्पद काय आहे?

शिक्षणपरिवर्तनाच्या टीकाकारांचा वर्ग मध्यम-वर्गीयांचा आहे. त्याची दृष्टि संकुचित आहे. 'माझी बायको, माझीं मुलें' हा त्याच्या विचाराचा परिघ आहे. खालच्या थरांतील गिरि-कंदरांतील असंख्य जनतेचें त्याला भान नाहीं; तिच्या गरजांची जाणीव नाहीं. त्यामुळें त्यांच्या सुधारणांचा केंद्रबिंदु त्याचें स्वतःचें घर आहे, समाजांतील थर नाहीं. इंग्रजी माध्यम गेलें, आमचें इंग्रजी कच्चें पडलें, नि म्हणून वरिष्ठ नोकऱ्या-चाकऱ्यांत आम्ही मागें पडलों, ही त्याची पोटदुखी आहे. मग त्याला राजनीतिज्ञ येऊन सांगतात: 'बाबा, हा लोकशाहीचा जमाना आहे. ही विराट जनता लोकशाहीची स्वामिनी आहे. तिला सुबुद्ध करणें आमचें पहिलें कर्तव्य आहे. तिला समजेल अशा भाषेंतच शिक्षण द्यायला हवें. जें मिळेल, तें सर्वांना सारखें द्यायचें आहे. तुझा मुलगा हुशार आहे, त्याचीहि राष्ट्राला गरज आहे. त्याला थोडें वेगळें शिक्षण मिळालें तर त्याचा फायदा होईल ना? मग तूर्त तेवढी व्यवस्था तूंच करायला हवी. तुला अधिक फायदा हवा, मग जरा अधिक कष्ट व त्याग कर ना!'

राजनीतिज्ञांच्या वरील युक्तिवादांतील खाचाखोचा आतांच तपासण्याची गरज नाहीं. गेल्या वीस वर्षांत इतर राष्ट्रांनीं काय केलें, याचें जरा प्रथम अवलोकन करूं या. जगांतलें सर्वांत पुराण-प्रेमी राष्ट्र म्हणून इंग्लंडची ख्याति आहे. पण दुसऱ्या महायुद्धाच्या धाऊ-गर्दींतहि त्यानें आपली शिक्षणपद्धति तपासून १९४४ मध्यें नवा शिक्षणविषयक कायदा पार्लमेंट-

करवीं मंजूर केला. रशिया तर बोलून चालून क्रान्तिवादी राष्ट्र. त्यांच्याकडे शिक्षणाच्या क्षेत्रांतहि पंचवार्षिक, सप्तवार्षिक योजना मूर्त स्वरूप धारण करीत आहेत. अमेरिका हें तर सुधारणेचें माहेरघरच. अनेक शैक्षणिक तत्त्वांची ती प्रयोगशाळा आहे. प्रयोगाशिवाय पुढें जातां येत नाहीं, ही पाश्चिमात्यांची दृष्टि आहे. भारताला प्रयोगशीलतेचें महत्त्व जाणून घेतलें पाहिजे. नव्या काळाला अनुरूप बदल आपल्या राहणींत व विचारसरणींत झालेच पाहिजेत, हें आतां कळायलाच हवें. 'कायदा पाळा गतीचा—थांबला तो संपला'—हा हिंदपुत्रांना कवीनें दिलेला संदेश जीवनाच्या इतर क्षेत्रांप्रमाणें शिक्षणक्षेत्रालाहि लागू नाहीं काय? शिक्षण हें समाजजीवनाचेंच अंग आहे ना? सारें समाजजीवन घुसळून, ढवळून निघत असतां, शिक्षणाची चाकोरी बदलूं नये, हें म्हणणें वेडेपणाचें नाहीं का ठरणार? वस्तूंच्या उत्पादनाच्या पद्धतींत बदल होत आहेत, शास्त्रीय ज्ञानाची गरज वाढत आहे, वाहतुकीचीं, दळण-वळणाचीं साधनें नवीं येत आहेत, मोटारी-रेडिओ सभोंवतीं पिंगा घालीत आहेत, तांत्रिक शिक्षणाची गरज निर्माण झाली आहे, आर्थिक जमाना बदलत आहे, सहकारी तत्त्वावर पतपेढ्या नि कार्पोरेशन्स निघत आहेत, वीज घराघरांतून नळाच्या पाण्याप्रमाणें धांवत आहे, तिला कामाला जुंपायचें आहे, भूमीच्या पोटांत लपलेली किती तरी संपत्ति हुडकून काढून तिचा उपयोग करायचा आहे—जीवनाचा एवढा पसारा वाढला, तरी शिक्षणानें मात्र तपोवनांतल्या साधूप्रमाणें डोळे मिटून जुन्या मंत्रांचा जप करावा, असें कुणी म्हणेल, तर त्याच्या अज्ञानाची कींव करण्यापलीकडे जाणकार काय करणार?

मतस्वातंत्र्य म्हणजे शहाणपणाचा मक्ता नव्हे, हें नवोदित लोकशाहींत आपल्याला शिकायचें आहे. तज्ज्ञांच्या दृष्टीचा पल्ला जरा लांबवर असतो, जरा विशाल दृष्टिकोनानें, जरा सखोलतेनें ते विचार करतात, यावर आमचा विश्वास हवा. त्यांच्या प्रयोगाला कांहीं शास्त्रीय भूमिका असते, यावर थोडी श्रद्धा हवी. तेहि देशभक्त आहेत, अशी सहानुभूति हवी. ही दृष्टि बाळगली नाहीं, तर त्यांचें म्हणणें आम्हांला समजायचें नाहीं. कारण दृष्टिकोण बदलला कीं भाषा एक असली तरी ती परस्परांना कळेनाशी होते.

* * *

# स्वातंत्र्य-लढ्यांतील वानर-सेना
# ‘ नारायण-सेना ’ ठरणार नाहीं काय ?

‘ एकच गोष्ट पण कधीं ती वरदान तर कधीं ती शाप कशी होऊं शकते, त्याचें हें उत्तम उदाहरण आहे. ’ ते गृहस्थ चिंतातुर चेहऱ्यानें बोलत होते.

‘ कोणतं ? ’ मीं त्यांचा बोलण्याचा संदर्भ नीटसा न लागल्यानें विचारलें.

‘ आमची ही वानर सेना—स्वातंत्र्याच्या आंदोलनांत आम्ही ही भुतावळ उठवली. आतां ती आमच्या मानगुटीला बसत आहे, विद्यार्थ्यांना, युवकांना आम्ही त्यावेळीं हाताशीं धरलं; समाजांत हा एकच वर्ग असा असतो कीं ज्याला ‘ आगापिछा ’ नसतो. साहसासाठीं रक्त सळसळत असतं, उत्साहानं जीवन ओसंडत असतं. तेव्हां खळबळ माजवायला तो मोठा उपयोगी पडतो.——पण हें बेटं दुधारी शस्त्र आहे. ’

‘ कसं काय बुवा ? ’ त्यांचं म्हणणं लक्षांत येत असूनहि मीं वेड पांघरून विचारलं.

‘ कसं काय म्हणजे ? ही बातमी तुम्हीं वाचली का ? विद्यार्थ्यांनीं परीक्षेच्या वर्गांत संप केला आहे. ही दुसरी, विद्यार्थ्यांनीं प्रिन्सिपलच्या खोलीला वेढा दिला आहे ! ही काय शिस्त झाली ? ही तिसरी बातमी, विद्यार्थ्यांनीं कशावरून तरी वसतिगृहांच्या चालकांशीं बिनसलं म्हणून अन्न-सत्याग्रह सुरू केला आहे. आमचींच शस्त्रं आमच्यावर ते उलटवीत आहेत.’ याच सुरांत, चढत्या आवाजांत पण ‘ पश्चात्ताप-दग्ध ’ वृत्तीनें ते बराच वेळ

बोलत होते. ती वेळ वाद घालण्याची नव्हती. जाईल तेवढी वाफ जाऊं द्यायला हवी होती.

* * *

विद्यार्थ्यांच्या बेशिस्तीबद्दल जेव्हां जेव्हां विषय निघतो, तिची कारण-मीमांसा केली जाते, तेव्हां तेव्हां वरील गृहस्थांचाच दृष्टिकोण या ना त्या शब्दांत कधीं क्षमायाचनेच्या सुरांत तर कधीं निर्भीड व निःपक्षपाती टीकेच्या आवेशानें मांडला जातो. मला मात्र या दोन्ही दृष्टी तितक्याशा बरोबर वाटत नाहींत. खरं म्हणजे मुळींच बरोबर वाटत नाहींत. याचं कारण असें कीं, या आंदोलनाच्या निमित्तानें आम्ही जी गोष्ट साधून बसलों आहों, मिळवून बसलों आहोंत, तिचा आम्हांला विसर पडत आहे. असंख्य वालुकाकणांतील एक परीस आमच्या हातीं आला आहे. आणि तें लक्षांत न घेऊन आम्ही तो फेकून देण्याच्या विचारांत आहोंत. तो परीस म्हणजे विद्यार्थ्यांतील जागृति. त्यांच्यांतील थंडावलेला चेतनेचा स्फुल्लिंग फुलवला गेला आहे. चेतनेच्या अभावीं मनुष्यदेह मातीचा गोळा होऊन पडतो. स्वातंत्र्यासाठीं हालचाल न करणाऱ्या आमच्या देशाला हीच उपमा लोकमान्यांनीं दिली होती. चैतन्याचें वारें देशांत खेळावें म्हणून अनेक वीरांना आपल्या प्राणाशीं व मृत्यूशीं खेळ करावा लागला. समाजाची, राष्ट्राची झोंप म्हणजे कुंभकर्णाची झोंप असते. सुदैवानें ती उडाली आहे. समाजांतली नवी पिढी—बालकांची, युवकांची—सचेतन झाली आहे, जागृत झाली आहे. तिच्यांतील उत्साहाचा ‘ स्फुल्लिंग ’ फुलवला गेला आहे. रामदासांनीं नव्हता का एकाकाळीं टाहो फोडला—‘ वन्ही तो चेतवावा रे ’ आणि पाश्चात्य देशांतहि बालकांमधला ‘ वन्हि ’ चेतविण्यासाठीं एका महापुरुषानें कोण महान् प्रयत्न केले ? त्या महापुरुषाचें नांव आहे लॉर्ड बेडेन पॉवेल अथवा ‘ बी. पी. ’ आमच्या देशांत, परकीय राजवटींत त्यांतला निखारा इकडे आणण्याचा प्रयत्न झाला. पण येईपर्यंत तो बराचसा काजळून गेला होता. स्वातंत्र्याच्या आंदोलनाच्या निमित्तानें यज्ञार्थ जसा अग्नि फुलवावा, तसा घर्षणांतून तो आयताच आतां निर्माण झाला आहे. त्याचा ‘ वणवा ’ होऊं द्यायचा कीं त्याचें हजारों ज्योतींनीं झगमगणाऱ्या सुबक, रंगीबेरंगी झुंबरांत रूपान्तर करावयाचें हें आमच्यावर अवलंबून आहे. आकाशांतून कोसळणारा ‘ जीवनप्रवाह ’ हा

शिवमस्तकांतून निघालेली मांगल्याची गंगा ठरावी व पूर्वजांचाहि उद्धार तिनें घडवून आणावा यासाठीं भगीरथ प्रयत्न करावे लागतात. ‘ शक्ति, ’ ती कोणतीहि असो, तिचें मंगलांत रूपांतर व्हायला मानवी प्रयत्नाची व प्रतिभेची तिला जोड लागते. व्यक्ति-जीवनाचें संकुचित क्षेत्र ओलांडून समुदायाच्या समाजाच्या हिताचा विचार आपण करूं लागलों कीं शक्तीला विधायक वळण आपोआप मिळूं लागतें.

*　　　*　　　*

हेमकूट पर्वतावरील मारीचाच्या आश्रमांत दुष्यंतानें पाऊल टाकलें तेव्हां त्याला एक रोमहर्षक दृश्य पाहावयास सांपडलें. एक पांच वर्षांचा बालक एका सिंहाच्या छाव्याशीं मस्ती करीत होता आणि म्हणत होता, ‘ बच्चमजी, जरा आ करा, मला तुमचे दांत मोजूं द्या. ’ दुष्यंताच्या तोंडून उद्‌गार बाहेर पडला, ‘ महतस्तेजसो बीजं बालोऽयं प्रतिभाति मे । स्फुलिंगावस्थया वन्हिः एधापेक्ष इव स्थितः । ’ सर्वच बालकांमधील कमी अधिक दुर्दमनीय उत्साह पाहिला म्हणजे मला या उक्तीची आठवण होते. परिस्थितींतून योग्य इंधन मिळालें, तर स्फुल्लिंगाचा अग्नि होईल, असें मला वाटतें. पण आम्ही त्या स्फुल्लिंगाला उत्साहाची फुंकर घालून फुलविण्याऐवजीं विझवण्याच्याच मागें असतों. अग्नि घरें जाळतो म्हणून तो स्वयंपाकाला नसला तरी चालेल असें म्हणण्यापैकींच हें नाहीं का?

*　　　*　　　*

पण पाश्चात्य देशांतले लोक याहि बाबतींत भारतांतल्यापेक्षां अधिक शहाणे, अधिक समंजस ठरले आहेत. विद्यार्थीदशेंत बालकांनीं सुस्त रहावें, सुखानें झोंप घ्यावी व युवावस्थेची सीमा ओलांडतांना डोळे चोळीत जागें होऊन स्वदेश, समाज, लोकशाही, नागरिक कर्तव्यें यांचा विचार करूं लागावा—हें त्यांना अपरिहार्य वाटतें. मनुष्य-स्वभावाशीं विसंगत वाटतें. बालकांनीं क्रियाशून्य व प्रौढांनीं क्रियाशील असावें, ही ‘ दुटप्पी ’ वृत्ति आहे, ‘ वदतो व्याघात ’हि आहे. खरी गोष्ट अशी आहे कीं, बालकांना, युवकांना ‘ क्रियाशून्य ’ राहतां येत नाहीं, तो त्यांचा ‘ स्वभाव ’ नाहीं, त्यांची ती प्रकृति नाहीं. आणि धडपड करण्याची ‘ प्रकृति ’ प्रौढांनीं कितीहि नको म्हटलें तरी

त्यांना ‘ कर्मणि ’ नियोजित करते. अशा वेळीं प्रौढांची जबाबदारी असते कीं, ‘ विकर्म ’ व ‘ सकर्म ’ यांची निवड करायला त्यांना शिकविणें व सुकर्मीं त्यांची ‘ रति घडो ’ म्हणून मार्गदर्शन करणें. पाश्चात्य शिक्षणतज्ज्ञांनीं, बाल मानस-शास्त्रज्ञांनीं जर कोणती गोष्ट ओळखली असेल तर ती हीच Activity can be used as a tool of education. बालकें व युवक-युवती कृतिप्रिय असतात व कृतिशील असतात, तशींच तीं समाजप्रिय असतात व समाजशील असतात आणि एकाहून अधिक बालकें एकत्र आलीं कीं उत्साहाला उधाण येतें. असा मुलांचा गट, संघ तयार झाला तर त्याला वळण कसें लावावयाचें याचें एक शास्त्र तयार झालें आहे. इंग्लंड-अमेरिकेंत—‘बालवीर’ चळवळीच्या रूपानें तर रशियांत ‘ कोमसोमल व पायोनिअर ’ चळवळीच्या रूपानें तें आकार घेत आहे. विद्यार्थ्यांचीं लहान लहान मंडळें स्थापून त्यांच्या कृति-शीलतेला वाव देऊन लोकशाही वृत्ति व नेतृत्व यांचा अनुभव व संस्कार त्यांना लाभवून देणाऱ्या व त्यांचें निरीक्षण करणाऱ्या संस्था ( अमेरिकन असोसिएशन् फॉर द स्टडी ऑफ ग्रूप वर्क ) अमेरिकेंत निघत आहेत. कुठें त्याला 4 H–Club चळवळीचें स्वरूप येऊन ग्रामीण जीवनाच्या समस्या सोडवण्यासाठीं त्यांचा उपयोग करून घेण्यांत येत आहे. शक्ति निर्माण करावयाची व तिचा विधायक मार्गानें उपयोग करावयाचा यांत माणसाची मर्दुमकी आहे व माणुसकीहि आहे.

आणि म्हणूनच मीं आरंभीं म्हटलें कीं, युवकांच्या जागृत शक्तीला एकेकाळीं वरदान मानणाऱ्या पण आतां शाप समजणाऱ्या गृहस्थांचा दृष्टि-कोन मुळींच बरोबर नाहीं. मानवशक्ति म्हणजे कांहीं जड निर्जीव लोखंडी शस्त्र नव्हे कीं हवें तेव्हां तें ‘ म्यान ’ करावें, आमच्या देशांत ही शक्ति जागृत झाली हें चिरंतन वरदानच मानायला हवें. पण तसें तें प्रत्यक्षांत ठरायला त्या शक्तीला तसें वळण लावणारें ‘ नेतृत्व ’ हवें, संधि हवी. बालवीर चळवळ ( बॉय स्काऊट व गर्ल गाइड ), ए. सी. सी. पथकें, त्यांचीं शिबिरें, त्यांच्या सभा, त्यांचीं श्रमदानें, युवक क्रीडामंडळें व युवक-नाट्य-मंडळें व त्यांचे महोत्सव ह्या साऱ्या गोष्टी त्यासाठींच आहेत. बाल-वीर चळवळ बालमानसशास्त्रावरच आधारलेली आहे. कौमार्य व यौवन अवस्थेंतील भटकेगिरीची आवड, जिज्ञासुवृत्ति, साहसाची आकांक्षा,

प्रतीकांचें प्रेम, स्वप्नरंजनाची मोहिनी, विभूति-पूजेचें वेड या आणि इतर वैयक्तिक व सामाजिक अशा मनाच्या ज्या भुका आहेत, त्यांची तृप्ति करण्याची गुरुकिल्ली त्यांत आहे. बाल व प्रौढ विद्यार्थ्यांच्या जीवनाला त्यांच्या व्यक्तित्वाला सुंदर घाट येण्यासाठीं अशा चळवळींची नितांत आवश्यकता आहे. हा विधायक कार्यक्रम आपण हातीं घेतला तर आजची 'वानर-सेना' खरी 'नर' सेनाच नव्हे, तर 'नारायण' सेनाहि ठरेल. 'अणोरणीयान्' असा व्यक्ति-जीवनांतून फुलणारा, प्रकटणारा स्फुल्लिंग 'महतो महीयान्' अशा मानवजातीच्या मांगल्यासाठीं कसा उपयोगांत आणतां येईल हें बघणें ही अणुयुगांत वावरणाऱ्या प्रत्येकाची जबाबदारी आहे.

* * *

# बालवीर चळवळीचें हृद्गत

आपल्याकडे अशी एक म्हण आहे कीं, ‘ रिकामा न्हावी व भिंतीला तुंबड्या लावी.’ पण याच अर्थाची इंग्रजी म्हण अधिक विचारपूर्ण आहे. तिचा अर्थ आहे कीं, रिकामें डोकें म्हणजे सैतानाचा कारखाना. दोन्ही म्हणींचा रोख आहे तो निरुद्योगीपणांतून सुचणाऱ्या चाळ्यांवर.

पण या निरुद्योगीपणाची मिरासदारी कांहीं केवळ प्रौढांचीच नाहीं. उलट ती बालकांची जास्त आहे. प्रौढांच्या निरुद्योगीपणाचें पर्यवसान कलागती लावण्यांत, याची टोपी त्याच्या डोक्यावर ठेवण्यांत आणि व्यसनाधीनतेंत होतें. मवालीपणाचें स्वरूप त्याला आलें नाहीं तर सामाजिक हानीपेक्षां व्यक्तिगत हानीच त्यांतून अधिक होते; उलट विद्यार्थ्यांच्या जीवनांतील निरुद्योगीपणांतून खोड्या, खट्याळपणा निर्माण होतो. आणि त्याला सामुदायिक स्वरूप असल्यानें तो आवरणें कठिण होतें. मुलांना कह्यांत ठेवतां ठेवतां जीव कसा रंजीस येतो, मेटाकुटीस येतो; याचा अनुभव मातांना व शिक्षकांना काय कमी आहे ? आणि यावर ‘ तोडगा, ’ शोधण्याचे प्रयत्न अनादि कालापासून सुरू आहेत ! ‘ बडगा ’ हा एक ‘ तोडगा, ’ पण तो निष्फळ झाला आहे. एखाद्या मंत्राचें सामर्थ्य लोपावें, तसें त्याचें सामर्थ्य लोपलें आहे, नष्ट झालें आहे !

कुठल्याशा बालकांच्या कथासंग्रहांत एका राक्षसाची गोष्ट आहे. त्या राक्षसाची नेहमीं एक मागणी असते, ‘ मला काम हवें नाहींतर मी तुला खाईन ! ’ माणसांच्या पुढें असाच एक राक्षस सदैव उभा असतो. त्याचें नांव ‘ काळ ’ ! या काळाला वेळेवर जर आम्हीं नीट अडकवून ठेवलें तर ठीक, नाहीं तर तो आम्हांला ‘ खायला ’ उठतो. वडिलधाऱ्या माणसांना बालकेंहि

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ............... वि: ............
क्रमांक ........................ नों: दि: ............


याच दृष्टीनें ' कर्दनकाळ ' वाटतात. त्यांना नीट अडकवून ठेवलें तर ठीक, नाहींतर तीं घर डोक्यावर घेतील, शाळेचा मासळीबाजार बनवतील, अगदीं सळो कीं पळो करतील! बालकें आणि त्यांच्यांतील अनिवार उत्साह म्हणजे ' मला काम द्या, नाहींतर खाईन, ' असं म्हणणाऱ्या राक्षसाचा एक अवतारच आहे. या राक्षसांना गप्प बसविणारा मांत्रिक जगाला हवा होता. आणि तो मिळाला लॉर्ड बेडेन पॉवेल यांच्या रूपानें, पण त्यांच्या मंत्राचा अभ्यास जसा व्हावा तसा अजून आपल्याकडे होत नाहीं.

बाल्य, कौमार्य आणि यौवन वा पौगण्ड अवस्थांतील व्यक्तीच्या गरजा कोणत्या? भरपूर खेळ, भरपूर काम, परस्परांशीं मिसळण्याची संधि, स्वतःचे गुण, शक्ति प्रकट करायला अवसर, दुसऱ्यावर छाप पाडायला, त्याच्याकडून वाहवा मिळवायला कांहीं उपक्रम, त्यासाठीं साहसाचीं कामें हवींत; कर्तृत्वक्षेत्र हवें. सामुदायिक रीतीनें कांहीं गोष्टी करणें, त्यांतून नकळत स्नेह संपादणें व सहकार्य शिकणें ही या अवस्थेंतील गरज आहे. स्नेहाच्या पोटीं निष्ठा येते. नेतृत्वाच्या व अनुयायित्वाच्या वृत्ति सामुदायिक जीवनांतील कामांत नेहमींच प्रकट होतात, जोपासल्या जातात. मानसशास्त्रज्ञ म्हणतात, मानवाचा व्यक्तिगत विकास मानवजातीच्या विकासक्रमाप्रमाणें होत असतो. मानव आद्यावस्थेंत जंगलांत हिंडत होता, गुहेंत राहत होता, शिकार करीत होता, पानांनीं शरीर भूषित करीत होता, कळप करून भटकत होता. ठराविक ' संकेता 'च्या डरकाळ्या फोडीत होता. आपली भाषा गुप्त ठेवीत होता. विचारांना ' प्रतीका 'चीं रूपें देत होता. मुलांच्या विकासांत आजहि या अनुभव-परंपरेची गरज त्यांना भासते. निसर्गाकडे त्यांचा ओढा असतो. पाना-फुलांचा त्यांना मोह पडतो, धांवणें, लपणें, शिकारी वृत्तींनें भटकणें यांत त्यांना मौज वाटते. सांकेतिक भाषा, सांकेतिक लिपी, यांचा ते आश्रय करतात. म्होरक्या निवडायचा, कळपानें त्याच्या आज्ञा पाळायच्या, खऱ्या खोट्या संकटांशीं मुकाबला करायचा व शक्तीचा प्रत्यय मिळवावयाचा; हें त्यांच्या खेळाचें स्वरूप आहे. अविकसित मानवांतील व्याघ्र-वृत्ति, वृकवृत्ति, गृध्रवृत्ति, विहंगमवृत्ति यांचा कुठें तरी उपशम व्हावयास हवा. या साऱ्या कृतींतून जीवनाला आवश्यक असें कितीतरी ज्ञान, कितीतरी कौशल्य मुलें आत्मसात् करतात.

लॉर्ड बेडेन पॉवेल यांनीं आफ्रिकेच्या जंगलांतील झुलू जमातीचें जीवन म्हणजे आदर्श बालवीर जीवन म्हटलें आहे. मला वाटतें, गोकुळांतल्या, व्रजांतल्या कृष्णाचें जीवन हें त्या काळांतलें आदर्श बालवीर-जीवन होतें. सकाळींच खिल्लारें घेऊन रानांत जावें; 'खगाचिया साउलिच्याच संगें' धांवावें, बांसरीच्या मंजुळ सुरानें सर्वांना मोहवावें, लपंडाव खेळावा, पानाफुलांचे हार गळां घालावेत, मोरपिसांचा मुकुट घालावा, विविध रूपें घ्यावींत, नटावें वा नाटक करावें, काव्यांतली मस्त धुंदी नि आनंद गिरिनिर्झरांच्या सांगातीं अनुभवावा, हें बाळ-कृष्णाचें भाग्य होतें. मराठ्यांच्या काळांत 'छोटे', 'छोटे' सरदार, शिलेदार सह्याद्रीच्या पठारावर आणि कुशींत याच वृत्तीचा कमीअधिक अनुभव घेत होते. शरीर निकोप बनवीत होते. मन अधिक कणखर करीत होते. रानावनांतील वाटा नि वनस्पति न्याहाळीत होते. संकटांशीं सामना देऊन साहसवृत्ति वाढवीत होते; पण तो मनु पालटला आहे. शहरी जीवनांत या गोष्टींना फार कमी वाव आहे. त्याची पूर्णता व्हायला हवी आहे. बालवीर संघटना त्यासाठीं आहे.

विद्यार्थ्यांच्या या भ्रमणशील नि साहसप्रिय वृत्तीला वाव मिळेल, जिज्ञासेला खाद्य मिळेल, स्वयंसेवेंतून स्वावलंबन निर्माण होईल, सामुदायिक जीवनांतून सामाजिक घटक निर्माण होतील. सृजनशक्तीला वाट मिळून कलावंत तयार होतील, असें कोठें तरी वातावरण हवें होतें, संघटना हवी होती. लॉर्ड बेडेन पॉवेल यांनीं ती निर्माण करण्याचें श्रेय घेतलें. तिचें नांव 'बालवीर चळवळ'. बालवीर चळवळ शाळेच्या चार भिंतींत मिळणाऱ्या शिक्षणाला पूर्णता देण्यासाठीं आहे; शहरी शालेय जीवनाला कृत्रिमतेच्या बंधनांतून मुक्त करून निसर्गाच्या सान्निध्यांत विद्यार्थ्याला घेऊन जाण्यासाठीं आहे. मोकळ्या हवेंत, विशुद्ध वनराईंत, छोट्या छोट्या संघांत स्वावलंबी वृत्तीनें कसें जगावें, डोळे, कान उघडे ठेवून भोंवतालच्या जगाचें निरीक्षण कसें करावें, निसर्गाचा परिचय कसा करून घ्यावा, 'प्रतिपन्नवस्तुषु निर्वाह' कसा करावा, हातीं असलेल्या शिदोरीचा, कोंड्याचा मांडा कसा बनवावा, अडचणींत हातीं येईल त्यावर वेळ कशी भागवावी इत्यादि गोष्टी शिकवून शारीरिक व बौद्धिक–भावनात्मक व सृजनात्मक विकास कसा साधेल याकडे ती लक्ष देते. प्रौढांच्या जगांत बालकांना स्थान नाहीं. तीं नकोशीं

होतात. त्यांच्या जिज्ञासेकडे लक्ष द्यायला कोणाला वेळ नाहीं. त्यांच्याकरितां क्रीडांगणें कोणी देत नाहीं, साधनें पुरवीत नाहीं; पण मुलांचीं मनें तर नवनव्या अनुभवासाठीं ह्याच वेळीं उत्सुक असतात. बालवीर चळवळ मुलांना एक वेगळें जग कृतीसाठीं निर्माण करून देते. त्यांत त्यांच्या निरीक्षण-शक्तीचा, भाषणशक्तीचा, कलात्मक अंगांचा विकास घडवून आणूं पाहते. स्वच्छतेच्या, आरोग्याच्या, नियमितपणाच्या संवयींवर भर देते. आज्ञापालनावर व स्वावलंबी वृत्तीवर कटाक्ष ठेवते. नेतृत्वाचें व अनुयायित्वाचें शिक्षण देते. बालकांचा शारीरिक, बौद्धिक, नैतिक विकास साधूं पाहते. त्यांचें शील व चारित्र्य घडवणें हें तिचें ध्येय. मुलें जशीं मोठीं होतील तसतसें त्यांनीं विविध कौशल्यें संपादावींत याकडे ती तत्परतेनें पाहते. सुतार, लोहार, चांभार, लेखक, वाचक, विक्रेता, एंजिनीअर, डॉक्टर इ. हजारों व्यवसायांतील प्राथमिक कौशल्यें विद्यार्थ्यांनीं आत्मसात् करावींत, प्रावीण्य-पदकें मिळवावींत व आत्मविश्वासानें जीवनाच्या क्षेत्रांत पाऊल टाकावें म्हणून आकांक्षा बाळगते.

* * *

# रिकामे हात

'सुटी म्हणजे सुटका '–कुठल्याशा प्रश्नपत्रिकेंत निबंधासाठीं विषय होता. तो वाचून मला खूप आनंद झाला. परीक्षक मोठे रसिक गृहस्थ असावेत, असा मीं मनाशीं अंदाज बांधला. जीवनांत कामाइतकेंच, कष्टाइतकेंच विश्रांतीला महत्त्व आहे, याची त्यांना जाणीव होती, हें स्पष्टपणें दिसत होतें. माणसानें सदैव घाण्याच्या बैलासारखें स्वतःला कामाला जुंपून घेऊं नये, जरा त्या कामांतून डोकें वर काढावें, आजूबाजूला बघावें, आणि बघण्यासारख्या अनेक गोष्टींतलें सौंदर्य लुटावें, आनंद घ्यावा, ही त्यांची सौंदर्यवृत्ति त्यांत अभिप्रेत होती, असें मला वाटलें. ' जीवनांत सदैव विवंचना नि चिन्ताच असतील, जरा विसावून इकडे तिकडे बघायला फुरसद नसेल तर या जीवनाला अर्थ तरी काय '–या अर्थाची पूर्वीं वाचलेली एक इंग्रजी कविताहि माझ्या ओठांवर घरंगळूं लागली. आणि ' शिष्टागमनेऽनध्यायः ' म्हणून उत्फुल्लपणें आपल्या सहपाठ्यांना सुटीची ' नोटीस ' फिरवीत हिंडणारा व ' अनध्यायमहोत्सव ' साजरा करूं इच्छिणारा भवभूतीचा एक बटु ' सौधातकि ' माझ्या डोळ्यासमोर उभा राहिला.

सुटीची कल्पनाच मोठी रोमहर्षक आहे यांत शंका नाहीं. आणि प्रत्यक्ष सुटीपेक्षां तिच्या आगमनाचे विचारच अधिक उत्साहप्रद असतात व सुटी मिळणार, सुटी येणार–अशी खात्री वाटूं लागली, ती दृष्टीच्या टप्प्यांत आली, किंवा वरिष्ठाच्या हुकुमाच्या रूपानें आटोक्यांत आली कीं हातांतलीं कामें कशीं झपाझप उरकलीं जाऊं लागतात. शर्यतींत धांवणाऱ्या स्पर्धकाच्या दृष्टिपथांत त्याचा ' भोज्या ' आला म्हणजे जसें त्याला विशेष स्फुरण चढतें, तसेंच कांहींसें प्रत्येकाला अनुभवास येतें. हातांतलं काम संपत आल्याचा तो

आनंद असतो, कीं आगामी, अननुभूत काळासंबंधीं जीं मनोराज्यें रचलीं जात असतात, त्यांचा तो आनंद असतो हें सांगणें मात्र कठिण आहे. कारण सुटीची कल्पना ही अनेक मनोराज्यांना जन्म देत असते. विविध मनोरथांत आरूढ होऊन माणसाचें मन गगनाला प्रदक्षिणा घालून येत असतें. खिशांत किती ' नये पैसे , आहेत याची तमा न बाळगतां अनेक आमोद-प्रमोदांचा आस्वाद मन घेत असतें. अजिंठा-वेरूळच्या सहलीसाठीं ' दत्तदिगंबर ' कंपनीमध्यें नांव नोंदवतें. काश्मीरच्या नंदनवनाचें नि आग्र्याच्या ताजमहालाचें दर्शन घेतें. एक ना दोन नानाविध बेतांत तें भोंवतालच्या जगाला विसरतें. सुटीची कल्पना एखाद्या मादक पेयाप्रमाणें गुंगी आणते, नशा चढविते आणि अचाट-अफाट कल्पना प्रसवीत राहते !

जीवनांत ' काम ' आणि ' आराम ' यांचा समतोल सांभाळण्याची नितान्त गरज आहे याबद्दल कुणाचेंच दुमत नाहीं. सुटी झाली तरी माणसें दुसरें काम करतातच, गाद्या-गिरद्यांवर कांहीं चोवीस तास लोळत नाहींत, हें सुटीविरोधकांचें म्हणणें मान्य केलें तरी सुटीची गरज ही असतेच. कामाकामांत फरक असतो. कांहीं लादलेलीं, सक्तीच्या खुशीचीं असतात, तर कांहीं स्वतःच्या निवडीचीं, मनाच्या निकडीचीं आणि म्हणून हृद्य, हृदयंगम असतात, हें विसरून कसें चालेल ? वर्षभर म्हणा, चारसहा महिने म्हणा चाकोरींतलीं कामें करीत असतांना मनाला हवीं हवीं असणारीं अशीं कितीतरी कामें अस्पृष्टांप्रमाणें उपेक्षित म्हणून दूर पडलेलीं असतात. व शेल्फमधलीं पुस्तकें आपल्या स्पर्शासाठीं व आपलें अंतरंग उघडून दाखविण्यासाठीं उत्सुक असतात. कुणाची बांसरी, कुणाचा दिलरुबा खुल्या दिलाचे पडदे खोलायला आतुर असतो, कुणाला नदी निमंत्रण करीत असते. कुणाला गिरिराजी साद घालते. कुणाला बुद्धिबळें आव्हान देतात, कुणाला बॅडमिंटन बोलावीत असतें. सामान्य संसारी माणसाच्या जीवनांतहि फुरसतीं-साठीं खोळंबलेली बारीक सारीक गोष्टींची गर्दीहि कांहीं कमी नसते. तेव्हां सुटीसाठीं हपापलेल्या माणसाला मला वाटतं दोष द्यायचं कांहींच कारण नाहीं.

——आणि तरीहि मला ' सुटी म्हटली कीं अंगावर कांटा येतो. ' सुटी म्हणजे मला एक गंभीर समस्या वाटते. भारतांत अनेक समस्या आहेत.

अन्नधान्यांची समस्या आहे, भूमिहीनांची समस्या आहे, शरणार्थींची समस्या आहे. माझ्या मतें विद्यार्थ्यांची सुटी ही एक अशीच 'रिकाम्या हातांची' नि रिकाम्या डोक्यांची समस्या आहे. ज्याला वेळ पुरत नाहीं, चोवीस तासांऐवजीं अठ्ठावीस तासाच्या दिवसांची आपलीं कामें उरकण्यासाठीं जे मागणी करतात ते अनेकांच्या दृष्टीनें 'दयापात्र' ठरतात हें मला माहीत आहे. पण त्याहिपेक्षां आपला वेळ कसा घालवावा हें ज्यांना समजत नाहीं, वेळ ज्यांना खायला उठतो, किंवा निरुद्योगीपणामुळें जे खायला काळ, नि भुईला भार ठरतात, त्यांचें जीवन मला दरिद्री, कळाहीन वाटतें. निरुद्योग हा एक शापच आहे. कारण मनाच्या शक्ति तो गंजवून टाकतो आणि स्वतःला व इतरांना रंजीस आणतो.

आजच्या यंत्रयुगीन अर्थव्यवस्थेनें 'फुरसतीसाठीं शिक्षण' ही एक नवीन बाब निर्माण केली आहे असें मानलें जातें. ज्या देशांत औद्योगिक विकास खूप झाला आहे तेथें त्याची तीव्रतेनें गरज भासत असणार हें उघड आहे. पण आपल्याकडे ज्या पद्धतीनें शाळा-कॉलेजें चालविलीं जातात, त्या पद्धतींतहि या फुरसतीच्या शिक्षणाच्या नियोजनाची निकड निर्माण झाली आहे. शाळा-कॉलेजांतील मुलें-मुली २ ते २॥ महिने आम्ही अक्षरशः वाऱ्यावर सोडून देत असतों, आणि तींहि आपलें वय, आपली जबाबदारी विसरून वारा प्यायलेल्या वासराप्रमाणें हुंदडत असतात. या सुटीचें नियोजन न केल्यानेंच व न झाल्यानेंच जीवनाविषयीं अनेक विकृत कल्पना आमच्या युवक-युवतींत शिरत आहे. जीवनाला कांहीं गंभीर बाजू आहे याची कल्पना नाहीं, उत्पादक श्रमाची व त्यासाठीं कराव्या लागणाऱ्या याता-यातीची जाणीव नाहीं, अध्ययनाच्या सखोलतेचा पत्ता नाहीं. एक फुल-पांखरी वृत्ति जीवनांत शिरत आहे. याची जबाबदारी पालक, शाळा व समाज या सर्वांवर सारखीच आहे. आपल्या पाल्यांना सुटीच्या दिवसांत घर-प्रपंचाच्या अनेक गोष्टींचें व परंपरागत व्यवसायांचें व कलांचें शिक्षण पालकांनीं देणें आवश्यक नाहीं काय? आपल्या पाल्यांच्या दैनंदिन रिकाम्या वेळाला योग्य वळण लावण्याची जबाबदारी पालकांची नव्हे काय? सुटींत परीक्षावयाच्या अभ्यासासाठीं नव्हे, पण आनंदोत्पादक कलांच्या अभ्यासासाठीं कामाची तरतूद करण्याची जबाबदारी शाळांनीं कां उचलूं नये? आणि

शाळांना अशीं ‘ सांस्कृतिक ’ कार्यें करायला अनुकूल भूमिका समाजानें निर्माण कां करून देऊं नये ?

सुट्यांचें व सुटीसाठीं असें नियोजन हवें, ही कल्पना कदाचित् कुणाला चमत्कीरक वाटेल. ‘ जीवन म्हणजे स्वच्छंदानें रमत-गमत करावयाची सहल ’ असें म्हणणारे कदाचित् या कल्पनेची टवाळी वा उपेक्षाहि करतील. पण या नियोजनांचें उद्दिष्ट लक्षांत घेणारा त्यांचें स्वागतच करील. या नियोजनांचा उद्देश ठिकठिकाणीं विश्रांतीसाठीं सुंदर हिरवळी, बागबगीचे व क्रीडाविहार निर्माण करण्याचा आहे. तशीं तीं झालीं म्हणजे नवीन पिढीनें खुशाल स्वच्छंदानें ‘ सैर ’ करावी. पण या नियोजनांच्या अभावीं सारें आसमंत कसें भकास, रुक्ष झालें आहे. जीवनवेलीला पुष्ट निहृष्ट करणारे सारे प्रवाह भूमिगत झाले आहेत. जीवनांत स्निग्धता, कोमलता, रसवत्ता येण्याऐवजीं खरखरीतपणा, खडबडीतपणा आला आहे. पराक्रमाची पाऊलवाट लोपली आहे. पुरुषार्थांची कला हरपली आहे. सुटीचा आनंद आणि लज्जत चाखायला जीवन समृद्ध करणाऱ्या अनेक गोष्टींत तल्लीन होण्याची युक्ति हस्तगत व्हायला हवी, त्यासाठीं तसें वातावरण हवें. असें वातावरण निर्मिणें हेंच या नियोजनांचें उद्दिष्ट. पण अशा वातावरणाच्या अभावीं, मार्गदर्शनाच्या अभावीं लक्षावधि हात रिकामे राहिले तर त्यांच्या वांट्यास वैफल्याखेरीज दुसरें काय येणार ?

* * *

# विद्यार्थ्यांचीं छंदमंडळें

मनुष्याला विश्रांती इतकेंच करमणुकीचें महत्त्व वाटतें, याबद्दल दुमत असावयाचें कारणच नाहीं. आपली करमणूक कोणत्या मार्गांनीं, कोणत्या साधनांनीं कोण कसा करून घेईल हें सांगणेंहि कठीण. ' भिन्न-रुचिर्हि लोकः ' हाच अनुभव याहि बाबतींत येईल, पुराण, कथा, कीर्तन, तमाशा आणि पोवाडा हे जुने मनोविनोदाचे सामाजिक प्रकार मागें पडले असतील. त्यांची जागा बोलपट-नाटकांनीं घेतली असेल एवढाच फरक. पण सामुदायिक, खर्चिक, व घाऊक करमणुकी सगळ्यांना नेहमी पेलतात व परवडतात असें नाहीं आणि त्यांना स्थलकालांचीं बंधनेंहि फार. कामाप्रमाणें करमणुकींतहि व्यक्तीला स्वातंत्र्य हवें असतें. खिशांत बाळगलेली कथा-कादंबरी किंवा कवितेची वही, किंवा पावा वा बाजा आणि कंठांत स्फुरणारें व ओठांवर तरंगणारें भावगीत या सामुग्रीवर जाऊं तेथें स्वतःची व इतरांची करमणुक करतां आली तर मनुष्याला ती हवी असते आणि ही गरज आजची नाहीं. स्वयंपाकघरांतलें काम आटोपून निवड-टिपण करायला बसणाऱ्या बायकांच्या बैठकी गाण्यांनीं रंगल्या आहेत, आजहि रेडिओवरचे महिला मंडळाचे कार्यक्रम सुरू झाले तरी त्यांत एकदोन भावगीतें वा एखादी लघुकथा असतेच. गुरुवारचें भजनीमंडळ वा शनिवारचें संगीतमंडळ सुशिक्षित, अशिक्षित सर्वच घरांत पाहायला सांपडतें. आणि त्यांत येणारा वर्ग डॉक्टर, वकील, शिक्षक तसा सुतार, लोहार वा अन्य कारागीरहि असतो. ' काव्यशास्त्र-विनोदेन ' काळ घालविण्याचा मक्ता कांहीं ' श्रीमंतां 'चाच नाहीं. ती साऱ्यांचीं गरज आहे. त्याचें सर्वांना महत्त्व वाटतें. प्रश्न असा आहे—या करमणुकींसाठीं मनोविनोदासाठीं ' कलावंतांचा ' पुरवठा कोठून होतो ? कोण करतो ?

या प्रश्नाचीं उत्तरें शोधणें जरा कठिण आहे. पण एक गोष्ट खरी कीं, खाजगी बैठकींत कलावंतांना तोटा नसे. बहुतेक ' स्वयंस्फूर्तीनें ' पुढें येत. उत्स्फूर्तपणाचा भाग त्यांत मोठा असे. अनेक उदयोन्मुख ' ताऱ्यांचें ' दर्शन घडे व शोध लागत. अनेक छोटे बालगंधर्व, पेंढारकर, भोंडे, लता मंगेशकर आणि आशा भोसले किंवा सैगल अशा बैठकींतून चमकतात, प्रकाशांत येतात. त्यांनीं स्वतःची तयारी कधीं, कुठें, कशी केली हें त्यांच्या मातापित्यांना तर माहीत नसतेंच, पण त्यांना स्वतःलाहि तें कितपत सांगतां येईल याची वानवाच. अंगचाच कांहीं गुण, उपजत कल आणि आवड यांचा योगायोगानें झालेला तो अर्धस्फुट विकास असतो. गुणग्राहकांना, रसिकांना मात्र वाटते कीं, या गुणांचा जरूर विकास व्हावा. आणि तो केवळ समाजाची एखादी गरज पुरवण्यासाठीं नव्हे तर त्या त्या बालकांच्या व्यक्तित्वाच्या संपूर्ण, मनोहर, आत्माविष्कारासाठीं. माणसाचें व्यक्तित्व अशा गुणांनीं समृद्ध होतें. म्हणून शैक्षणिकदृष्ट्या प्रश्न असा कीं, या असल्या गुणांचा विकास करण्याची जबाबदारी शाळांनीं उचलावी काय ? नव्हे, ती शिक्षणावर येऊन पडते काय ? कारण बोलून चालून गायन, अभिनय, नकला, लेखन या गोष्टी ज्याच्या त्याच्या छंदाच्या—त्या स्वच्छंदानें ( आणि लहरीनुसार ) घडावयाच्या. शाळेच्या साचेबंद कार्यक्रमांत त्या कशा येतील व का आणाव्यात ?

जोपर्यंत आमची शिक्षणपद्धति एकांगी होती, शैक्षणिक विचारसरणी एकांडी होती अथवा तिला मुळीं तात्त्विक अधिष्ठानच नव्हतें, तेव्हां या साऱ्या गोष्टी ' बाष्कळ ' आणि ' भाकड ' समजल्या जात. स्नेहसंमेलनाच्या निमित्तानें त्यांचें ' कौतुक ' होई. पण मर्यादित—शिष्ट माणसांनीं होलिकोत्सवांत भाग ज्या मर्यादेनें घ्यावयाचा, तशाच कांहींतरी भावनेनें, मुलांच्या अवखळपणाला थोडी शिष्टसंमत वाट म्हणून. कारण ' नट, विट, चेट ' यांच्याकडे बघण्याचा दृष्टीकोनच वेगळा होता. तेव्हां रिकामपणाच्या या कामगिऱ्यांना शाळेच्या गंभीर आणि बंदिस्त वातावरणांत वाव मिळाला, तो मागील दारानें, अवान्तर, 'एक्स्ट्रा' कार्यक्रम म्हणून !

पण आपल्या शिक्षणपद्धतींत बौद्धिक अंगाबरोबरच शारीरिक विकासाकडे लक्ष देण्याचा जमाना सुरू झाला आणि हळू हळू रिकामपणासाठीं शिक्षण देण्याची जबाबदारी शाळांनीं उचलावी असें ठरलें. त्यासाठीं

सामाजिक व सांस्कृतिक तासांची योजना आली. ज्या प्रवृत्ति, जे कार्यक्रम उपरे,–एक्स्ट्रा–होते ते पूरक, सहकारी (को-करिक्युलर) ठरले. पण कोणतीहि सुधारणा तिच्या मागील तात्त्विक भूमिका न समजतांच जर लादली गेली तर ती डोकेदुखी ठरते. या सामाजिक व सांस्कृतिक तासांच्या बाबतींत नेमकें हेंच घडलें आहे. आणि त्यामुळें त्या तासांची, शिक्षकांची व मुलांची सर्वांचीच परवड चालली आहे. ज्या सुधारणा व उपक्रम सुरू करावयाचे, त्यांचीं उद्दिष्टें, मार्ग व साधनें यांचें अज्ञान असल्यावर ते उपक्रम ओझें वाटलें तर नवल काय?

बदललेल्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीमुळें बालकांच्या चौरस विकासाची जबाबदारी शाळांना स्वीकारणें भाग झालें आहे. केवळ सामाजिक व आर्थिक परिस्थितीमुळेंच नव्हे तर शिक्षणाच्या बदललेल्या कल्पनेमुळेंहि. बालकांमधील सृजनशीलता, नवनिर्मिति, कल्पकता इत्यादि शक्तींच्या विकासावांचून त्यांचें संपूर्ण व्यक्तित्व विकसित होत नाहीं. हा नवा विचार आहे. या शक्ति विकसित करावयाच्या असतील तर बालकांना विविध निर्मायक उद्योग हवेत. त्यांतून त्यांच्या आंतरिक गुणांचा, आत्म्याचा आविष्कार व्हावा. भावनात्मक विकास व्हायला विविध कलांचा परिचय व कलांचें माध्यम हेंच उपयोगी पडणार आणि रसिकतेचें व अभिरुचीचें संवर्धन व संगोपन करावयाला दुसरा कोणता मार्ग आहे? आजच्या तांत्रिक युगांत रिकामपण मिळण्याची, फुरसत असण्याची शक्यताहि फार. या फुरसतीचा उपयोग 'सामाजिकदृष्ट्या उपयुक्त' अशा प्रवृत्तींत घालविण्याचें शिक्षण जर मिळालें नाहीं तर व्यक्तित्व खुरटेल व सामाजिकदृष्ट्या अरिष्ट ओढवेल, अशीहि विचारवंतांना भीति वाटते. याचसाठीं 'उपयुक्त शिक्षण व उदार शिक्षण' यांचा समन्वय व्हावा, असें डयूईसारखे तत्त्वज्ञ म्हणतात, याचसाठीं 'श्रम व विश्राम' यांची एकात्मता साधण्यावर विनोबाजी भर देतात. रिकामपणासाठीं म्हणा, सामाजिक पात्रता वाढवण्यासाठीं म्हणा, सांस्कृतिक पातळी उंचावण्यासाठीं म्हणा–शिक्षणानें कांहीं तरी केलें पाहिजे, हें एक नवीन मूल्य आहे. तें न समजलें तर या सुधारणेची टवाळी होणार आणि 'काळ-काढू' व 'वेळ-दवडू' वृत्तीच्या लोकांकडून तिचें मग भजें झालें तर नवल नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ............ वि. ......२१
क्रमांक ............ नों: दि: ..........

आणि हें टाळायचें असेल तर कांहीं संयोजनपूर्वक, योजनाबद्ध कार्यक्रम हवा. आपल्या सर्व जीवनाला योजनापूर्वक कांहीं शिस्त, वळण, दिशा लावण्याचें शिक्षण द्यायला हवें. ही जबाबदारी शाळांइतकीच कॉलेजांवरहि आहे. विद्यार्थ्यांची वक्तृत्वशक्ति, लेखनशक्ति, गायनशक्ति विकसित करणें, त्यांचीं नाट्य, चित्र इत्यादि कलांची आवड प्रगट होण्यास वाव देणें, त्यांना प्रोत्साहन देणें व मार्गदर्शन करणें हीं कामें शाळेंतच व शाळेच्या अभ्यास-क्रमांना धरूनच होतील. या गोष्टी संघशः व सामुदायिकरीत्या करावयाच्या व सामाजिक जीवन जगतां जगतां त्याच्या जबाबदाऱ्या समजून घ्यावयाच्या हाहि शिक्षणाचा महत्त्वाचा भाग आहे. विद्यार्थ्यांना विविध कार्यक्रमांच्या योजना आंखतां येण्यांसाठीं वर्गांचें व शाळेचें वातावरण मोकळिकीचें व स्वातं-त्र्याचें हवें. त्यांच्या कल्पकतेला अवसर हवा. पुढाकार वृत्तीला चालना हवी. शिक्षकांनींहि थोडी कल्पकता लढवली पाहिजे. परिश्रमपूर्वक साधनसामग्री उपलब्ध करून दिली पाहिजे. कांही वेळेस सामग्रीच्या अभावीं इतर साधनांवर निभावून नेण्याची कला त्यांना शिकवली पाहिजे—थोडक्यांत सहृदयता व सहानुभूतियुक्त कल्पकता यांचा अधिक उपयोग केला पाहिजे.

शाळेंत आरंभलेल्या या कार्याची परिणति शाळेबाहेर विद्यार्थ्यांचीं ‘ छंदमंडळें ’ स्थापन होण्यांत व्हावयास हवी. पाश्चात्य देशांत ‘ बालकांचीं नाट्यगृहें ’ आहेत. ‘ छोट्या शास्त्रज्ञांचीं मंडळें—क्लब्ज ’—आहेत. ‘ सहली-काढणारांचे संघ ’ आहेत, प्रौढासाठीं जशीं ‘ विहार-मंडळें ’ असतात., तशीं विद्यार्थ्यांची तीं कां नसावीत ? रस्त्यानें उगीचच तमासगिरी करणें, वांझोटे हेलपाटे घालणें, टिंगलबाजीनें व पत्त्यांनीं वा सिलोनी मैफलींनीं बैठकींना रंग भरणें—इत्यादि अवगुणांनीं आज तरुण पिढीचें जीवन बरबटलेलें बुरसट-लेलें आहे, हें नाकारण्यांत अर्थ नाहीं. उच्चतर सात्त्विक आनंदाची व तिची फारकत झालेली आहे. हें जावयाचें असेल तर स्वयंस्फूर्त कामाचा, कलात्मक सर्जनशीलतेचा आनंद मिळवून देणारें वातावरण निर्माण केलें पाहिजे. त्याची गोडी लागली कीं अति क्षुद्र गोष्टींकडे त्यांचीं मनें जाणार नाहींत. आंब्याचा आस्वाद घेतलेली जीभ उंबराकडे वळेलच कशाला ?

* * *

# नवमहाराष्ट्राचा शक्तिस्रोत
## साने गुरुजी कथामाला

कोणतेंहि राष्ट्र आपल्या बालकांसाठीं काय करतें ह्या वरून त्या राष्ट्राची संस्कृति ठरवितां येईल असें एका लेखकानें म्हटलें आहे. संस्कृति व सुधारणा यांच्या मार्गावरील प्रवासांची प्रगति अजमावण्याची ही जरी एकमेव कसोटी होऊं शकत नसली तरी त्या विधानांत तथ्य बरेंच आहे. बालकांची वात्सल्यपूर्ण काळजी घेण्याची प्रवृत्ति मनुष्यांत अधिक आहे, व तिच्यामुळें मानवाचा आध्यात्मिक विकास होतो असें प्रायः मानले जातें. पण आपली संस्कृति व परंपरा टिकण्याची गरज निर्माण झाल्याची जाणीव देखील बालकांवर जे संस्कार करण्यांत येतात त्यांवरूनच दिसून येतें. मानवाला मृत्यूकडून अमृतत्वाकडे जाण्याची जी आस आहे, तिची भौतिक व आध्यात्मिक तृप्ति करण्याचा एक मार्ग म्हणजे आपलें ‘संचित’, आपला अनुभव नव्या पिढीच्या स्वाधीन करून समाजाला सदैव चिरतरुण ठेवणें. बालकांच्या शिक्षणासाठीं सुधारलेले समाज आतुर असतात ते याचसाठीं.

*　　　*　　　*

या शिक्षणाचे व संस्कारदानाचे मार्ग अनेक आहेत. ज्ञानाच्या प्रसाराचीं साधनें तर उत्तरोत्तर विपुलतेनें उपलब्ध होत आहेत. शालेय शिक्षण हें त्यांतील एक साधन आहे. शालेय शिक्षण हें एक उपचारनिष्ठ-तंत्रनिष्ठ शिक्षणाचें साधन ( फॉर्मल एज्युकेशन ) असल्यानें त्याचे जसे कांहीं फायदे आहेत तसे तोटेहि आहेत. विशेषतः लहान वयांतील मुलांच्या प्रवृत्तीला, स्वाभाविक रुचींना आवाहन करायला तें अपुरें पडतें. म्हणून

बाल-शिक्षणाबद्दल नवे विचार व नव्या योजना प्रयोगशील वृत्तीनें समाजांतील जाणते लोक नेहमीं हाताळीत असतात. शाळेच्या चाकोरीबाहेरच्या जीवनांत मुलांना जें स्वातंत्र्य लाभतें, त्यांतून त्यांचीं मनें अधिक मोकळेपणीं उमलतात, असें रवीन्द्रनाथांसारख्यांनीं अनुभवानें लिहून ठेवलें आहे. पण या चाकोरीबाहेरच्या जीवनांतहि कांहीं प्रयत्नपूर्वक वातावरण निर्माण करावेंच लागतें, मग तें मातापित्यांनीं केलेलें असो वा वात्सल्य वृत्तीच्या समाजनेत्यांनीं केलेले असो. साने गुरुजी कथामाला हा अशाच उपक्रमांपैकीं एक उपक्रम आहे.

*　　　*　　　*

इतर प्रांतांतील स्थिति कशी आहे कुणास ठाऊक. पण महाराष्ट्राचें एक थोर भाग्य असें कीं, वेगवेगळ्या कालखंडांत त्याला महान् गुरूंची, आचार्यांची परंपरा अखंड लाभली आहे. ज्ञानेश्वर-एकनाथांचा काल थोडा दूरचा म्हणून सोडून दिला तरी रामदासासारख्या राष्ट्रगुरूंची आठवण ताजी आहे. श्रीरामचंद्र व श्रीहनुमंत यांची उपासना समाजाला लावून भव्यतेचें, दिव्यतेचें आकर्षण त्यांनीं मराठी मनांत निर्माण केलें. लोकमान्यांनीं शिवाजी उत्सव व गणेशोत्सव यांचा कित्ता देऊन स्वतःच्या कालमाना-प्रमाणें त्यांत आणखी भर घातली, सुधारणा केली. पू. साने गुरुजींनीं लहान मुलांना गोष्टी सांगण्याचें एक नवें व्रत, एक नवी दीक्षा समाजाला देऊन आपल्या युगधर्माची नवी जाणीव करून दिली. पू. साने गुरुजींच्या स्मृतीचा नंदादीप अखंड तेवत ठेवूं पाहणाऱ्या कथामाला त्या व्रतांचें पालन करण्याचा प्रयत्न यथाशक्ति करीत आहेत.

*　　　*　　　*

श्रीरामदासांना त्यांच्या परिस्थितीप्रमाणें 'मराठा तितुका मेळवावा' या समाजधारणेला पोषक अशा विचारांचा ध्यास लागला होता. तसाच पू. साने गुरुजींना भारतीय एकतेचा—आंतर भारतीचा ध्यास लागला होता. हें आंतर भारतीचें स्वप्न आपल्या पिढींत नाहीं तर निदान पुढल्या पिढींत साकार व्हावें अशी त्यांची तळमळ होती. तसें व्हायचें तर नव्या पिढीचीं—बालकांचीं मनें भारतांतील विविध भाषांतील कथांच्या रसानें

पुष्ट व्हावींत, भाषेच्या, पोषाखांच्या चालीरीतींच्या विविधतेच्या व वेगळे-पणाच्या आंत कांहीं विशिष्ट सद्गुणांनीं नटलेलीं समान मनें आहेत, याचा बालकांना मनोमन साक्षात्कार व्हावा अशी त्यांची इच्छा होती. जगाच्या पाठीवर कुठेंहि जा, मनुष्याचें मन एकच आहे. त्याला सहानुभूतीची आस आहे, पराक्रमाची हौस आहे, सत्याची आवड आहे, अन्यायाची चीड आहे. ही जाणीव संस्कारक्षम वयांत बालकांना झाली, त्यांची या बाबतींतली श्रद्धा बळावली तर वरवरच्या भिन्नतेला हीं मनें बळीं पडणार नाहींत, अशी गुरुजींची श्रद्धा होती. म्हणून त्यांनीं बालकांसाठीं विविध कथा लिहिल्या, जगांतल्या विविध भाषांतून अनुवादित करून घेतल्या, हजारों बालकांना त्या रसाळ वाणीनें, आईच्या वात्सल्यानें सांगितल्या.

* * *

बालकांना कथांची आवड स्वाभाविक असते, म्हणून त्यांच्यावर संस्कार घडविण्याचा तो प्रभावी मार्ग आहे. कथांच्याद्वारां बालकांची मनें सुसंस्कृत करण्याचा गुरुजींनीं जो उपक्रम सुरू केला, त्यांत परंपरेचा जसा आधार होता, तशीच शैक्षणिक तत्त्वाची एक अचूक दृष्टि त्यांत होती. मुलें किती एकतानतेनें कथा ऐकतात याचा अनुभव एखाद्या कथामालेंत सहभागी झाल्याशिवाय यावयाचा नाहीं. कुठल्याहि धाकाचा, शिस्तीचा बडगा नसता, ६ वर्षांपासून १२ वर्षांपर्यंतचीं वेगवेगळ्या वयाचीं ८००ते १००० मुलें नितांत शांतता राखूं शकतात, हा अनुभव निश्चित विस्मयजनक आहे. ज्यांच्या तोंडांची टकळी अष्टौप्रहर चालत असते, ज्यांना चिंवाचिंव केल्यावांचून घटकाभर करमत नसतें, घटकाभर गप्प बसायचें म्हणजे ज्यांचा नुसता कोंडमारा होतो, अशीं बालकें, 'एक होता राजा', किंवा 'एक होतें शहर' किंवा 'एक मोठें रान होतें,' अशी सुरवात होतांच गप्प बसतात. त्यांच्या ओठांची हालचाल बंद पडते. ते जीवाचे कान करतात. आणि कधीं डोळे विस्फारून, तर कधीं भुंवया आकुंचित करून कथा ऐकण्यांत दंग होतात. यांत कांहीं तरी रहस्य आहे. ती त्यांच्या जीवाची फक्त करमणूक नसते. शरीर निश्चल झालें असलें तरी मन अधिक क्रियाशील होतें. तें नव्या प्रदेशांत प्रवेश करतें. राजपुत्राच्या, मोळीविक्याच्या मागें धावूं लागतें, परीच्या

पंखावर आरूढ होतें. हरिणाबरोबर दौडूं लागतें, सिंहाबरोबर वनसृष्टीच्या सम्राटपदाचें वैभव भोगतें, राजहंसाबरोबर मानस सरोवराचा फेरफटका करीत मोत्यांचा चारा खाऊन 'कमळ-दलां'चा मधुर रस चाखून येतें. थोडक्यांत, त्यांचीं मनें विविध अनुभव घेऊं लागतात.

आणि आपलें जीवन म्हणजे तरी दुसरें काय आहे? सतत अनुभवांची ती एक मालिकाच नव्हे काय? म्हणजे कथा ऐकतांना बालकें एका जीवनाचाच अनुभव घेतात. तीं प्रत्यक्ष जीवन जगतात. तुमच्या दृष्टीनें त्या कथा कितीहि कल्पित असोत; पण बालकांच्या तात्कालीन जीवनाचा, त्या क्षणीं, त्या स्थानीं येणाऱ्या अनुभवाचा तो एक खराखुरा भाग असतो. आणि अनुभव घेणें म्हणजे जर जगणें--शिकणें असेल तर कथा ऐकत असतांना बालकें जीवनाचा एक अंश जाणतच असतात, शिकतच असतात. प्रौढांना तो कालापव्यय खुशाल वाटो, बालकांच्या दृष्टीनें वेळ कारणींच लागतो. अमाप जीवन समृद्धि ते आपल्या चिमुकल्या मनः-संपुटांत सांठवून त्याच्या कक्षा, त्याचें क्षितिज तीं विस्तृत करीत असतात.

*       *       *

'करी मनोरंजन जो मुलांचें
जडेल नातें प्रभुशीं तयाचें'

ही गुरुजींची श्रद्धा होती–याचें कारण लहानग्या बालकांतील अद्यापि मूळ स्वरूपांतलें त्यांना दिसणारें दिव्यत्व. त्यांची सत्याची आवड, न्यायाची प्रीति, दुसऱ्याच्या दुःखानें दुःखी होण्याची, दुसऱ्यांच्या सुखानें सुखी होण्याची वृत्ति, व्यापक सहानुभूतीची दृष्टि, हीं सारीं कोमेजलेलीं नसतात, करपलेलीं नसतात, कलुषित झालेलीं नसतात. जोपर्यंत या साऱ्या गोष्टी आहेत, वृत्ति उन्मीलनावस्थेंत आहेत, तोंच त्यांच्यावर संस्कार घडावेत, ही गुरुजींची दृष्टि होती. नासलेल्या पाण्याचें शुद्धीकरण करीत बसण्यापेक्षां शुद्ध पाण्याचे जे चिमुकले झरे आहेत, तेच शोधावेत, त्यांची शुद्धता टिकवावी, आणि त्यांच्यांतील शक्ति जागृत–विकसित करून त्यांतून बनणाऱ्या विशाल गंगेनें समाज-जीवन आपोआप स्वच्छ तयार होत जावें, अशी ही दृष्टि होती.

*       *       *

गुरूजींचें हें व्रत चालविणाऱ्या अनेक लहान मोठ्या कथामाला आज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून विखुरलेल्या आहेत. त्यांत काम करणारे अनेक प्राथमिक व माध्यमिक शिक्षक, सेवादलांतील स्वयंसेवकवृत्तीनें पुढें आलेल्या तरुण–तरुणी नम्रपणें सेवाभावानें हें काम करीत आहेत. त्यांत शिक्षणतज्ज्ञ आहेत. बालवाङ्मय निष्ठेनें निर्माण करणाऱ्या साहित्यिक व्यक्ति आहेत, कवि आहेत. प्रत्येकजण यथाशक्ति मदत करीत आहे.

कल्याणकारी राज्यव्यवस्थेंत बाल–कल्याणाचीं केंद्रें म्हणून काम करण्याच्या दृष्टीनें आपली दक्षता वाढविण्याचा प्रयत्न या कथामाला मनःपूर्वक करीत आहेत. सहली, चित्रपट, कथा–स्पर्धा, लेखन–स्पर्धा, मनोविनोदाचे कार्यक्रम यांची जोड देऊन बालकांना सामुदायिक जीवनाचा अनुभव घेण्यास त्या मदत करीत आहेत. त्यांच्या कार्यक्रमांत शिस्तबद्धतेच्या दृष्टीनें सुधारणा होण्यास पुष्कळ वाव आहे, याची कार्यकर्त्यांना जाणीव आहे. पण या साऱ्या कार्यक्रमांत बालक हेंच केंद्र आहे. त्याचा विकास, त्याची जपणूक हें आपलें काम, ही जाणीव ठेवून कार्यकर्ते ज्या प्रसिद्धि-विन्मुखतेनें व निःस्वार्थीपणें झटत आहेत ती फार मोलाची गोष्ट आहे. सुबुद्ध पालकांनी महाराष्ट्राच्या नैतिक व शैक्षणिक विकासाला हातभार लावणाऱ्या कार्यकर्त्यांचें कौतुक करावयास हवें; व कथामाला जोपासून पू. साने गुरुजींच्या ऋणांतून उतराई व्हावें.

*   *   *

## : २ :

‘ करी मनोरंजन जो मुलांचें
जडेल नातें प्रभुशीं तयाचें ’

हें ध्येय डोळ्यांसमोर ठेवून पू. साने गुरुजींनीं महाराष्ट्रांतील बाल-बालिकांसाठीं व युवक युवतीसाठीं साहित्यनिर्मिति केली. अनेक भाषांतून व अनेक लोककथांतून पसरलेलें साहित्यकण गोळा केले. अक्षरशः ‘ फोडिलें भांडार धन्याचा हा माल ’ अशी त्यांनीं वृत्ति पत्करली. पण तें ‘ साहित्य ’

त्यांनीं साहित्य, मालमसालाच म्हणून घेतलें. त्यावर आपल्या भावनांचा अनुभवाचा साज-शृंगार चढवला. त्याला एक नवें रूप, नवी कांति आणली. गुरुजींच्या अंतरंगाच्या भट्टींतून जें साहित्य तयार झालें, ते त्यांची कळकळ-तळमळ घेऊन आल्यानें रसरशीत झालें. गुरुजींच्या भावस्पर्शानें तें 'संस्कारी' बनलें. गुरुजी मुलांचें रंजन करीत. कशासाठीं? या प्रश्नाचें उत्तर शोधलें तर त्यांची स्मृति कथामालेच्या रूपानें अजरामर करूं पहाणाऱ्या कथा-मालांना आपला पुढला मार्ग सांपडेल.

* * *

शिक्षण बालककेंद्री असावें, ही विसाव्या शतकांतली दृष्टि आहे. पण ती प्रामुख्यानें सामाजिक आहे. गुरुजींची दृष्टि आध्यात्मिकहि होती. लहान तान्हीं अर्भकें देव असतात. अशी आपली शिकवण आहे. गुरुजींनीं त्या शिकवणीचा खोल अर्थ पाहिला. लहान मुलें निरागस असतात, पाप-पुण्याची त्यांना कल्पना नसतें. पण त्याबरोबर पापाकडे त्यांची प्रवृत्ति नसते. स्त्रीपुरुषांच्या प्रेमसंगमांतून जन्माला आलेला हा पिंड प्रेमरूप असतो. 'प्रेम-स्वरूप आई' तर मग तिची निर्मितीहि प्रेममयच असणार. त्या बालकाला प्रेमाची, वात्सल्याची भूक आहे. सहानुभूतीच्या, मायेच्या ओलाव्यासाठीं तें तडफडतें, कासावीस होतें. या प्रेमस्वरूप बालकाला दुसऱ्याला दुःख होतांच वेदना होते. विशाल सहानुभूतीचीं बीजें त्याच्या अन्तःकरणांत बीजरूपानें असतात. जाति-धर्म-पंथांनीं निर्माण केलेल्या आपपरभावाच्या तें पलिकडे असते. गरिबी श्रीमंतीच्या भिंती त्याला अजून दिसूं लागलेल्या नसतात. बालक म्हणजे विशाल मानवतेचें प्रतीक, साक्षात् 'बाळ-कृष्ण'च. गुरुजींच्या या बालकाविषयींच्या श्रद्धेबाबत त्यांची कुणाशीं तुलना करायची असेल तर ती फक्त मॉंटेसेरी वा रवींद्रनाथ यांच्याशींच करतां येईल.

बालकांतील ही मानवता जागी रहावी, विकसित व्हावी, ही गुरुजींची दृष्टि. 'महतस्तेजसो बीजं बालोऽयं प्रतिभाति मे' असें सर्व-दमनाला पाहून कालिदासाचा दुष्यंत म्हणाला होता. गुरुजींची ही दृष्टि सर्व बालकांबाबत व तरुण पिढीबद्दल होती. हा पोकळ, भ्रामक आशावाद नव्हता. गुरुजींनीं आपल्या जीवनांत आपल्या स्फूर्तिशाली व अमृतमय

वाणीनें असंख्य तरुणांचीं व बालकांचीं जीवनें घडवलीं व श्रद्धेचा साक्षात्कार पाहिला. गुरुजींना फक्त बालकांना रिझवायचें, गुंगवायचें, झुलवायचें नव्हते. त्यांच्यांत श्रद्धा निर्माण करायची होती. त्यांचें भावबळ वाढवावयाचें होतें. त्यांच्यांत आत्मविश्वासाचा वह्नि चेतवायचा होता, कर्तृत्व फुलवावयाचें होतें. कथानिवेदन, कथालेखन हा फक्त वरचा बुरखा, वरवरची कारागिरी वा कलाकुसर. रंजनाचें 'कोटिंग' होतें, गुटिकेंत होतें एक शक्तिवर्धक, संजीवक रसायन. गुरुजींना नव्या पिढीचें चारित्र्य घडवावयाचें होतें. या दृष्टीनें गुरुजी आपल्या जीवनांत एक थोर शिल्पकार होऊन गेले.

कथामालेचें कार्य केवळ रंजनाचें, कथा सांगण्या-ऐकविण्याचें असूं नयें तें यासाठीं. आजचे शालेय जीवन अनेक कारणांनीं धूसर, दूषित व दुर्बल झालें आहे. बालकांची, विद्यार्थ्यांची भूक, त्यांच्या स्वाभाविक व सामाजिक गरजा भागवायला ते असमर्थ ठरलें आहे. (ही टीका नाहीं कठोर आत्मपरीक्षण आहे.) शिवाय, शालेय उपक्रम म्हटले कीं, त्यांत मुलांना स्वाभाविकता कमी वाटतें. कधीं धाकाची, शिस्तीचीं बंधनें जाचक वाटतात. कधीं परीक्षांशी त्यांचा संबंध जोडला जातो. सगळा जुलमाचा रामराम होतो. या उलट शाळेबाहेरील कार्यक्रम म्हणजे स्वेच्छेनें निवडलेला, गोडी म्हणून पत्करलेला. ज्ञान-संस्कार-ग्रहणांत हा मानसिक वृत्तीचा फरक फार महत्त्वाचा मानला जातो. कारण कांहींहि असो, कथा-मालेचें वातावरण हें स्वाभाविक विकासाला अनुकूल असतें. कथामालेचें हें मोठें सामर्थ्य आहे. आणि त्याचा योग्य रीतीनें, कौशल्यानें, योजनाचातुर्यानें उपयोग करून घ्यावा लागतो.

*　　　*　　　*

मुलांच्या कितीतरी शक्ति कथामाला विकसित करूं शकतील. सामाजिक वृत्तीचा परिपोष ही आजची प्रमुख गरज. थोड्या थोड्या मुलांचीं, मालेच्या सभासदांची छोटीं पथकें वा कुलें बनवितां येतील. एकत्र खेळणें, गाणीं म्हणणें, पुस्तकांचा विनिमय करणें, इत्यादि मार्गांनीं परस्परांत संघटन वाढवितां येईल. स्नेहसंबंध निर्माण करतां येईल. एकाच वर्गातील मुलें पण कुणी गैरहजर असला तर तो आजारी आहे, कीं अडचणींत आहे

याची कुणी चौकशी करीत नाहीत. शहरी जीवनांत आज जी तुटकपणाची भावना निर्माण झाली आहे, तिचा हा परिणाम वा पुरावा. एकमेकांच्या घरीं जायला दसरा-संक्रांतच नको. बालवीर चळवळ व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांत 'आत्मीयता' निर्माण करण्याचें एक तंत्र म्हणून भेटीगांठी, एकत्र येणें, याला किंमत आहे. कथामालेनें तें तंत्र हाताळलें पाहिजे. संश्लेषण-वृत्ति ( Spirit of cohesion ) ही समाजधारणेस आवश्यक असते. तिचा परिपोष कथामालेनें प्रथम करावा.

* * *

मुलांना तालबद्ध गाणीं आवडतात. वृन्दगीतें हा पाश्चात्य समूहजीवनाचा एक विशेष आहे. समान-भावनांचे, आकांक्षांचें स्फुरण द्यायला हीं वृंदगीतें उपयोगी पडतात. लहान मुलें स्वाभाविकरीत्या पाठांतराचे प्रयास न अनुभवतां सुंदरगीतें पाठ करूं शकतात. वयोमानाच्या गटाप्रमाणें कथामालेनें गीतांची निवड करावी व त्यांचा उपयोग करावा. महाराष्ट्र कविपरंपरा जिवंत आहे, ज्ञानेश्वरांपासून बोरकर-बापटांपर्यंत प्रत्येकाच्या कृतींतून बालकांना आवडतील, कळतील अशीं पदें, ओव्या, गीतें निवडणें शक्य आहे. वयोमानाप्रमाणें व अनुभववृद्धीबरोबर जें पूर्वीं वरवर कळलेलें असतें, त्याच्या आशयाला सखोलता येत जाते. ही भावी जीवनाची शिदोरी कथामालेनें आपल्या सभासदांबरोबर बांधून द्यावी. स्वातंत्र्यप्राप्तीला बारा वर्षें झालीं. ८ वर्षांपासून ८० व्या वयांपर्यंत अनेक साक्षर आबालवृद्ध भारतांत आहेत. पण आपलें राष्ट्रगीत व ध्वजगीत कितींना पाठ आहे? मग तें सुरावर म्हणण्याची गोष्टच सोडा. अनेक सुंदर, भावमधुर प्रार्थनागीतांचा व ध्येयगीतांचा संग्रह करतां येईल. कथामालेनें तो करावा. चाली लावण्यास टेपरेकॉर्डर, ग्रामोफोन इत्यादि साधनांचा उपयोग करून घ्यावा.

* * *

बालकांचे 'वाग्वैभव' वाढविण्याचा, त्यांची 'वाक्प्रभा' खुलविण्याचा प्रयत्न कथामाला करतातच. तो अधिक पद्धतशीर असावा. महाराष्ट्राची वक्तृत्वासाठीं ख्याती आहे. वक्तृत्व ही लोकशाहीची गरज आहे. त्या कलेचें 'पुनरुज्जीवन' पुनः व्हावें, मुलांनीं गोष्ट सांगणें हा

फक्त ‘ श्रीगणेशा ’. संयोजकांनीं क्रमवार अभ्यासक्रम मनाशीं योजावा आणि कुशलतेनें नकळत पार पाडावा.

* * *

आणि हें व या तऱ्हेचें सारें कार्य ‘ लोकशाही ’ वातावरणांत लोकशाही मनोवृत्तीनें पार पाडावें. सभासदांच्या इच्छेला मान असावा. कार्यक्रम त्यांनीं सुचवावेत. त्यांना ‘ वाद ’ करूं द्यावा—मुख्य म्हणजे निर्णय त्यांना घेऊं द्यावा व ते पार पाडण्याची जबाबदारी आपली आहे असें त्यांना वाटूं द्यावें. ज्याला ‘ नैतिक चरित्र्य ’ म्हणतात, तें या मार्गानेंच निर्माण होतें. मीं माझ्या स्वतंत्र बुद्धीनें घेतलेल्या निर्णयाबद्दल व त्याच्या परिणामाबद्दल मीच जबाबदार—ही जाणीव म्हणजे नैतिकता. आपल्याला सामुदायिक नीतीची व जबाबदारीची जाणीव निर्माण करायची आहे. म्हणून समुदायानें सामूहिकरीत्या निर्णय करावेत व ते पाळण्याचें बंधन स्वीकारावें. स्वातंत्र्य याचा अर्थ—कांहीं क्रियाशील, सप्रयोजन उद्योगांत बुद्धीनें दूर दृष्टीनें घेतलेला निर्णय.

* * *

वरील प्रकारचा विचार आपण करूं लागलों कीं, नेतृत्वाचाहि प्रश्न उभा राहतोच. कथामालेचें नेतृत्व केवळ उत्साही तरुणांकडे असून भागणार नाहीं. आपल्यालाहि कांहीं मोठ्यांपासून, मुलांपासून शिकायचें आहे, ही त्यांची वृत्ति असावी. प्रथितयश साहित्यिकच कथा सांगायला हवा काय ? कथानिवेदनाचें तंत्र कार्यकर्त्यांनाच कां अवगत असूं नये. बालमानसशास्त्रांचा, संघटना-तंत्राचा अभ्यास त्यांचा नको काय ? वाचन-गायन-चित्रकला यांतील एखादी कलातरी प्रत्येकाला थोडीफार अवगत नको काय ? लोकशाही मूल्यांचा आचार करून तो एक आदर्श त्यानें बालकांसमोर ठेवावयाचा नसतो काय ? असे कितीतरी प्रश्न निर्माण होतात व त्यांतून कथामालेनें सांभाळावयाचीं पथ्यें सुचूं लागतात.

कथामाला नदीप्रवाहाप्रमाणें व्हाव्यात. बहुतेक प्रत्येक नदीचा उगम शंकराच्या नांवाशीं जोडलेला आहे. शंकर हे शिव, नदी शुभंकर. ती उगमाशीं पवित्र व पुढें जीवनदात्री धरित्रीला, सस्यशामल बनविणारी. कथामाला

पू. साने गुरुजींच्या नांवाशीं निगडीत आहे. एका आचारशील, मानवताप्रेमी संताचें जीवन हें तिचें स्फूर्तिस्थान आहे पण नदी पर्वतांतच घोटाळत राहिली तर तिचें जीवनसाफल्य कुठलें? 'लोकमाता' बनायला तिनें मैदानांतच उतरलें पाहिजे. केवळ गुरुजींची स्मृति जपणें हें ध्येय संकुचित आहे, पार्थिव आहे. गुरुजींच्या ध्येयांचा विस्तार व तोहि संघटितरीत्या करायला कथामालेनें कटिबद्ध व्हावें. अडचणी आहेत. पण--

'सरिता करिते का कधिं खंत?'

* * *

# ओस पडलेलीं क्रीडांगणें

विद्यार्थ्यांनीं खूप खेळावें, त्यांना भरपूर खेळायला मिळावें, विद्यार्थ्यांनीं केवळ 'राष्ट्रास रक्षण्याला' नव्हे तर वैयक्तिक व सामाजिक जीवनांतील आनंद लुटण्यासाठीं 'व्यायाम मंत्र घ्यावा,' स्वतःचें शरीर सुदृढ, निकोप बनवावें, त्यांच्यांत जोम, उत्साह, संचरावा त्यांच्या ठिकाणीं दमदारपणा, पीळ यावा, आणि कौटुंबिक व राष्ट्रीय जीवनांतील कोणत्याहि आपत्तींशीं, अस्मानी-सुलतानीशीं, विविध तापाशीं मुकाबला करण्याचें सामर्थ्य त्यांच्या मनगटांत असावें—हीं सारीं ध्येयें उदात्त आहेत, वांछनीय आहेत, त्यासाठीं सारी धडपड आहे. मग प्रयत्न व सिद्धि यांच्यांत एवढें अंतर कां पडावें ?

शारीरिक शिक्षण सक्तीचें केल्यानें विद्यार्थ्यांत शिस्त व नैतिक सद्गुण येतील काय ? या प्रश्नाबाबत शिक्षणतज्ज्ञ व मानसशास्त्रज्ञ यांच्या मनांत मुळींच संदेह नाहीं. स्पष्टपणें 'नाहीं' हेंच त्यांचें उत्तर आहे. लष्करी शिक्षण व शिस्त यांच्या अभेद्य साहचर्याच्या ज्या जुन्यापुराण्या कल्पना आमच्या डोक्यांत घर करून बसल्या आहेत, त्यांतून ही सक्तीची कल्पना जन्म घेते व तिची आवश्यकता भासूं लागते. (त्यामुळेंच शाळेतून 'छडी'ची हकालपट्टी झाल्याबद्दल अनेकांना हळहळ वाटते व आपण 'निराधार' झाल्यासारखें होतें.) तीच गोष्ट खेळासंबंधीं. सक्तीचें खेळ शाळांतून ठेवण्याला आतां जवळ जवळ पंचवीस वर्षें होतील. त्याचें फळ काय ? मुख्याध्यापकांना व व्यायाम-शिक्षकांना 'देवाशपथ खरें सांगेन, खोटें बोलणार नाहीं.'—अशी शपथ घालून खरें बोलण्याची सक्ति केली तर या बाबतींत आपल्या अपयशाची कबूली देण्यापलीकडे त्यांच्या-

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ................... दि: ...........
क्रमांक ................... दि: ...........

जवळ कांहीं असेलसें वाटत नाहीं. या योजनेची कसोटी आहे ती अशी : विद्यार्थ्यांत व्यायामाची गोडी, खेळाची आवड निर्माण झाली आहे काय ? —व्यायाम हा त्यांचा संवय—स्वभाव—बनला आहे काय ? कीं सक्तीनें भक्ति लोपली आहे ?

आजच्या विद्यार्थ्यांतील व तरुणांतील वाढती बेशिस्त जरा बाजूस ठेवूं या आणि भूतकाळाचे विहंगमावलोकन करूं या. आजची पस्तीशी-चाळीशी उलटलेली प्रौढांची पिढी तरी अशा कोणत्या ' राष्ट्रीय ' सद्‌गुणांनीं मंडित आहे ? माझे एक प्राध्यापक स्नेहि म्हणतात त्याप्रमाणें, त्यांना तर ' चारित्र्यसंपन्न ' गुरुजन लाभले होते ना ? त्यांच्यावेळीं वर्ग मोठे नव्हते. बाहेरच्या सिनेमांचें आकर्षण नव्हतें. शालेतर कार्यक्रमांची भरिमार नव्हती. अभ्यासाचें ओझें नव्हते. शिक्षकवर्ग पोरसवदा नव्हता. पगडी अंगरखा घालणारे वपुःश्रीमान् व्यासंगी शिक्षकांचें मार्गदर्शन त्यांना मिळालें होतें, असा एक बक्षिससमारंभ व क्रीडापारितोषिक-वितरण समारंभ झाला नसेल कीं, ज्यावेळीं माननीय अध्यक्षांनीं राष्ट्रभक्तीचें बोधामृत त्यांना पाजलें नसेल, ड्यूक ऑफ वेलिंग्टनच्या व त्याच्या ईटन येथील आवडत्या क्रीडांगणाच्या नांवाचा पुनरुच्चार झाला नसेल, व ' फेअर—प्ले 'चें तत्त्व विशद करून सांगितलें गेलें नसेल नि खिलाडू वृत्तीवरील प्रवचनांच्या फैरी झडल्या नसतील. आणि इतकें होऊनहि आज प्रौढ पिढींत कामचुकारपणा, दिरंगाई, बेफिकिरी, असहिष्णुता, अप्रमाणिकपणा, वशिलेबाजी, लांचलुचपत या ' राष्ट्रीय दुर्गुणांना,' एवढें उधान आलें आहे कीं, आपली राष्ट्रीय अर्थव्यवस्था, कारभार, नियोजनें, विकास-प्रकल्प सारीं कोलमडून पडतील कीं काय अशी विचारवंतांना भीति पडली आहे. कीं तरुणाच्या बाह्य उच्छृंखलवृत्तीला भिणाऱ्या या प्रौढ पिढीला फक्त बाह्यतः यांत्रिक शिस्त हवी आहे. मग अंतरंग कितीहि सडलेलें-किडलेलें असेना ? आचार्य अत्रे यांच्या ' उद्यांच्या संसार 'मधील बॅ. विश्रामप्रमाणें यांची ' जंटलमन 'ची कल्पना दिसते. मी चोरून वाटेल तें पापकर्म करीन, पण उजळ माथ्यानें ' सभ्य ' म्हणून मिरवीन असा त्याचा ढोंगी हट्ट आहे तर ?

*   *   *

पण त्यांची ही वृत्ति, शिव्या देण्याबद्दल आपल्या मुलाला चोपतांना स्वतः शिव्यांची लाखोली वाहणाऱ्या धर्मोपदेशकासारखीच नाहीं काय ? प्रौढांच्या पिढींतील ही आंतरिक बेशिस्त दाखवून दुसऱ्यांच्या बेशिस्तीचें समर्थन करणें, हा या विवेचनाचा हेतु नाहीं. आत्मनिरीक्षणाची केवढी गरज आहे, हेंच दाखवावयाचें आहे. पण त्याबरोबरच एकेकाळच्या 'कडक' व म्हणून परिणामकारक समजल्या जाणाऱ्या शिस्तीच्या कल्पनांचा पोकळपणा व खेळांतून चारित्र्य-निर्मितीबद्दलच्या कल्पनांत किंवा कार्यपद्धतींत कोठेंतरी गोंधळ आहे, ही गोष्ट लक्षांत आणून द्यावयाची आहे म्हणूनच 'वृद्धास्ते न विचारणीयचरिताः' हे वचन बाजूस ठेवून जरा निर्भीडपणें एवढा प्रपंच केला आहे.

आजच्या आंतरशालेय सामन्याच्या वेळीं (व इतरत्र) जे 'गुंडगिरी'चे प्रकार घडतात, त्याची कारणमीमांसा खोलांत जाऊन करण्याची वेळ आली आहे. आंतरशालेय सामने बंद करणें हा त्यावर उपाय नाहीं. ती एक पलायनवादी भूमिका आहे. उंदीर बिळें करीत असूनहि आम्ही घरें बांधतोंच व बांधण्याच्या पद्धतींत उत्तरोत्तर सुधारणा करतों, याचें कारण घर ही एक जीवनांतली निकडीची गरज आहे. त्याचप्रमाणें शालेय व महाविद्यालयीन सामने हीदेखील युवक-युवतींच्या व कुमार-कुमारींच्या जीवनांतील निकडीची मानसिक, सामाजिक गरज आहे, हें ओळखून त्यांचा विधायक वृत्तीनें विचार व स्वीकार आम्ही करावयास हवा. सामने बंद करण्याची पाळी येणें, ही माघार तर खरीच; पण झुंडशाहीच्या जयाची व आपल्या सुसंस्कृतपणाच्या हतबलतेची ती एक कबुली आहे. ज्याला आपण सुधारणा, सुसंस्कृतता, सभ्यता व प्रगति म्हणतों, ती सत्-असत् यांच्या संघर्षांतूनच होत असते. असत्, उन्मार्गगामी, असामाजिक प्रवृत्तींना वळण लावणें, त्यांचें शुद्धीकरण, उदात्तीकरण व उन्नयन करणें हें तर शैक्षणिक संस्काराचें कार्यच आहे. बालकांचें व कुमार युवकांचें संपूर्ण जीवन घर-शाळा-क्रीडांगण व समाज यांत विखुरलेलें आहे. त्यांच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाकडे लक्ष पुरवावयाचें असेल, तर शाळेंतील व घरांतील चार भिंतींच्या आंतील त्यांच्या आचारविचारांइतकेंच, क्रीडांगण व अन्य समूहमीलनाचीं स्थानें, सांघिक कार्यक्रम व सामुदायिक आचार

यांच्याकडेहि लक्ष पुरविलें पाहिजे. आणि ही जबाबदारी एकट्या शाळेची वा शिक्षकांची नव्हे. सर्व पालक व समाजांतील नागरिक यांची ही 'संयुक्त' जबाबदारी आहे. ती न स्वीकारतां जो तो दुसऱ्यावर दोष ढकलून सुटूं पाहतो. त्यामुळें दोषांची मीमांसा होत तर नाहींच, पण अनिर्बंधपणें त्यांची वाढ मात्र होत जाते. पुनः आरडाओरडा करायला आपण सारेच मोकळे !

* * *

आजची ओस पडलेलीं क्रीडांगणें पाहिलीं कीं, एका इंग्रजी मासिकांतील वाचलेल्या चुटक्यांची मला आठवण होते. मानसशास्त्रांत वाचलेल्या तत्त्वाबरहुकूम आपल्या बालकाचें संगोपन करूं पाहणारी ती एक युवती होती. एक दिवस जेवावयाची वेळ झाली. मुलानें पानावर बसून जेवावें म्हणून आईनें त्याला पुष्कळ आंजारलें, गोंजारलें विनवण्या केल्या.

'माझा राजा तो, माझं सोनुल तें, किती शहाणं माझं बाळ,' इ. गोड गोड शब्दांनीं त्याची मनधरणी केली. मनोविज्ञानाच्या पुस्तकांत जे जे उपाय सुचविले होते, त्या सर्वांचा अवलंब तिनें करून पाहिला. शेवटीं तिची सहनशक्ति संपुष्टांत आली, फक्त चपराक मारायची तिनें शिल्लक ठेवली. पण चिडून त्याच्या अंगावर ती खेकसलीच, 'कार्ट्या, बसतोस कीं, नाहीं जेवायला ? किती छळतोस मेल्या !' तें मूल थंडपणानें उद्‌गारलें, "Motivate me–मला प्रेरणा दे ना" तें मूल म्हणजे आईच्या मानसशास्त्रीय ज्ञानाला मूर्तिमंत आव्हान होतें ! आपली आजची तरुणांची पिढी या मुलापेक्षां कांहीं वेगळीं दिसत नाहीं. क्रीडांगणांची सोय शाळांनीं जीव काढून करावी, त्यासाठीं सरकारच्या दारांशीं धरणें धरावें, मोठमोठीं भाडीं भरावीं, वेळा–पत्रकांत खेळाच्या तासांची योजना आंखावी, तज्ज्ञ व्यायामशिक्षक मिळवावेत, पण विद्यार्थ्यांत मात्र त्याबद्दल बेताचाच उत्साह दिसावा हें सर्व पाहिलें म्हणजे मन जरा स्तिमित झालें तर नवल नाहीं.

वास्तविक खेळ-क्रीडा ही मुलांची स्वाभाविक प्रेरणा आहे ना ? भूक लागली कीं खावयाला मागणें हें जितकें स्वाभाविक आहे, तितकेंच कंटाळा आला कीं खेळणें हे नैसर्गिक आहे ना ? मग ही अनास्था कां,

असा स्वाभाविकच प्रश्न निर्माण होईल. पण थोड्याशा विचारांतीं त्याचें उत्तर सहज सांपडेल. खाणें ही स्वाभाविक प्रवृत्ति असली तरी, काय खावें नि काय खाऊं नये, यांची रुचि म्हणा, आवड म्हणा संवयीनें आपण निर्माण करीत असतो. त्याच बरोबर कसें खावें नि केव्हां खावें, याचे कांहीं सामाजिक संकेत मुलांना हळूहळू समजावून द्यावे लागतात, त्यांच्या अंगवळणी पाडावे लागतात. ही संकेत, शिकवणूक, न कळत झालेली जाणीव म्हणजेच संस्कार. या संस्कारानुसार आचारालाच आपण सभ्यता वा संस्कारिता किंवा संस्कृति हीं नांवें देतों. अन्नभक्षण ही ' सहज प्रेरणा ' आहे. म्हणून तिची उपेक्षा करीत नाहीं. ती वाऱ्यावर सोडून देत नाहीं. खेळाच्या प्रेरणेबाबतहि असाच कांहीं विचार व्हायला हवा—त्यापेक्षांहि जरा खोलवर जाऊन. कारण अन्नभक्षणाची जेवढी निकड वाटते, तेवढी खेळाची नेहमींच वाटते असें नाहीं. दुसरें असें कीं, क्षुधातृप्तीचीं साधनें फार मर्यादित असतात आणि या सहज प्रेरणेंतून व्यक्तीचा ' सामाजिक ' वा ' सांस्कृतिक ' विकास करण्याची शक्ति फार मर्यादित आहे. खेळाची गोष्ट त्या मानानें फार वेगळी. म्हणूनच त्याचा अधिक खोलवर विचार हवा.

एका विशिष्ट वयोमर्यादेपर्यंत मुलें स्वाभाविकपणें खेळतात. त्यांना खेळायला सांगावें लागत नाहीं. काळ—वेळ लागत नाहीं. उपकारणाची उणीव भासत नाहीं. त्यांचें सारें जीवनच मुळीं ' क्रीडामय ' असतें. ' खेळासाठी खेळ ' चालू असतो. त्यांतून निर्भेळ ' कलानन्द ' मिळत असतो. साऱ्या कृति स्वयंस्फूर्त असतात. त्यांतून न कळत हवें तेवढें सामर्थ्य तीं संपादन करतात, अनेक मानसिक भुकांची त्यांत तृप्ति होते, आणि शक्तीचा विकास होतो; पण अशी एक वेळ त्यांच्या जीवनांत येते कीं, जीवनांतलें गंभीर चेहऱ्यानें करावयाचें काम आणि उल्हसित मनानें खेळावयाचे खेळ यांतलें अंतर त्यांना कळूं लागतें. व्हॅलेंटाईन या मानसशास्त्रज्ञानें आपला एक गमतीदार अनुभव या बाबतींत नमूद केला आहे. बालवर्गांतील त्याच्या साडेचार वर्षांच्या मुलीला वर्गाबरोबर चालतां येईना. तिला बाईंनीं सांगितलें ' जा खेळ जा त्या बाजूला. ' त्या छोट्या मुलीनें फणकाऱ्यानें उत्तर दिलें, ' मी शाळेंत कांहीं खेळायला आलें नाहीं. मला काम करायचंय् ' आणि

असा फरक मुलांना कळायला लागला म्हणजेच त्यांच्यांतील क्रीडावृत्ति जोपासण्याची, जिवंत ठेवण्याची गरज निर्माण होते.

वस्तुस्थिति अशी आहे कीं, मुलांना खेळणें आवडत असलें आणि त्यांच्या दृष्टीनें कंटाळा घालविण्यासाठीं ते 'खेळत'च असले, तरी ज्यांतून खऱ्याखुऱ्या सामाजिकतेचा, सहकार्याचा, खेळाडूवृत्तीचा विकास होईल, असे 'सुसंघटित खेळ' (Organised games) ही निश्चितपणें शिकण्या-शिकविण्याचीच बाब आहे. म्हणून त्यांचें संयोजन ही शैक्षणिक जीवनांतली महत्त्वाची गोष्ट ठरते. इतर संवयी आणि रुचीप्रमाणें या सुसंघटित, सामुदायिक वा सांघिक खेळाची आवड व म्हणून संवय योग्य त्याच वयांत निर्माण व्हावी लागते.

पण आजच्या प्राथमिक शिक्षणाकडे लक्ष दिलें तर काय दिसेल ? ज्या वयांत मुलें हौसेनें खेळतात, खेळण्याचा खराखुरा आनंद उपभोगतात, त्या वयांत त्यांची नेमकी उपासमार होत आहे. पूर्वींच्या काळांत मराठी शाळांना जोडून 'तालीमखाना' असे पण त्या तालमींतून व्यायामाबद्दल प्रेम निर्माण होण्याऐवजीं तालीममास्तराच्या उग्रपणामुळें तालमीबद्दल तिरस्कारच वाटे. आज तालमीच्या ऐवजीं कांहीं 'सर्वांगसुन्दर' व्यायाम आले आहेत, त्यांचें महत्त्व पुष्कळच आहे. पण आठवड्यांतून एकदोन वेळां, १५-२० मिनिटें होणाऱ्या या व्यायामानें खेळांची भूक कशी भागणार ?

खेळाची आवड निर्माण व्हायला व ती वाढीस लागायला-मला वाटतं चार गोष्टींची गरज आहे. पहिली-आजूबाजूला खेळाचं वातावरण हवं. खेळाला सामाजिक जीवनांत, प्रौढांच्या जीवनांत स्थान आहे असं मुलांना दिसायला हवं. खेळण्याची मुबलक व विविध साधनं हवींत. आणि तिसरी कुणातरी प्रौढ मित्राचं मार्गदर्शन वा सहकार्य हवं. चवथी महत्त्वाची गोष्ट म्हणजे खेळाची निवड करण्याचं मुलांना स्वातंत्र्य हवं.

मुलं जर अनुकरणशील आहेत, असं आपण मानतों, तर प्रौढांच्या खेळांचं तें अनुकरण केल्याशिवाय कसें राहतील, गांवांत जोपर्यंत 'लोकल' टीम असे. तोंपर्यंत पुष्कळ मुलं क्रिकेट हौशीनें स्वयंस्फूर्तीनं खेळत होतींच ना ! आणि एखाद्या वर्षी रणजी ट्रॉफीचा सोहळा झाल्यावर कांहीं दिवस

पुनः क्रिकेट ‘ बोकाळलेलें ’ दिसतेंच ना ? पण आज प्रौढांत खेळासंबंधीं संपूर्णतया औदासीन्य आहे. समाजांतल्या प्रौढांत तर आहेच पण शाळेच्या शिक्षकांतदेखील. ‘ खेळाचा तास ’ हीं व्यायाम शिक्षकांची जबाबदारी आहे, आम्हां बौद्धिक विषय शिकविणाऱ्या शिक्षकांची नव्हे, असें प्रायः सर्वजण मानतात. खेळ व बौद्धिक विषय यांत असें हें द्वैत निर्माण करण्याची प्रवृत्ति सदोषच नव्हे तर मानसिक रोगटपणाची द्योतकहि वाटते. शिक्षक जर विद्यार्थ्यांच्या खेळांत सहभागी होतील तर आपले श्रम-कष्ट तर ते विसरतीलच, पण विद्यार्थ्यांचें प्रेमहि ते संपादन करूं शकतील.

* * *

खेळण्याच्या साधनांतहि तीच अडचण. आमचे देशी खेळ बिन-साधनांचे व म्हणून स्वस्त. पण सर्वांना सर्व वयांत व सर्व वेळीं तेच आवडावेत, असा आग्रह धरून कसें चालेल ? वयपरत्वें आवडी बदलतात. आपलें कौशल्य दाखवावयाला विद्यार्थ्यांना वेगवेगळीं माध्यमें हवीं असतात. चेंडूच्या खेळाचे विविध प्रकार संभवतात. त्यांत व्यायामाला वावहि भरपूर, रग जिरवायला संधि विपुल. त्याबाबत संधि मात्र कमी. विद्यार्थ्यांना खेळाच्या निवडीचें स्वातंत्र्य दिल्याशिवाय खेळाची आवड वाढीस लागणें कठीण वाटतें तें त्यामुळेंच. शिवाय, खेळाचा—क्रीडेचा प्राण आहे तो ‘ उत्स्फूर्तता ’ वा ‘ स्वयंस्फूर्तता ’. आणि सक्तीनें नेमका तिचाच गळा दाबला जातो. वास्तविक स्थिति अशी हवी कीं, विद्यार्थ्यांनींच खेळाकरितां उत्सुक असायला हवें, संधि मागायला हवी. मात्र शिस्तबद्ध खेळाचें महत्त्व त्यांना अनुभवानें पटवून देण्याचें काम मार्गदर्शक शिक्षकाचें.

* * *

क्रीडांगणें फुलविण्याची जबाबदारी जशी केवळ पालकांची नव्हे तशी ती केवळ शाळांची नव्हे, असेंच कोणीहि म्हणेल. बाळा ते जन्मकाळां हा सर्वच संवयीच्या बाबतींतला नियम आहे. आणि तोच क्रीडेला—खेळण्याच्या संवयीला लागू आहे. मुलांनीं सकाळीं इतक्या वाजतां उठावं, अमुक कामें करावींत, या संवयी पालक प्रयत्नपूर्वक लावण्याचा प्रयत्न करतातच ना ? त्यांनीं दांत घासले नाहीं, स्नान केलें नाहीं, तर कांहीं

धाक, कांहीं राग आईबाप व्यक्त करतातच ना? मग हीच आस्था ह्या खेळाबद्दल–क्रीडांगणावरील सुसंघटित खेळाबद्दल त्यांनीं कां दाखवूं नये, एवढेंच शिक्षकांचें म्हणणें असतें.

*　　　*　　　*

पण शाळा या प्रश्नाकडे कोणत्या दृष्टिकोनानें पाहते, त्याला हात कशी घालते, यावर पुष्कळच गोष्टी अवलंबून आहेत. क्रीडांगणें शाळेच्या पिछाडीला असतात व शाळेच्या प्रवेशद्वारीं असतात बागबगीचे–( अर्थात् ज्यांना स्वतःची जमीन असेल, व सौंदर्यदृष्टीहि, त्या भाग्यवंतांच्या बाबतींतच हें लागू आहे. ) पण बागबगीचे, मधली इमारत व क्रीडांगण हीं आतां तिन्ही एका सरळ रेषेंत आणलीं गेलीं आहेत, तिन्हींचें शैक्षणिकदृष्ट्या महत्त्व सारखेंच मानण्यांत येत आहे. पण महत्त्व मानणें वेगळें व त्याबद्दल विद्यार्थ्यांत जिव्हाळा, प्रेम निर्माण होणें वेगळें. एखाद्या विषयाचें महत्त्व वाढवावयाचें असलें कीं, पाठ्यक्रमांत त्याला स्थान द्यावयाचें व तो परीक्षेचा विषय बनवावयाचा हा एक ' धोपट मार्ग ' समजण्यांत येतो. तो एक अनुशासनीय तोडगा–ॲडमिनिस्ट्रेटिव्ह डिव्हाईस–असेल, पण ती शैक्षणिक दृष्टि ठरत नाहीं. निदान यशस्वी होत नाहीं. कारण परीक्षेचा विषय म्हणजे जुलमाचा रामराम अशी विद्यार्थ्यांची दृष्टि असते. आणि हा जुलमाचा रामराम स्वीकारून परीक्षेचा जमाखर्च कांहीं तरी कसरत करून पुरा करावयाचा अशी शाळांची रीत आहे. शारीरिक शिक्षण सक्तीचा विषय होऊनहि त्याचें उद्दिष्ट साध्य होण्याच्या बाबतींत अपयश आलें त्याचें कारण हेंच नव्हे काय?

*　　　*　　　*

या समस्या सोडविण्याचे कांहीं विधायक मार्ग आहेत. आणि त्याचा विचार आतां करावयाचा आहे. त्यासाठीं क्रीडांचें उद्दिष्ट व त्या उद्दिष्टांना पोषक असे मार्ग याचा विचार करणें जरूर आहे.

क्रीडा हा संपूर्ण शारीरिक शिक्षणाचा व विकासाचा एक भाग आहे ही गोष्ट प्रथमच ध्यानीं घ्यावयास हवी. शाळेंतल्या इतर अभ्यास-क्रमानें जशी जिज्ञासापूर्ति व्हावी, ज्ञानलालसा वाढावी, भोंवतालच्या

जीवनाचें आकलन होण्यासाठीं त्या ज्ञानाचा उपयोग करतां यावा—थोडक्यांत सारें बौद्धिक शिक्षण हें जसें जगण्याला जीवनव्यवहार सुबुद्धपणें पार पाडतां येण्याला लायक बनविण्यासाठीं असतात, त्याचतऱ्हेनें शारीरिक शिक्षण निरोगीपणें, आनंदीपणें, व कार्यक्षमतेनें जीवन जगण्याची कला शिकविण्या-साठीं असतें. त्याचबरोबर शारीरिक शिक्षणांतून बुद्धिविकासहि साधतां येतो हें मान्य करायला हवें. अशा तऱ्हेनें शारीरिक शिक्षणाचीं प्रमुख चार उद्दिष्टें ठरतात :

( १ ) शरीराची प्रमाणबद्ध वाढ व विकास.

( २ ) शरीराचा—इंद्रियांचा कौशल्यपूर्वक उपयोग.

( ३ ) बौद्धिक वा वैचारिक सामर्थ्याची प्राप्ति.

( ४ ) आणि भावनात्मक वा सामाजिक विकास.

शारीरिक शिक्षणाच्या सर्व कार्यक्रमाप्रमाणें क्रीडेद्वारांहि हीं उद्दिष्टें साध्य व्हायला हवींत. वरील यादींतलें दुसरें व चवथें उद्दिष्ट हें प्रामुख्यानें खिलाडूवृत्तीशीं आपण निगडित करतों. खेळांतल्या कौशल्यावर आपला भर असतो व योग्य भावनात्मक विकास—गुणग्रहणाची दृष्टि, प्रतिस्पर्ध्या-बद्दल आदर, जयपराजयाबद्दल समवृत्ति या साधाव्यात असा निदान आपण आदर्श ठेवतों. या चवथ्या उद्दिष्टाबद्दलच आपल्याला विशेष आस्था असल्यानें त्यांचा स्वतंत्रपणें विचार करूं या.

*　　　*　　　*

## : २ :

' घरकुलांतील दुःख '—या नांवाचा प्रा. फडके यांचा एक ललित निबंध आहे. निबंध त्यांच्या नेहमींच्या मनोहर शैलीनं रंगलेला आहे. पण मला त्यांत एक वैगुण्य दिसतं. विशेषतः प्रा. फडके हे मानस-शास्त्राचे प्राध्यापक असल्यानें हें वैगुण्य त्यांच्या निबंधांत राहावं याचं मला आश्चर्य वाटतं. कुणी एक बापूसाहेब टेनिसच्या खेळांत डाव अंगावर

आल्यानं चिडतात, हातांतली रॅकेट फेंकून, डाव अर्धवट टाकून नि क्रीडांगण सोडून ते चालते होतात, अशी त्या निबंधाची सुरुवात आहे. 'संसार म्हणजे एक धकाधकीचा खेळ आहे. त्यांत लागायचं, खरचटायचं, पडापडी व्हायची...म्हणून तो खेळ टाकून का शहाण्या माणसानं जायचं?' अशी त्या निबंधाची तत्त्वज्ञानात्मक कलाटणी–अखेरी आहे. जीवनाला 'दोन घडीचा डाव' मानावा नि तो खेळाडू वृत्तीनें खेळावा हे मोठें निरागस, निकोप नि उत्साहवर्धक तत्त्वज्ञान आहे. पण तें अंगीं बाणायचं कसं नि केव्हां हाच खरा प्रश्न आहे. फडक्यांच्या बापूसाहेबांना प्रत्यक्ष क्रीडांगणावरहि तें उमगलें नाहीं–मग पचविणं तर दूरच राहिलं! नुसते खेळ खेळल्यानं ते 'समजतं' आणि जीवनाच्या अन्य क्षेत्रांत तेंच आम्ही बरोबर घेऊन जाऊं शकतों, तें 'संक्रमित' होतं असं आम्हांला वाटतं. हें संक्रमणाचं मानसशास्त्रांतलं एकवेळचं गृहीत तत्त्व आज फार मर्यादित स्वरूपांत स्वीकारलं जातं, ही गोष्ट प्रा. फडके यांच्या नजरेंतून सुटलेली दिसते. ती लक्षांत येती तर त्या निबंधाची रचना कदाचित् वेगळ्या पद्धतीनं झाली असती. त्याला एक 'सामाजिक आशय' आला असता. बापूसाहेबांच्या या 'अ-खिळाडू' वृत्तीवर फडके यांचा तोडगा आहे–खेळ अधिक 'ईर्ष्येनं–चुरशीनं' खेळणं! म्हणजे पर्यायानं ज्यामुळं रोग झाला तेंच कुपथ्य करीत राहणं! ईर्षा, चुरस, नि स्पर्धा–या अ-सामाजिकतेचं म्हणजेच अ-खिलाडू वृत्तीचं पोषण करतात पण फडक्यांच्या व्यक्तिवादी पिंडाकडून या सामाजिक दृष्टिकोनाची अपेक्षा मी राखतों यांत, मला वाटतं, माझीच चूक होत आहे.

सामाजिकता आणि खिळाडू वृत्ति याचं जें मीं समीकरण बनवलं आहे, त्याची थोडी फोड करायला हवी. खेळ केवळ खेळांच्या आनंदासाठीं खेळणं हा खिळाडूवृत्तीचा गाभा, प्राण आपण मानतों. पण खरं पाहिलं तर तें कारण नसून कार्य आहे. अनेकविध अनुभवांतून बनलेल्या मनोवृत्तीचं तें फळ आहे. खेळ खेळतांना जसं आपलं कौशल्य प्रगट करायचं असतं, तसंच दुसऱ्याच्या गुणांचें रसग्रहणहि करायचं असतं, हें वेळोवेळीं मनावर बिंबायला हवं. त्यासाठीं खेळ खेळणारे प्रतिस्पर्धी नसतात, तर मित्रच असतात, ही भावना हवी. आणि डावांतला निकाल द्यायला पंच-त्रयस्थ तरी कशाला हवा? 'मी बाद झालों, आतां तुझी पाळी आहे,' हें

सांगण्याइतकी न्यायनिष्ठा खेळणाऱ्यांत कां नसावी ? खेळांतला जय नि पराजय दोन्ही हंसतमुखानं झेलण्याची तयारी हवी. पण असं असायला खेळांत आम्ही कांहीं गमावीत नाहीं—उलट मिळवतोंच व तें एकेकट्यानं नव्हे, तर सामुदायिकरीतीनं, अशी वृत्ति प्रथमपासून हवी—हिलाच सामाजिकता समाजशीलवृत्ति असं म्हणतां येईल. पण त्यासाठीं खेळाचं उद्दिष्ट, प्रयोजन हवं—घटकाभर गंमत, चार-चौघांबरोबर नित्यक्रमापेक्षां वेगळ्या कामांत घालवलेला वेळ, एकमेकांच्या सहवासाचं तें एक साधन. खेळाच्या-क्रीडेच्या अंतर्गत, अंगभूत गुणासाठीं त्यांतून लाभणाऱ्या संधीसाठीं तो खेळायला हवा—त्याची गरज, निकड वाटते, म्हणून आपली त्याकडे प्रवृत्ति वळायला हवी. यालाच म्हणतात खेळाची प्रेरणा खेळांतून हवी, ती बाह्य नसावी. पण आज खेळांचं नियोजन होतं ते या साऱ्या गोष्टींमुळें नव्हे—तर बाह्य प्रलोभनानं, आणि प्रलोभनानं जागृत होतात, चेतवल्या जातात—त्या ईर्ष्या, असूया, स्पर्धा. ‘ मारूं अथवा मरूं ’—ही खेळांतली बेभान धुंदी खेळाचा आनंद तन्मयतेनें उपभोगण्यासाठीं आवश्यक असते, असें घटकाभर गृहीत धरलें, तरी तिचें अंतिम प्रयोजन खेळाच्या समाप्तीबरोबर संपायला हवें, पण तसें तें होत नाहीं. कारण खेळ खेळासाठीं असतात, ही दृष्टि विद्यार्थ्यांना दिली जात नाहीं. खेळ बाह्य प्रलोभनासाठीं असतात.

आणि हें प्रलोभन असतं—सामन्यासाठीं ठेवलेली ढाल, विजय—चिन्ह. सामने खेळले जातात ते ह्या ढाली मिळविण्यासाठीं, नव्हे शाळांतून खेळांची व्यवस्था होते, तीच मुळीं सामन्यांसाठीं विद्यार्थी तयार करण्याच्या उद्देशानें ‘ स्पेशल टीम्स करण्यासाठीं. ’ या ढाली मिळविणें म्हणजे फार मोठी कर्तबगारी, मोठा पराक्रम समजण्यांत येतो; त्यावर खेळाडूंची व शाळेची प्रतिष्ठा अवलंबून आहे, असें मानलें जातें. संमेलनासाठीं वाचावयाच्या अहवालांत, तपासणी अधिकाऱ्यापुढें ठेवायच्या इतिवृत्तांत या घटनांना गौरवास्पद स्थान असतं. ढाल जिंकणाऱ्या विद्यार्थ्यांना वीर म्हणून संबोधण्यांत येतं. हें सारं एका परीनं स्वाभाविक आहे. ( पण इष्ट आहे कीं, नाहीं हाच वादाचा मुद्दा आहे. ) आणि एकदां या ढालींना असं ‘ अवास्तव ’ महत्त्व आलं कीं, त्या मिळविण्यासाठीं प्रयत्नांची पराकाष्ठा व्हावी, त्यासाठीं जीव टाकावा हें मनुष्यस्वभावाला धरूनच आहे. एकदां असं त्यांत स्पर्धेचं वारं शिरलं

कीं त्यांतलं 'क्रीडापण' नाहींसं होतं Play becomes war आणि everything is fair in love and war, या स्पर्धेच्या भावंडाला हाताशीं धरण्यांत येतें. धर्मयुद्धाचेहि नियम मग धाब्यावर बसविले जातात. प्रतिस्पर्ध्यांच्या साऱ्या गोष्टींकडे छिद्रान्वेषण दृष्टीनें, संशयग्रस्ततेनें पाहिलें जातें. खेळाला म्हणजे सामन्यांना सुरुवात होते, तीच मुळीं सामनेवाल्या संघाचें वजन जास्त आहे, अशी शंका घेण्यापासून! मग संघांतील गडी वयातीत आहे असा पवित्रा घेतला जातो. त्यानंतर गुणलेखकाच्या तत्परतेबद्दल संशय व अखेरीस पंचांच्या निःपक्षपातीपणाबद्दल व दक्षतेबद्दल अविश्वास. अशा संशय-पिशाच्यांनीं झपाटलेल्या वीरांच्या ठिकाणीं खिलाडूवृत्ति बाणेल ही अपेक्षा म्हणजे काऱ्याच्या वेलाला द्राक्षाचे घड लागावेत, अशी अपेक्षा बाळगण्यासारखेंच नव्हें का?

* * *

खेळाडूंना मिळणारें 'शिक्षण'च या प्रकारचें आहे; आणि त्याला जबाबदार क्रीडाशिक्षक व मुख्याध्यापक आहेत. त्यांची स्पर्धावरची निष्ठा, त्या दिशेनें दिलें जाणारे प्रोत्साहन, सुचविले जाणारे डावपेंच या सर्वांचा संकलित परिणाम दुसरा काय होऊं शकणार! आपला संघ हरला तरी खेळाडूंना 'धीरानें खेळलांत, गड्यांनो!' म्हणून धन्यवाद देण्याऐवजीं, त्यांचें कौतुक करण्याऐवजीं, त्यांची कडक निर्भर्त्सना करणारे अनेक क्रीडाशिक्षक (व मुख्याध्यापकहि) अनेकांच्या पाहण्यांत असतील. या विजय-चिन्हांच्या आसक्तीला मर्यादा तरी कोठें घालणार? त्यामुळें कांहीं मोठ्या शहरांत व महाविद्यालयांत मोठा भ्रष्टाचार माजतो. केवळ खेळांत चमकणारे विद्यार्थी या संस्थाना मोलाचें वाटूं लागतात. ते आपल्याच संस्थेंत राहावेत, यावेत, म्हणून या ना त्या प्रकारें त्यांची खुशामत होते, त्यांचे वेडेचार खपून घेतले जातात. फर्ग्युसन कॉलेजसारख्या फार मोठी उज्ज्वल परंपरा असणाऱ्या महाविद्यालयाच्या एका माजी प्राचार्यांनीं या तऱ्हेची जी तपशीलवार तक्रार 'केसरीं'तील लेखांत केली होती, तिची या ठिकाणीं आठवण होते. ही स्पर्धा, व लालसा त्यामुळें अवलंबिले जाणारे गौण वा वाम मार्ग पाहिले कीं सामने व खेळ यांना कसे 'व्यापारी' स्वरूप आलें आहे हें स्पष्ट होतें. व्यापारी जगांतल्या स्पर्धेसाठीं तयार होण्याचेंच बाळकडू जणुं या

वयांत देण्यांत येतें. अशी वस्तुस्थिति असल्यावर खेळाचा आनंद, क्रीडेचा विशुद्ध आनंद इ. गोष्टी ख–पुष्पाप्रमाणें स्वप्नसृष्टींतल्या ठरल्या तर नवल काय ?

* * *

आणि या चुरशीच्या सामन्यांत बहुसंख्य विद्यार्थ्यांची भूमिका काय ? चुरशीचा सामना, पट्टीच्या खेळाडूचें कसब पाहिल्याचा आनंद खरोखरीच ते मिळवतात काय ? पट्टीचे खेडाळूच मुळी विशिष्ट हेतूसाठीं, जयप्राप्तीसाठीं तोफांतल्या, मालमसाल्याप्रमाणें, वापरण्यांत येतात, तेथें या मामुली भुस्कटाची कथा काय ? शिकारींत जसें रान उठविणारे हाके असतात, त्याप्रमाणें खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठींच यांनीं जावयाचें असतें ! मराठ्यांच्या लढ्यांत सैनिकांच्या मागें जसें पेंढार असे, त्याप्रमाणें हे सामने बघ्यांचे ( त्यांना प्रेक्षक कसें म्हणावें ? ) पेंढार असते, विजयश्री ‘ हिसकावून आणायाला त्यांचें सामर्थ्य हुकमी असतें, ’ अशी अनेकांची श्रद्धा असावी. सभेंतला ‘ सभ्य ’ आचार हा जसा शिक्षण–संस्काराचाच विषय आहे. त्याचप्रमाणें, थिएटर–क्रीडांगण येथील प्रेक्षकांची वागणूक, शिस्त वा शिष्टाचार हाहि शिक्षणाचा भाग आम्ही मानयला नको का ?

* * *

मुख्य मुद्याची गोष्ट अशी आहे कीं, एकोणिसाव्या शतकांतील जीं कांहीं जुनीपुराणीं जीवन–मूल्यें आमच्या समाजपद्धतींत व त्यामुळें शैक्षणिक जगांत दृढमूल होऊन बसलीं आहेत. त्यांतील ‘ स्पर्धा ’ हें एक तत्त्व वा मूल्य आहे. स्पर्धा ही कामासाठीं मोठी प्रेरक शक्ति आहे, असें समाजांतले भांडवलदार एकेकाळीं मानीत. भांडवलशाही समाजरचनेंत तें तत्त्व अखेर निरुपयोगीं ठरलें. कुठल्याहि प्रकारें स्पर्धेचं तत्त्वज्ञान समाजहितास वा प्रगतीस पोषक ठरत नाहीं असें बर्ट्रांण्ड रसेलसारख्या समाजवाद्यापासून आचार्य दादा धर्माधिकाऱ्यांसारख्या सर्वोदयवादी दार्शनिकापर्यंत सर्वांनीं उद्‌घोषून सांगितलें आहे. शिक्षणाच्या क्षेत्रांत त्यांचा मर्यादितपणा विचारवंतांना केव्हांच कळून चुकला आहे. बक्षिसांचें आणि पारितोषिकाचे धनी कांहीं ठराविक विद्यार्थीच व्हावयाचे हें एकदां कळून चुकलें कीं, बहुसंख्य विद्यार्थी

त्यापासून अलिप्त कसें राहतात, हें सर्वांना ठाऊक आहेच. जें बौद्धिक क्षेत्रांत तेंच क्रीडेच्या क्षेत्रांत झालें आहे. सामन्यासाठीं निवडल्या जाणाऱ्या संघांत आपल्याला जागा नाहीं, आपल्याला जायचं नाहीं, तें आपलं काम नाहीं, असा एकदां निर्णय घेतला कीं, खेळण्याचं कारणच उरत नाहीं हा निष्कर्ष ओघानेंच येतो. सामने व क्रीडा यांची अशी सांगड हीं क्रीडांगणें ओस पडण्याला कारणीभूत झाली आहे, असें म्हटलें तर वावगें होऊं नये. आणि सामने व त्यांची विजय-चिन्हें यांची गट्टी जमल्यानें तेथून खिलाडूवृत्तीनें काढतां पाय घेतला आहे. स्पर्धावृत्तीचा परिपोष करून विजयचिन्हें मिळत असतील, तीं मिळवल्याचा आनन्द मिळत असेल, पण खेळण्यांतली मौज, आनन्द, क्रीडेची शोभा यांना मात्र हे जेते हरपून बसतात. जें हस्तगत केलं जातं त्या मानानं जे हरपलं जातं, त्यांचं मूल्य मोठं आहे, हें आम्हांला पटेल, तर त्याबद्दल विधायक दृष्टीनं विचार करून खिलाडुवृत्ति वाढविण्याचे विधायक मार्ग आम्ही शोधूं. त्यांचा विचार करण्यापूर्वीं या एकंदर विवेचनाचें सार म्हणून एवढंच म्हणतां येईल कीं, ‘ सामन्यांत बक्षिसासाठीं ठेवलेल्या ढाली ’ क्रीडावृत्तीचं, खिलाडूवृत्तीचं संरक्षण करायला अपुऱ्या नि अयशस्वी ठरत आहेत. एवढेंच नव्हे तर त्यांच्यामुळें त्या वृत्तीच्या प्राणांवर बेतत आहे.

*　　　*　　　*

वर असें म्हटलें होतें कीं खिलाडूवृत्ति हें एक कार्य आहे, फळ आहे, परिणाम आहे. याचा अर्थ असा कीं अनेक वेळां तोच तो अनुभव व संस्कार घडून मनाची झालेली ती एक स्थिरवृत्ति आहे. तेव्हां एकदमच विद्यार्थ्यांत ती आढळली नाहीं, तर त्याबद्दल राग बाळगण्याचें वा कष्टी होण्याचें कारण नाहीं. पण त्याचबरोबर ‘ मुलेंच तीं, असं वागायचींच. ’ (Boys will be boys) असें मानून उपेक्षा करायची पण ती बाब नव्हे. आलेला अनुभव जर वाया घालवावयाचा नसेल, तर तो पकडून ठेवला पाहिजे, त्याची छाननी, शहानिशा, चिकित्सा झाली पाहिजे. त्यांतील ग्राह्याग्राह्यतेचा अंश मुलांना समजला पाहिजे. तर तो अनुभव कारणीं लागला असें म्हणतां येईल. स्थिरवृत्ति, स्थिर संस्कार घडविण्याचें एक तंत्र आहे आणि खिलाडूवृत्तीच्या

जोपासनेंत त्याचा अवलंब करावा लागेल. त्याचा विचार करून या विषयाचा समारोप करूं.

*　　*　　*

## : ३ :

विचार करतां करतां माझं मन वीस वर्षांपूर्वींच्या एका प्रसंगानं वेधून घेतलं आहे नि तिथंच तें रेंगाळत आहे. तें दृश्य अति हृद्य होतं, तसंच स्फूर्तिदायकहि. कांहीं वृक्षांचीं फळं व जलाशयाचं पाणी यांचं सेवन करून कुठल्यातरी भव्य कामगिरीवर निघालेले चिमुकले वीर दीर्घ काल तहान-भूकेपासून अलिप्त राहूं शकतात, असं परीकथांत नेहमीं वर्णिलेलं असतं ना? मानवी जीवनांतहि वर्षभरांतून एकदां येणारे प्रसंग अशाच कांहीं जादूनं भारलेले असतात. त्यांतून मनुष्याला लाभणारी शक्ति पुढील वर्षभर त्याला पुरत असते. अशा दुर्मिळ प्रसंगांतलाच तो प्रसंग होता. विद्यार्थ्यांच्या दृष्टीनें तरी तो तसाच होता, असं मला वाटतें. वीस वर्षांपूर्वीं तो प्रत्यक्ष पाहतांना माझी प्रतिक्रिया काय होती, हें आज स्मरत नाहीं. पण ज्याअर्थीं स्मृतीचीं कवाडं सताड खोलून आपलं ताजेपण तो पटवीत आहे, त्याअर्थीं त्याचा मनावर खूप ठसा उमटला होता, हें स्पष्टच आहे.

खानदेशमध्यें एके काळीं अग्रगण्य असलेल्या व आपलें ' प्रताप ' नांव सार्थ करणाऱ्या प्रताप हायस्कूलचा हॉल एखाद्या मेजवानीला ज्या उत्कंठेनें व उत्साहानें जमावें, अशा उत्कंठेनें व उत्साहानें भारलेल्या विद्यार्थ्यांनीं गजबजला होता. शाळेचें तें स्नेहसंमेलन नव्हतें. कुणा प्रथितयश साहित्यिकाचं वा पाहुण्याचं आगमन झालेलं नव्हतं. शाळेचे फुटबॉलचे व हॉलीबॉलचे संघ जळगांवहून सामने खेळून परत आले होते. त्यांचा तो सत्कारसमारंभ नव्हता तर त्या दिवशीं कांहीं गुरुजन सामन्याचें ' आँखो देखा हाल ' रसभरित वाणीनें विद्यार्थ्यांना निवेदन करणार होते. तें वृत्त-निवेदन इतकें मार्मिक होतें, इतकें ठसठशीत होतें, कीं तें ऐकतांना प्रत्यक्ष सामना पाहिल्याचा आनंद तन्मयतेनें श्रोतृगण उपभोगतांना दिसत होता.

पण मला त्यांच्या त्या वर्णनशैली इतकीच हृदयस्पर्शी वाटली ती त्यांची खिलाडूवृत्ति. ते शिक्षक खेळांत आपापल्यापरी निष्णात होते, म्हणूनच खेळांतील बारीक-सारीक घटना व दुर्घटना बारकावे व डावपेंच, ते यथातथ्य रंगवूं शकत होते. पण त्याचबरोबर तेथील प्रेक्षकांच्या भावनांचीं आंदोलनें ज्या पद्धतीनें रंगवीत, तिच्यांत आणि साऱ्याच कथनावर खिलाडूवृत्तीची छाप फार दाट होती. खेळ कोणत्या वृत्तीनें बघावा, त्याचा आनंद कसा लुटावा, त्याचबरोबर खेळ खेळतांना कौशल्यप्रदर्शनासाठीं अवधानें कोणतीं सांभाळावींत, संघांतील खेळाडूंचें सहकार्य कसें आवश्यक असते, इत्यादींचें तें एक प्रात्यक्षिक होतें. या क्रीडाप्रेमाचा खिलाडूवृत्तीचा ठसा न कळत छात्रमनांवर पडला तर नवल नाहीं. तो प्रसंग हृद्य नि प्रेरक होता, असं आरंभीं म्हटलं तें यामुळेंच.

आज तेथें ती प्रथा चालू आहे कीं नाहीं मला ठाऊक नाहीं. पण क्रीडाप्रेम वृद्धिंगत करायला नि खिलाडूवृत्तीचा परिपोष करायला अशा प्रसंगांची नितान्त गरज आहे.

*　　　　*　　　　*

ह्या वा असल्या प्रसंगांची गरज आहे ती एका विशिष्ट वातावरणाच्या निर्मितीसाठीं. नव्या पिढीचीं मनें नकळत वातावरणांतून असाप संस्कार आत्मसात् करून घेतात. वरील तऱ्हेच्या वातावरणांतून शालेय समाजाचीं ध्येयें व आकांक्षा आणि आचाराचें तत्त्वज्ञान व त्याची नैतिक बैठक यांचा विद्यार्थ्यांना चांगला परिचय होतो. आजचें शालेय जीवन जसजसें संख्येनें फुगत चाललें आहे, तसतशी ‘ स्कूल-असेंब्ली ’ कमी होत चालली आहे.—शाळेच्या सर्व घटकांनीं अनेकदां वा दररोज एकत्र कांहींतरी कारणानें एकत्र येणं, या प्रकाराला मानसशास्त्रीय व शैक्षणिकदृष्ट्या फार महत्त्व आहे. वरील सारख्या प्रसंगांतून जो प्रभावी संस्कार विद्यार्थ्यांवर बिंबवला जाई, तो ताजा राखण्याला दैनंदिन आचाराची जरुरी आहेच. सामन्यांचें गुणग्राहकवृत्तीनें केलेलें समालोचन—मग त्यांत प्रतियोगी संघांतील खेळाडूंच्या गुणांचें कौतुक आलेंच,—हें जसें महत्त्वाचें आहे, तसाच सामन्याच्या आरंभीं क्रीडासंघाला द्यावयाचा निरोप हाहि प्रसंग महत्त्वाचा म्हणतां येईल.

त्यावेळींहि आपण कोणत्या उद्देशानें खेळावयास व खेळ पाहावयास जात आहोंत, याची आठवण वा शिकवण विद्यार्थ्यांना देतां येईल. विद्यार्थी पुष्कळदां अविचारानें वा उच्छृंखलपणें वागतात, त्याचें कारण एक असेंहि आहे–आणि तें फार महत्त्वाचें आहे–कीं समाजांत वागावयाचे नियम, समाजाचे आदर्श यांची त्यांना माहितीच नसते, माहिती करून दिली जात नाहीं. कायद्याचें अज्ञान ही सबब नाहीं, हें तत्त्व प्रौढांसाठीं आहे, विद्यार्थ्यांसाठीं नव्हें. न्यायदेवता त्या तत्त्वांत असें गृहीत धरते कीं कायदा समाजांतल्या घटकांना उपलब्ध झालेला आहे व आपल्या कृत्याची नैतिक, कायदेशीर जबाबदारी समजण्याची पात्रता त्या वयांत आलेल्या नागरिकांमध्यें आलेली आहे. विद्यार्थीदशेचा काळ या दोन्ही तयारींचा काळ आहे. समाजाचे विविध थर जेव्हां समाजाचे एक कांहीं अंशीं स्वयंपूर्ण घटक म्हणून अस्तित्वांत होते, तेव्हां सामाजिक आदर्शांची जाणीव, जपणूक केवळ त्या त्या थरांतील, प्रौढांच्या आचाराच्या अनुकरणानें, बाणविल्या जाणाऱ्या यांत्रिक संवयीनें सहज होत असे. सामाजिक व नैतिक मनोवृत्तीच्या घडणींत सामाजिक वातावरणाला, समाजांत कोणतीं मूल्यें मान्य आहेत याच्या जाणिवेला फार महत्त्व आहे. आज समाजाच्या जीवनांत जी अस्थिरता, धावपळ, असंघटितपणा आला आहे, त्यामुळें सामाजिक जीवनाची नव्यानें पुनर्मांडणी करण्याची गरज निर्माण झाली आहे. शालेय समाज तें पार पाडूं शकेल त्याची ती जबाबदारी आहे, हें लक्षांत घेतलें म्हणजे शालेय सभांचें प्रयोजन लक्षांत येईल.

* * *

क्रीडेची नैसर्गिक आवड व त्याला प्रयत्नपूर्वक द्यावयाचें सुसंघटित स्वरूप हा असाच भाग आहे. ‘सुसंघटित’ समाज हा आपोआप निर्माण होत नसतो. त्याला संघटक, संघटना, मार्गदर्शक लागत असतो. विद्यार्थ्यांच्या खेळाला जर सुसंघटित खेळांचें ( Organised games ) स्वरूप द्यावयाचें असेल, तर त्यांच्या छोट्या संघटना निर्माण व्हायला हव्यात. आणि त्या संघटनांचें स्वरूप जितकें तंत्रमुक्त व खेळीमेळीचें असेल, तितकें एका अर्थी अधिक चांगलें. शाळांतून वर्गांचे खेळ घेण्याची प्रथा आहे. शाळांवर जवळ

जवळ तशी सक्ति आहे. पण या कार्यक्रमाला जुलमाच्या कर्मकांडाचें रूप न देतां आणि जरूर तर वर्ग हाच घटक न मानतां विद्यार्थ्यांचें छोटे छोटे संघ, पथकें, मंडळें त्यांतुन निर्माण होण्याच्या दिशेनें प्रयत्न झाले, तर ' क्रीडा ' हा जुलूम आहे, ही भावना नष्ट व्हायला मदत होणार आहे.

* * *

आणि अशा संघटनांची गरज आणखी एका दृष्टीनें आहे. संघटना म्हटली कीं नियमांची गरज आलीच. हें नियम ठरविण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांचीच असायला हवी. आपल्याला जरूर असलेले नियम आपण—म्हणजे अनेकांनीं सहकार्यानें व सहविचारानें ठरविणें व मग तितक्याच निष्ठेनें ते पार पाडणें हा लोकतंत्रात्मक शिक्षणाचा महत्त्वाचा भाग आहे. नियमांबद्दल आस्था व आदर हा शिस्तीच्या शिक्षणाचा गाभाच आहे. ज्या लोकशाही समाजजीवनासाठीं विद्यार्थ्यांची तयारी करावयाची त्याचा आरंभ विद्यार्थीदशेंत प्रत्यक्ष जिवंत अनुभवांतून होणें हें फार महत्त्वाचें आहे. अशा संघटना हें कार्य पार पाडण्याची मुख्य साधनें समजायला हवींत. भावीकालांत ज्या ज्या प्रसंगांतून जावें लागतें, तत्सम, तद्दश प्रसंगांतून विद्यार्थिदशेंत जावें लागलें, व तसें जातांना देवघेव, तडजोड, सहिष्णुता व सहकार्य यांची गरज भासली व तदनुकूल मनोवृत्ति हळूहळू बनत गेली, कीं खिलाडुवृत्तीची आणखी वेगळी जोपासना करण्याची गरज उरतच नाहीं.

* * *

नियमपालनाची आपली नैतिक जबाबदारी उमगत जाणें, अनुभवानें कळणें हा शिक्षणाचा फार मोठा भाग आहे. वरीलसारख्या छोट्या संघटनांतून तें कार्य फार चांगलें होऊं शकतें, हा त्यांचा विशेष फायदा आहे. एकतर दुसऱ्याकडून होणारी नियमांची पायमल्ली इतर सदस्य, घटक डोळ्यांत तेल घालून पाहतात व त्याची जाणीव तीव्रतेनें लगेच करून देतात आत्मशोधन व आत्मनिरीक्षण हा जसा त्यांचा एक परिणाम आहे. तद्वतच समाजमताचा प्रभाव, दबाव हा दुसरा भाग आहे. शिस्तींतला आणखी जो एक घटक आत्मसंयमन, त्याला हा सामाजिक मताचा, आग्रहाचा दबाव म्हणा,

परिणाम म्हणा, फार उपकारक ठरतो. पण आत्मपरीक्षणांतून निर्माण होणारें आत्मसंयमन हेंच खरें नैतिक जीवनाचें सार आहे व मूळ आहे आणि त्यासाठीं विद्यार्थ्यांच्या ' स्वायत्त ' संघटना फार आवश्यक आहेत. मात्र त्यांना चालना विशिष्ट वातावरण निर्मून प्रौढांनीं द्यावयास हवी.

खिलाडुवृत्ति आणि सामाजिक मनोवृत्ति यांचें समीकरण आपण पूर्वीं मांडलें होतें. ही सामाजिकवृत्ति लोकशाही मूल्यांवर आधारलेली व त्यांच्या जपणुकीसाठीं जर असावयाची असेल, तर खिलाडुवृत्ति आणि लोकशाहीवृत्ति यांचीहि फारकत करतां येणार नाहीं. लोकशाही वृत्तीचा गाभा हा खिलाडुवृत्तीहून वेगळा थोडाच आहे ! म्हणून त्या दोन्ही वृत्तींचा परिपोष करण्याची रीत, तंत्र एकच आहे व त्याचाच वर ऊहापोह केला आहे. पण त्याच्या यशासाठीं आणखी एका गोष्टीची नितान्त गरज आहे. ती म्हणजे या जीवनमूल्यांबाबत अनन्य निष्ठा. अनन्य शब्दावर विशेष जोर आहे. शाळेच्या इतर शिस्तीचें, संचलनाचें ध्येय-धोरण वेगळें, घरांतील सूत्र वेगळें आणि क्रीणांगणाकडून अपेक्षित वृत्तीची अपेक्षा वेगळ्या ध्येय-धोरणांतून, असें असेल तर त्या भिन्न व विरोधी जीवनमूल्यांच्या संघर्षांतून विद्यार्थ्यांच्या मनांत सुसंवाद, सुसंगति कशी निर्माण होणार ? आज असाच प्रकार सुरू आहे आणि म्हणून खिलाडुवृत्तीला आम्ही हरपून बसलों आहोंत. ज्या शाळांत अंतर्गत संचलन व क्रीडांगण यांत ध्येयांचा सुसंवाद आहे तेथील विद्यार्थ्यांमधील वातावरण निकोप आढळतें, याचें कारण हेंच. जीवनाची एकात्मता व एकसंधता आम्ही जितक्या लवकर ओळखूं व त्यासाठीं जीवनमूल्यांची एकच बैठक सर्वत्र स्वीकारूं, तितकें आमचें ईप्सित आम्ही लवकर हस्तगत करूं.

* * *

भारतानें लोकशाही मूल्यावर अधिष्ठित अशी जीवनपद्धति स्वीकारली आहे. ती केवळ राजकीय क्षेत्रांतली धोरणपद्धति नाहीं. ही पद्धति विशाल दृष्टीनें भारतीयांच्या मनोरचनेला धरून आहे. पण बदलत्या काळाला अनुसरून तिचा तपशील व त्या अनुरोधानें प्रयोग आपल्याला अजून करावयाचे आहेत. शाळा, शालेय समाज ही अशा गोष्टींची प्रयोगभूमि

आहे. असायला हवी. क्रीडांगण हें या प्रयोगशाळेचें एक विशाल दालन आहे, म्हणून तें समृद्ध असायला हवें. कार्यक्षम व परिणामक्षम ठरायला हवें. विद्यार्थी जीवनाची भावनात्मक गरज भागविण्यासाठींच नव्हे, तर चारित्र्यनिर्मितीचें प्रभावी क्षेत्र म्हणून आमचीं क्रीडांगणें पुन्हां फुलायला, बहरायला हवींत, आणि खिलाडुवृत्तीच्या सुगंधानें दरवळून जायला हवींत, नव्हे ती वृत्तीच क्रीडांगणाचा प्राणवायु ठरायला हवा.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. 10842

# विद्यार्थी आणि रंगभूमि

## वासंतिक विहार

'आयीबहार, आयी बहार' म्हणून कविजन ज्याच्या आगमनानें उल्हसित होऊन गाऊं लागतात तो वसंत जीवनांत एकदांच येत असेल, पण सृष्टींत तर नेमेची, प्रतिवर्षीं येतो ना! 'ऋतु-संहार'कर्त्या कवीनं वासंतिक शोभेचं वर्णन मोठं मनोहारी केलं आहे. वसन्त येतो, आपल्या सुकुमार हातानं सृष्टीवर सौभाग्याचा साज शृंगार चढवितो. वठलेल्या वृक्षांवर चैत्रपालवी अंकुरते, आम्रवृक्षावरला मोहोर सारें वातावरण उन्मादक गंधानं भारून टाकतो आणि उन्मत्त कोकिलांच्या श्रवणसुभग कूजितानं दिशा गाऊं लागतात. कविकुलगुरूच्या काळांत आमरायांची दाटी होती. आणि पुष्पवाटिका पावला पावलांवर श्रान्ताचा श्रमपरिहार करायला सिद्ध होत्या. अशोक, बकुळी, कर्णिका आणि मल्लिका यांचीं जणूं ठिकठिकाणीं तोरणं उभारलेलीं असत. आजहि जरा अभिरुचिसंपन्न वस्तींतून सायंकाळीं फेरफटका केला तर जाई, नेवाळी, रातराणी आणि निशिगंध आपल्या सौम्य, नि उग्र सुगंधाची बरसात वाटसरूंवर करीत असतांना आढळतातच. 'गजरा मोतियांचाऽऽ' दारावर येतांच टपोऱ्या मोगऱ्याच्या माळा वेणींत माळून वा फुलदाणींत ठेऊन कलकलणारं डोकं नि हुरहुरणारं मन शांतवायला लोक आजहि धडपतात ते याच ऋतुराजाच्या आगमनानन्तर! ज्या काळांत सुबत्ता नि रसिकता सख्या बहिणीप्रमाणें या देशांत नांदत होत्या त्यावेळीं 'द्रुमाः सपुष्पाः सलिलं सपद्मम्' म्हणून एखाद्या कवीनं सराग गात सुटावं यांत नवल नव्हतं. किंवा पळसाच्या-किंशुकाच्या लालभडक फुलांनीं

भारावलेल्या वृक्षांच्या राजींनीं नटलेली वनस्थली बघून त्याला 'रक्तांशुका नववधू'ची आठवण व्हावी यांतहि विशेष आश्चर्य तें काय !

पण वसन्त म्हणजे मधुमाधव नि मधुमाधव म्हणजे रसराज शृंगाराचे सखे ! मानव स्वतःला सृष्टीपासून कितीहि दूर समजो, पण साऱ्या चेतन सृष्टींत जीवनाची एकच ऊर्मि आहे. नित्यनूतन आविष्कारानं प्रकट होणें हाच तिचा धर्म, स्वभाव नि स्थायी भाव. सृष्टींतील शिशिर, वसन्त, वर्षा नि शरद मानवी अन्तःकरणांत कोणती भावसृष्टी निर्माण करूं शकतात याची साक्ष सारेच जुने व नवे आणि अतिनवे कवीहि देतात. अर्थात् निसर्गाशीं इमान असेल, मन जर संवेदनक्षम असेल तर याचा अनुभव तीव्रतेनें येईल. पण एक गोष्ट खरी कीं, माणसानं नगरं वसवल्यापासून आणि निसर्गाला आपला प्रतिस्पर्धी लेखून आपण जिंकायला, दबवायला जन्माला आलों आहोंत, असं मानायला आरंभ केल्यापासून निसर्गाच्या अनंत रूपांचा त्याच्या कामरूपत्वाचा साक्षात्कार त्याला होईनासा झाला आहे. "वारा काय छान आहे" 'आकाश काय निरभ्र आहे,' असें म्हणावयाची हुक्की या निसर्गाला दूर ठेवूं पाहणाऱ्या माणसाला आल्यावांचून राहत नाहींच ! कारण मूळ स्वभाव जात नाहीं व 'अंतरींचे धावें स्वभावें बाहेरी !' प्राचीनांना मात्र या निसर्गाच्या प्रखर प्रभावाची जाणीव होती. त्यांची जीवनं निसर्गाशीं समरसलेलीं असत; म्हणून कोकिलांच्या मत्त कूजितांनीं आपलीं हृदयं 'पर्युत्सुक' झाल्याचा त्यांना अनुभव येई किंवा आंब्यांचा परिमल घेऊन येणाऱ्या वायुलहरी त्यांचें मन पर्याकुल करून टाकीत आणि कुंद-चमेलींनीं बहरलेल्या वनराया 'चित्तं मुनेरपि हरन्ति निवृत्तरागं, प्रागेव रागमलिनानि मनांसि यूनाम्' असं ते बिनदिक्कत सांगत ! दिवस रम्य आहेत नि प्रदोष समय तर रम्यतर सुखावह आहेत, अशी त्यांची प्रचीति असे व ते ग्वाही देत 'सर्वं प्रियं चारुतरं वसन्ते !'

आणि या प्रदोषवेला कशा रसिकतेनं घालवाव्यात याचीहि कला त्या जीवनपुष्पाच्या मकरन्द-मार्मिकांना अवगत होती. संस्कृत नाटकांतल्या सूत्रधारांचे सारे प्रस्ताव या बाबतींत एकमुखानें साक्ष देतील. ते म्हणत असतात कीं, "हा वसन्त आला म्हणजे आमच्या जिवाची मोठी धांदल उडते, आमचे कुशीलव, संगीतज्ञ आणि साथवाले आपलीं हत्यारं गवाणींतून

काढून सज्ज करूं लागतात. नेपथ्य-विशारद कोणत्या नेपथ्यभूषेचं आजकाल विशेष आकर्षण आहे याच्या शोधांत गर्क होतात. पण त्या साऱ्यांना हाताशीं धरणाऱ्या मला हा पेंच पडतो कीं, 'अद्य वसन्तोत्सवे' कुणा प्रथितयश कवीची कृति रसिकांना मीं सादर करावीं !" अर्थात् ही पेंचाची भाषा वरपांगी असते, नाटक उभं झालेलं—हल्लींच्या परिभाषेंत त्याची 'निर्मिति' झालेली—असते, फक्त श्रोतृवृंदाला जरा गोंड धक्का देण्यासाठीं सूत्रधाराची ही बतावणी असे. कारण त्या काळांत नाटकांचा सुकाळ असे. राहुल सांकृत्यायनांनीं आपल्या 'वोल्गा ते गंगामध्यें' कालिदास–अश्वघोषांच्या काळांत चालणाऱ्या वासंतिक उत्सवाचीं एक दोन मनोरम चित्रं रेखाटलीं आहेत. जलतरणाच्या स्पर्धा, संगीताच्या मैफली नि नाटकाचे प्रयोग यांना घेऊनच सायंसमय रात्रीला सामोरा जाई, 'श्रुति-वीरांपेक्षां,' केवळ प्रेक्षकांची भूमिका घेणाऱ्यांपेक्षां कृतिवीरांची, प्रत्यक्ष प्रयोगांत सहभागी होऊन आनंद लुटण्याची मनिषा बाळगणारांची संख्या तेव्हां बहुधा अधिक असावी. चांदण्या रात्रींचीं नि कारंजाच्या तुषारांत भिजणाऱ्यांचीं चित्रें पाहून दुसऱ्याच्या तृप्तीनें स्वतः ढेकर देण्यापेक्षां स्वतः चांदण्यांत हिंडून, नि नसानसांतून गोड शिरशिरीनं लाख चांदण्या फुलवून किंवा पोहोण्याच्या शर्यतींत भाग घेऊन तो निदाघ 'सुखसलिल-निषेक' आहे, 'सर्वेंच चंद्रानना' आहे हें चाखून पाहणारे जीवनवीर त्या काळीं बहुधा अधिक असावेत. त्यामुळेंच वसंतोत्सव म्हणजे नाट्योत्सव असाहि भाव त्यांच्या मनीं वसत होता.

आणि हें सारें खरें असलें पाहिजे; नव्हे जीवनाचा रसिकतेनं आनंद घ्यायचा असेल तर घनदाट छायेंत सुखानें झोपून काढण्याची ज्यावेळीं प्रवृत्ति असते, ते वसंत ग्रीष्माचे दिवस 'परिणाम रमणीय' व्हावेत, म्हणून वासन्तिक शिबिरें, सहली व नाट्योत्सव यांचीच कौशल्यपूर्ण योजना हवी, हें एक नितांत सत्य आहे. रशिया-अमेरिका यांतील तरुणांच्या व विद्यार्थ्यांच्या जीवनाची चतुराईनें आंखणी करणाऱ्यांनीं हें अलिकडे दाखवून दिलें आहे. अमेरिकेंत अनेक विद्यापीठें, प्रादेशिक शिक्षणसंस्था, पालक-शिक्षक संघ, पार्क व म्यूझियम या संस्था ८ व्या वर्षापासून ते १८ व्या वर्षापर्यंतच्या बालक-तरुणांना नाटकाची गोडी लावण्यासाठीं गेलीं २५–३० वर्षें उद्योग करीत असलेल्या दिसत आहेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .................. वि: ..................
क्रमांक .................. नों. दि: ..................



त्यांत कित्येक विद्यार्थ्यांनीं चालविलेल्या नाट्यसंस्था आहेत. नाटक निवडणें वा लिहिणें, ते बसविणें, त्याची रंगभूषा, वेषभूषा, दीपयोजना व इतर सर्व कलाकुसर यांची आंखणी–मांडणी करणें हीं सारीं कामें विद्यार्थीच करतात. त्यांच्या सृजनशीलतेला व योजकतेला त्यांत भरपूर खाद्य असतें. कोठें लहान मुलांसाठीं मोठीं माणसें त्यांना आवडणाऱ्या गोष्टी वा कथा यांचे नाट्यप्रयोग करतात. कोठें ते प्रयोग संमिश्र छोट्या-मोठ्यांनीं मिळून केलेले असतात. जीवनाचा आस्वाद घेण्याच्या दुर्दम्य प्रवृत्तींतून अमेरिकेंत नाटकाला कांहीं आगळें स्थान मिळालें असेल. पण विद्यार्थ्यांची रंगभूमि ही करमणूकींतून ज्ञान देणारी संस्था आहे ते मानतात. शुद्ध संस्कारयुक्त वाणी, आवाजांतील परिणामकारक चढउताराची कला, डौलदार व छाप पाडणाऱ्या हालचाली या जीवनांत उपकारक ठरणाऱ्या बाह्य कौशल्याची संपादणी असल्या प्रयोगांतून विद्यार्थी करतातच. आणि हे सारे चालते उन्हाळी सुटींत, वासंतिक वर्गांत !

पण आमच्याकडे मात्र वसंताची शोभा परीक्षांच्या काळजीनें काळवंडली जाते नि निदाघ-समय शरीराला दाह करणाऱ्या आगींत होरपळत नि हुळहुळत काढला जातो. परीक्षा संपल्या म्हणजे ‘ पुढें काय ? ’ हा प्रश्न साऱ्यांच्याच पुढें असतो असे नव्हे; अनेकांच्या समोर **प्रश्न** असतो तो **‘ आतां काय ? ’** ‘ सध्यां काय ? ’ या दीर्घ सुट्यांचा काळ जरा वासंतिक नाट्यवर्गांना व नाट्यमहोत्सवांना दिला व अभ्यासानं वा इतर कार्यक्रमांच्या गर्दीनं गजबजलेल्या कालखंडांतून हा भाग जरा अलग केला तर चालणार नाहीं का ! अभ्यासाला पूरक म्हणून नाट्यीकरण अवलंबणं व दैनंदिन कामांत त्याचं उपयोजन करणं हा भाग वेगळा व छंद म्हणून, कलेची आवड म्हणून नैसर्गिक प्रवृत्तींचा परिपोष म्हणून याला स्वतंत्र–वेळ–आणि जो आम्ही खरोखरी वाया घालवितो तो, देणं हें वेगळं. शाळेच्या अभ्यासावर जर या व इतर छंदांचं आक्रमण होऊं द्यावयाचें नसेल आणि विद्यार्थ्यांना सतत कार्यप्रवण राखून त्यांच्या जीवनाचा तोल राखावयाचा असेल तर वसंतऋतूंतील नाट्यमहोत्सवाची प्राचीनांची परंपरा व अर्वाचीनांची प्रथा आम्ही अवलंबावी हेंच श्रेयस्कर. निसर्ग आणि मानवी जीवन यांतहि एक ताल व मेळ निर्माण

करून जीवन अधिक हृद्य व रुचिपूर्ण करण्याचा तो एक मार्ग आहे असं म्हटलं तर त्यांत अतिशयोक्ति होईल काय ?

* * *

: २ :

यौवनाचा प्रारंभ म्हणजे भरतीचें उधाण ! बाल्यावस्थेपेक्षां तो अधिक अस्थिर नि चंचल. बाल्यावस्थेंतला न्यूनगंड नाहींसा झालेला असतो. ' तुम्ही लहान आहांत, ' ' तुम्हांला नाहीं समजायचं ' अशीं हिणवणीचीं बोलणीं ऐकण्याचा काल संपला. पौगण्डावस्थेंत पाऊल टाकलं कीं, आतां कर्तृत्वाचीं विविध क्षेत्रं हाताळायचा हक्क आपल्याला मिळायला हवा, असं अधिरीं मन मानीत असतात. कांहींतरी करून आपला शिक्का वठवला पाहिजे, आपला शिक्का गाजवला पाहिजे, आपल्या अस्तित्वाची दखल इतरांना घ्यायला लावली पाहिजे, ही जीवनांतली सततची ऊर्मि आतां अनावर होत असते. बाल्याच्या स्वप्नाळू सृष्टीची कक्षा ओलांडली कीं जीवनाची वास्तवता आकलन करण्याइतकी बुद्धि परिपक्व होऊं लागते. तर्कशक्तीनें आपण स्वतंत्र विचार करूं शकतों, जुन्या-नव्याची सुसंगति साधूं शकतो, असाहि प्रत्यय येऊं लागतो. आणि तरीहि भावनांच्या उसळलेल्या ऊर्मि, कर्तृत्वासाठीं उत्सुकलेले रक्ताचे कण न् कण, साऱ्या जीवनावर नव्या आकांक्षांची नि नव्या आदर्शांची स्वप्निल, सुनील नि सोनेरी छाया पसरवीतच असतात. ज्वानीची धुंदी मस्तवाल कल्पना प्रसवत असते. काव्य रचावेसें वाटतें, निदान जगावेंसें वाटतें. ही यौवनाची भूक शमविण्यासाठीं, जीवनाच्या एका नव्या अनुभूतीचा आस्वाद मिळवून देण्यासाठीं, साहित्य-संगीत काव्य नि नाट्य यांचीं योजना असते. वसंत-पंचमीचा उत्सव त्यासाठींच असतो नि त्यासाठींच यमुनातटीच्या ' होरी 'ची योजना असते.

पण आपल्या सामाजिक जीवनांत एक काळ असा होता कीं, बालकांच्या या स्वाभाविक प्रवृत्तींची व गरजांची आम्हांला कल्पना नव्हती.

बालकांचे जीवन व प्रौढांचे जीवन यांत फरक मानला जात नव्हता. प्रौढांच्या नियमांनीं व आदर्शांनीं, त्यांच्या मतांनीं व श्रद्धांनीं बालकांचें जीवन जखडलें गेलें होतें. बालकांना काय हवें, काय आवडतें व पोषक ठरतें, याचा निर्णय प्रौढांनींच करावयाचा. याचा परिणाम असा होई कीं, बालकांना-युवकांना स्वतःला आवश्यक वाटणाऱ्या, त्यांच्या जीवनाला पोषक वाटणाऱ्या गोष्टी 'चोरून' कराव्या लागत. बागेंतल्या गारसलेल्या लाल चिंचा चोरून खाव्या लागत. आपट्यांची 'उषःकाल' कादंबरी चोरून वाचावी लागे. 'काळां'तले लेख तर जप्तच झालेले, तेहि चोरून वाचावे लागत, इतकेंच काय, पण विद्वान् कथेकऱ्यांची कथा चोरून ऐकावी लागे; अन् किर्लोस्करांचं 'शाकुंतल' चोरूनच वाचावं लागे. झोपेचं सोंग घेऊन किंवा दाराच्या फटींत कानाची पाळी खुपसून संभाषण ऐकण्यांत पाप असेल, पण स्वातंत्र्यवीर सावरकर, लो. टिळक असल्या देशभक्तांचं व्याख्यान चोरून ऐकणं पाप आहे असं तुम्ही म्हणाल काय? दुसऱ्याच्या बागेंतलं फूल तोडून तें आपल्या प्रिय 'माणसाला' देण्यांत तुम्ही पाप मानतां कीं नाहीं मला ठाऊक नाहीं, पण घरच्या माळ्यानं दिलेल्या पुड्यांतलं फूल किंवा स्वतःला मिळालेल्या मेवामिठाईतला कांहीं हिस्सा आपल्या जिवलग मित्रासाठीं वा मैत्रिणीसाठीं चोरून राखून ठेवण्यांत नि तिला वा त्याला तो चोरून नजर करण्यांत काय आनंद आहे हें अनुभवावांचून कळायचं नाहीं. या गोष्टीलाहि तुम्ही पापाचं लेबल चिकटवलंत तर तुमच्यासारखे अरसिक तुम्हीच! सुटीच्या दिवशीं मनमुराद घारपुऱ्याच्या घाटावर किंवा पाटलांच्या विहीरींत डुंबणं, गोखल्यांच्या घरीं बिझिक लॅडिस, वा सोंगट्या खेळणं, वझ्यांच्या घरीं बसून हस्तलिखित मासिक तयार करणं, हायस्कूलच्या मैदानावर सायकल शिकणं, वहींत कादंबरी ठेवून ती भर वर्गांत वाचणं आणि हो, एखाद्या मुलीशीं वाचनालयांत अभ्यासाच्या नोटसचं निमित्त करून ओळख करण्याचा प्रयत्न करणं या नि अशा 'अनुलेख्य', 'अवर्ण्य' किंवा तुमच्या लाडिक शब्दांत 'अनामिक' म्हणा, कितीतरी चोरून केलेल्या गोष्टींच्या आनन्दगुटिका प्रत्येकाच्या स्मृतिमंजुषेंत असतील! आणि त्यांची गोडी आजहि तुमची 'तनु रोमांचिता' करीत असतील!

* * *

पण एक गोष्ट खरी कीं, बंधनें जितकीं अधिक तितका चोरटेपणा अधिक. पण गेल्या दोन-चार पिढ्यांत अनेकांनीं बालवयांत व तरुण वयांत या चोरटेपणाचा अवलंब केला म्हणूनच काव्य, नाट्य, संगीत इत्यादि ललितकला आज आपल्याला मोकळेपणीं वावरतांना दिसतात. त्यापायीं कित्येकांचीं आयुष्यें त्यांच्या कुटुंबाच्या दृष्टीनें 'वायां' गेलीं असतील. पण त्यांना स्वतःला तो एक 'आनंदाचा कंद' वाटला. जसें संगीत तसेंच नाट्य-समाजाच्या अवकृपेचा विषय होता. 'नाच्या पोऱ्या' या शब्दानेंच त्याकडे वळलेल्यांची संभावना व्हावयाची; पण प्रत्येक बालकाला, मुलाला, तरुणाला कांहीं एका मर्यादेपर्यंत संगीत-नाट्याची गरज असते; नव्हे त्यांच्या विकासाचीं तीं साधनें असतात, हें कुठें ठाऊक होतें त्यावेळीं आम्हांला? जिथें आई झालेल्या सूनबाईला आपल्या तान्हुल्याला अंगाईगीत मोठ्यानं म्हणायची चोरी. तेथें मुलाला वा मुलीला एखादें भावगीत म्हणायला कोण मुभा देणार? नि नाटक बघायला जेथें बंदी, तेथें नाटक करायला कसली आली सोय? पण याहि कालांत आईवडिलांच्या धोतर-लुगड्यांचे पडदे करून व चोरून पाहिलेल्या, ऐकलेल्या नाटकांतील भाषणांना स्वतःच्या भाषणांचा तिखटमसाला लावून नाटकाचे प्रयोग बालचमूंनीं केलेच आहेत! बालकांच्या जीवनांत, तरुणांच्या जीवनांत आज नाटकाचें स्थान सर्वमान्य होऊं लागलें आहे. हा आपल्या पुरोगामीपणाचा पुरावाच म्हणायला हरकत नाहीं.

*　　　*　　　*

बालकांच्या, युवकांच्या जीवनांतील नाटकाची गरज व प्रौढांच्या जीवनांतील नाटकाची गरज यांत मला वाटतें फार अन्तर आहे. प्रौढ माणसं नाटकं पाहातात, ती मला वाटतं जीवनांतलं 'नाटक' विसरण्यासाठीं कलावंत रसिकांची गोष्ट जरा बाजूला ठेवूं या. पण सर्व सामान्य मनुष्य नाटकाकडे वळतो तो करमणुकीसाठीं. स्वतःच्या जीवनांतला कंटाळा, शीण विसरण्यासाठीं. आणि या कंटाळ्या जीवनांत जें 'नाटक' करावं लागतं, त्याचा कंटाळा हा फार मोठा भाग आहे. शेक्सपीअरनं जगाला रंगभूमीची व प्रत्येकाला नटाची उपमा दिली आहे, हें मला ठाऊक आहे. पण त्यांतला भाव मला कांहीं वेळेला फार मिळमिळीत वाटतो. त्यापेक्षां किती तरी

तीव्र व खऱ्या अर्थानें प्रत्येक जण जगांत दररोज नाटक करीत असतो. मनांत नसलेल्या भावांचा आविर्भाव आणून व अभिनय करून आपली भूमिका बेमालूम वठवीत असतो ! अवेळीं आलेल्या पाहुण्यांना मनांत शिव्या मोजीत 'अलभ्य लाभ, महाराजा,' म्हणून त्याचें स्वागत करणारा यजमान, –विशेषतः गृहिणी,–अचानक दत्त म्हणून येऊन ठाकलेल्या अधिकाऱ्याला दंतपंक्ती दाखवून स्वागत करणारा नोकर, सासूसासऱ्यांच्या जाचाला कंटाळलेली पण कुटुम्बाच्या प्रतिष्ठेसाठीं त्यांचे गोडवे गाणारी सून, घरून उपाशी निघूनहि शाळेंत उशीर झाल्यावर अभिमानानं निमूटपणें छडी घेणारा विद्यार्थी, गृहिणीशीं वा हृदयेश्वरीशीं झालेल्या अतिलापानं मौनाची शपथ घेणारा पण चारचौघांत मुखर बनणारा प्रेमवीर, जीवनाच्या प्रत्येक कोपऱ्या कोपऱ्यावर क्षणाक्षणाला असे महान् नट उभे आहेत. डोळ्यांत आंसूं नि ओठांत हंसूं अशा भूमिकेंत वावरणारीं अनेक पात्र सभोंवतालीं आहेत. यांत वकील आहेत, व्यापारी आहेत, डॉक्टर आहेत, शिक्षक आहेत, सर्व पेशांतले व सर्व थरांतले लोक आहेत. आणि यांतली बरीच मंडळी नाटकांकडे वळतात ती आपल्या दुहेरी, दुटप्पी जीवनाला विसरायला.

* * *

बालकांची व तरुणांची गोष्ट मात्र याहून अगदीं वेगळी आहे. त्यांना कल्पनेच्या पंखावर आरूढ होऊन एका वेगळ्या जगांत प्रवेश करायचा असतो. दुहेरी-तिहेरी भूमिकांचा अनुभव घ्यावयाचा असतो. पण त्याचं कारण जगाच्या दांभिकतेला ते विटलेले असतात म्हणून नव्हे, तर विविध अनुभवाची समृद्धि वाढवायला. अगदीं लहान मुलें सिंह ओरडला म्हणजे बाकीचीं जनावरें कशी भीत असतील याचा अनुभव घेऊन पाहत असतात. शिवाजीनें वा तानाजीनें, जीं बाणेदार उत्तरें औरंगजेबाला वा शिवाजीला दिलीं यावेळीं त्यांचा ऊर अभिमानानें कसा भरून आला असेल, त्यांची मान कशी ताठ झाली असेल, हें अनुभवानें परमन-प्रवेशानें जाणूं इच्छितात. बाल अभिमन्यूनं चक्रव्यूहांत कसा पराक्रम गाजवला असेल, ध्रुवानें परमेश्वराचा कसा धावा केला असेल, छोट्या जॅकनें अल्लाउद्दिनाचा दिवा कसा हाताळला असेल, हिमगौरीनें सात बुटक्यांना कसं नाचवलं असेल, हें सारं त्यांना अनुभवायचं

असतं इतिहास, पुराणें, परीकथा यांचें केवढें तरी भांडार प्रत्येक समाजा जवळ आहे. आणि कल्पनेला मोहविणारे, अभिमानाला चेतवणारे, आनंदाला फुलविणारे असंख्य प्रयत्न त्यांत आहेत. बालकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या रंगभूमीचे प्राचीन कालापासून ते विषय झालेले आहेत. आपल्या भावनांचा कल्पनाशक्तीचा आणि भाषाशक्तीचा विकास बालकांना व युवकांना कधीं बाललीलांच्या तर कधीं रामलीलांच्या रूपानें कधीं चोरून, तर कधीं उघड बंड करून साधून घेतला आहे. मुलांच्या रंगभूमीचें प्रयोजन हें असें आहे. आज आपण विद्यार्थ्यांना रंगभूमि खुली करीत आहोंत. पण तीहि मला वाटते जरा दबकत, दबकत चोरटेपणानेंच. कारण रंगभूमीचं, नाटकाचं विद्यार्थ्यांच्या जीवनांतलं स्थान याबाबत आम्ही साशंक आहोंत.

हा 'चोरटेपणा' घालवायचा असेल, आणि विद्यार्थ्यांची रंगभूमि ही त्यांच्या सृजनशीलतेला क्रीडन वृत्तीला व म्हणून पोषक ठरावयाची असेल, तर विद्यार्थ्यांच्या रंगभूमीकडे बघण्याचा आमचा दृष्टिकोन पालटला पाहिजे. विद्यार्थ्यांची रंगभूमि ही 'क्रीडा-स्पर्धांप्रमाणें' च एक स्पर्धोचें शाळेच्या 'लौकिक' प्रतिष्ठाचें क्षेत्र बनली आहे. एकदां ही स्पर्धा-वृत्ति आली कीं सांपत्तिकदृष्ट्या सरस असलेल्या, एखादा अभिनय-शिक्षक ठेवूं शकणाऱ्या व नागर विभागांतील शाळा त्या ढाली नि पेले मिळवण्याचा विक्रम करण्यांत कृतार्थता मानूं लागतात. आणि हें अजिंक्यपद पटकावतांना श्रम, वेळ, पैसा, शक्ति इत्यादि-बाबतींत कसलाच विधि-निषेध पाळला जात नाहीं. रंगभूमि ही मूठभर विद्यार्थ्यांची, कुणातरी 'निपुण' शिक्षकाची मिरासदारी बनते. विद्यार्थ्यांच्या व शाळेच्या जीवनाचें तें एक 'स्वाभाविक' अंग बनत नाहीं. सगळाच ताल व तोल नाहींसा होतो.

विद्यार्थ्यांची रंगभूमि खास विद्यार्थ्यांच्या करितां आहे, असें एकदां मान्य केलें, कीं नाट्यप्रयोग लिहिण्याचें, निवडण्याचें बसविण्याचें स्वातंत्र्य त्यांना द्यायला हवें. शिक्षकांनीं या बाबतींत त्यांच्याशीं चर्चा करावी; त्यांना मार्गदर्शन करावें पण 'प्रयोगा' चें—एक्सपिरिमेंट—चें त्यांना स्वातंत्र्य द्यावें. विद्यार्थ्यांची रंगभूमि ही भाव, साहित्य, अभिनयकला शिकण्याचें एक साधन आहे; प्रत्यक्ष तें साधन उपयोगांत आणतांना विद्यार्थी-दशेंतलें जीवन आनंदी

खेळकर व सुखी बनविण्याचें तें माध्यम व वातावरण आहे. म्हणून विद्यार्थ्यांची रंगभूमि कांहीं मुठभर विद्यार्थ्यांच्या वाट्याला येण्याचें कारण नाहीं. शाळेंतले अनेक वर्ग व अनेक गट त्यांत सहभागी होऊं शकतील व व्हायला पाहिजेत. सामान्य विद्यार्थ्यालाहि इच्छा असेल तर त्यांत संधि मिळाली पाहिजे. नाट्यद्वारा भाषा, इतिहास, समाजपरिचय हे विषय शिकवतां येतात. संशोधकांच्या, वैज्ञानिकांच्या चरित्रावर नाट्यप्रयोग लिहितां येतील व त्यांच्या जीवनातील मर्म व त्यांच्या कार्याचें महत्त्व विद्यार्थ्यांना अनुभवानें समजून घेतां येईल. कुठलीहि गोष्ट 'अनुभवणें' हा रसप्रतीतीचा गाभा असेल तर नाट्यासारखे रसप्रतीतीचें अन्य साधन नाहीं.

आज मराठींत विद्यार्थ्यांजोगें नाट्यसाहित्य नाहीं ही गोष्ट खरी आहे. भावनांच्या, विचारांच्या व भाषेच्या दृष्टीनें न पेलणारे प्रयोग विद्यार्थी-विद्यार्थीनींना करावे लागतात, हें एक कटु सत्य आहे. प्रौढ व निवडक तरुण-तरुणी नामवंत साहित्यांतले निवडक प्रवेश निवडूं व बसवूं शकतील व ते त्यांनीं तसे बसवावेत, हेंहि मला मान्य आहे. पण सर्व-सामान्य विद्यार्थ्यांची व तीहि वेगवेगळ्या वयाच्या श्रेणींच्या विद्यार्थ्यांची गरज भागविणारे नाट्यप्रवेश, एकांकिका मोजक्याच आहेत.

नामवंत नाटककारांना या प्रकाराकडे वळावेसें वाटलें नाहीं तरी दुसऱ्या श्रेणीच्या नाटककारांच्या व लघुकथा लेखकांच्या प्रतिभेला हें एक नवें 'क्रीडांगण' खासच उपलब्ध झालें आहे. त्यांच्या खनपटीला बसून विद्यार्थ्यांजोग्या कलाकृति निर्माण करून घेतल्या पाहिजेत असें कांहींचें म्हणणें आहे. प्रतिभावंत अशा 'हुकमी' लिखाणाला कितपत तयार होतील याबद्दल वानवा असली तरी एक प्रश्न निश्चित मनांत डोकावतो. तो म्हणजे विद्यार्थी-जीवन हें खरोखरच प्रतिभावंतांना उपेक्षणीय वाटण्या-जोगें हलकें, क्षुद्र नगण्य आहे काय? आजच्या थोर पदवीस पोहोंचलेल्या साहित्यिकांच्या बाल-जीवनांत, विद्यार्थी दशेंत, मनाला वेड लावणारे, जिवाला हूर हूर लावणारें, हृदयाला पीळ पाडणारे, हें कीं तें असा सवाल टाकून चित्तवृत्ति दोलायमान करणारे, कांहींच घडलें नाहीं? घडलेलें त्यांनीं पाहिलें नाहीं? रवीन्द्रनाथांच्या कितीतरी कथा पौगण्ड दशेंतील युवकांच्या

मनोव्यथावर आधारलेल्या आहेत. हरि नारायण आपट्यांच्या कादंबऱ्यांतहि युवकांच्या आकांक्षांच्या ओढाताणीचें चित्रण आहे. मागणी तसा पुरवठा म्हणून नव्हे तर जीवनांतील एक उपेक्षित निरागस नि तितकेंच उदात्त असें हें एक दालन अन्तश्चक्षूंना प्रगट होईल तर आज सर्वांना हवें आहे.

आजकाल शाळेंतील नाट्यप्रयोग संमेलनांतील एक भाग म्हणून उरकण्यांत येतात; आंतरशालेय स्पर्धा एक 'आन्हिक' म्हणून घाईघाईनें उरकून टाकल्या जातात. त्यामुळें या रंगभूमीचें स्वातंत्र्य नाहींसें झालें आहे; प्रयोजन गौण ठरलें आहे. 'वासंतिक सुट्या' हा काल जर रंगभूमीसाठीं दिला तर रिकामपणच्या वेळेचा प्रश्न चांगला सुटणार आहे आणि विद्यार्थ्यांच्या रंगभूमीचा अनिर्बंध विकास होण्यास साहाय्य होणार आहे, त्यासाठीं 'शालेय व्यवस्थे'ला आज जे पोलादी चौकटीचें स्वरूप आलें आहे तें नाहींसे होण्याची आवश्यकता आहे.

* * *

# ते सप्ताह–त्या मिरवणुका

आपले जुने वैद्य जेव्हां एखादी औषधयोजना करीत, तेव्हां ती योजना प्रथम एक आठवड्याची असे. गुण येतो, असें दिसल्यास आणखी एक आठवडा तीच योजना चालू ठेवण्यांत येई. या पद्धतीला एक शब्द असे. तो म्हणजे 'सातरं'. (सातरात्रीं!) कुठलाहि काढा, पुड्या व गुटिका आणि वटिका यांचा उपयोग करायला ते सांगत, तेव्हां 'एक सातरं' 'दोन सातरं' अशा भाषेंत ते बोलत. आज डॉक्टर मंडळीं इंजेक्शनचा 'कोर्स' देतात. आणि त्यांत 'सहा' ही संख्या बहुधा निश्चित असते. तसाच तो प्रकार, सात दिवस लागोपाठ औषध पोटांत गेल्यानें, शरीरांतर्गत द्रव्यावर त्यांचा निश्चित परिणाम होतो, हा त्यांचा अनुभव होता, कीं श्रद्धा होती हें सांगणें जरा कठिण आहे. एकादी गोष्ट पचनीं पडावयाला, वा अंगवळणीं पडायला सात दिवसांची आवृत्ति पुरी होते कीं नाहीं हें मानसशास्त्रज्ञांनीं प्रयोग करून बघावयाचं काम आहे. तें कांहींहि असो, पण विज्ञानाच्या डोळस युगांतहि माणसाची 'सप्ताहा'वर श्रद्धा कायम आहे असें दिसतें!

नाहीं म्हटलं तरी मनुष्य कर्मकांडाचा भोक्ता आहे, यांत शंकाच नाहीं. सोमवारचं मौन पाळावयाची प्रथा मागें पडली असेल, पण त्याची जागा आतां 'सौजन्य-सप्ताहा'नं घेतलेली दिसते. गुरुचरित्राचा नि भागवताचा 'सप्ताह' बंद झाला असेल, पण त्या जागीं एखादा 'राष्ट्रीय' सप्ताह आलाच आहे. पालखींतून बालाजीची निघणारी मिरवणूक देवळाच्या चतुःसीमेंत मर्यादित झाली असेल, पण 'बचत' योजना मिरवणुकीला सारें शहर मुक्तद्वार झालें आहे. (मंगळवारीं–शुक्रवारीं एक धान्य वा एक-

भुक्त धार्मिक कारणांनीं नसलं तरी राष्ट्रीय कारणांनीं लोक करूं लागले आहेत. ) वनमहोत्सव, ग्रामसुधार सप्ताह, दारूबंदी सप्ताह, लोकशिक्षण सप्ताह! चतुर्वर्ग चिंतामणी या ग्रंथांत हेमाडपंतानें ३६५ दिवशीं दिवसाकांठीं करायला दोन-चार तरी व्रतें सांगितलीं आहेत म्हणून एकीकडे त्याचा आम्ही उपहास करतों आणि दुसऱ्या बाजूनें वर्षाच्या ५२ आठवड्यांची तरतूद होईल असे ' सप्ताह ' निर्माण करतो.

या सप्ताहांना कुणी विरोध करील असें मला वाटत नाहीं. तें एक प्रकारचें ' व्रत 'च आहे. आणि व्रत हा श्रद्धेचा भाग आहे. मात्र जुन्या व या नव्या व्रतांत खूपच तफावत आहे. हीं व्रतें व्यक्तीला समाजाभिमुख करतात, हें मी जाणून आहे. पण व्रतांचा उपयोग व्यक्तीला अंतर्मुख बनविण्यासाठीं असतो, असं मला तरी वाटतं. आपल्या कर्तव्याचं, ब्रीदाचं स्मरण वा चिंतन हा त्यांचा महत्त्वाचा भाग. नाहींतर सौजन्य सप्ताह नि वाहतुक सप्ताह यांना दुसरा अर्थ कोणता ? सप्ताह वा व्रत हें एक जागृतीचं साधन आहे. जुन्या व्रतानं माणसं स्वतः जागीं होत वा राहात, आणि हीं नवीं व्रतं दुसऱ्याला जागं करतात, हें त्यांच्यातील मोठं अंतर आहे; आणि हें सप्ताह माझ्यासारख्यांना खटकतात नेमकें याच कारणासाठीं. आपण झोंप घेत पडून दुसऱ्याला जागं करण्याची एक फॅशन होत चालली आहे. ' जागृति ' ' उद्बोधन ' हीं सोज्ज्वळ नांवं आहेत. पण या प्रकारांचं ' असली स्वरूप ' नि उद्देश म्हणजे ' प्रचार ' नि ' जाहिरात. '

लोकशाहींत ' प्रचार ' हा नागरी हक्कांतला फार महत्त्वाचा हक्क मानला जातो. आणि जाहिरात ही तर या युगांतली साहित्य-सम्राटांच्या शब्दांत ' पंधरावी ' विद्या आहे. ( या विद्येतील ' पंधरा ' या संख्येचा ' सुवर्ण मोहराशीं ' असलेला संबंध न. चिं. केळकरांना अभिप्रेत होता कीं नाहीं कोण जाणे ! ) आणि वर्तमानपत्र—मासिकें याचं तिच्याशिवाय ' पान ' हालत नाहीं हेंहि खरं आहे. पण हें सप्ताह साजरें करतांना व करवितांना या प्रचार—जाहिरात कार्यांत आपण कोणाला किती राबवितों, याचा विचार कुणी कधीं केला आहे काय ?

कुणाहि सुबुद्ध प्रतिष्ठित नागरिकाला आणि सरकारी कर्मचाऱ्यांपैकीं वरिष्ठ अधिकाऱ्यांपासून पट्टेवाल्यांपर्यन्त कोणाहि ' महाशयां 'ना विचारा कीं,

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ..................
क्रमांक नों. दि: ..................

आजपर्यन्त स्वातंत्र्यानंतर जवळजवळ एक तपाच्या काळांत साजऱ्या झालेल्या शें-पाऊणशें सप्ताहांपैकीं किती सप्ताहांत नि मिरवणुकांत मनःपूर्वक आपण सामील झाला होता ? मला खात्री आहे तो तुमची गणना वेड्यांत करील. तो म्हणेल, 'अरे बाबा, हा सप्ताहाचा मामला म्हणजे देशभक्तीचा भाग आहे. हें देशभक्तीचें बाळकडू बालकांना पाजायचं असतं नि तें पाजण्याची जबाबदारी ज्ञानामृत पाजण्याचं काम ज्यांनीं शिरावर घेतलं आहे त्या शिक्षकांची आहे. आम्ही जर असे सप्ताह-मिरवणुकांतून मिरवूं लागलों तर कार्यालयांतलं–दुकानांतलं काम कोण पाहील ? राष्ट्राच्या गाड्याला खीळ पडेल ना ! शिवाय मिरवायची हौस असते मुला-मुलींना !' काय आहे कीं नाहीं बिनतोड जबाब ? तेव्हां सप्ताह-मिरवणुकीसाठीं हुकमी सैन्य म्हणजे बालचमू !

भावी पिढीची चिंता वाहणाऱ्या पालकांनीं व नागरिकांनीं पुढें येऊन विद्यार्थी-शिक्षकांची ही 'वेठगिरी' थांबविली पाहिजे. त्या त्या वयांतील विद्यार्थ्यांना राष्ट्रविकासाच्या योजनांचें देतां येईल तें ज्ञान सक्रिय द्या; शाळेच्या आवारांत द्या; घराच्या परिसरांत द्या; पण तें कृतियुक्त ज्ञान द्या. त्यांतून कांहीं निर्मिति होईल अशा रीतीनें द्या. अशा गोष्टींचें स्वागतच होईल. पण ज्यांतून कांहीं निष्पत्ति नाहीं, अभ्यासांत व्यत्यय मात्र भरपूर अशा मिरवणुकांपासून आमच्या विद्यार्थ्यांचा बचाव व्हावयास पाहिजे. आधींच अस्थिर व चंचल अशीं मनें स्थिर कशीं बनवावयाचीं याचा बिचाऱ्या शिक्षकांना पेंच पडलेला असतो. त्या अस्थिरतेला आवाहन देणारे हे प्रकार कमी व्हायला हवेत. पण तसे व्हायला 'मिरवणूक काढली कीं सप्ताह साजरा झाला,' ही स्वतःची व इतरांची फसवणूक करणारी जी समजूत आहे वा ढोंग–धत्तुरेबाजी आहे, तिच्यांतूनच आम्ही आमची सुटका करून घ्यायला हवी. प्रत्येक सप्ताहाच्या आरंभीं 'महागणपति-पूजना' सारखी जी मिरवणुकांची प्रथा आहे, ती बंद व्हायला हवी. मिरवणुकीचें हें तंत्र मध्ययुगाइतकेंच जुनें झालें आहे असें म्हणायला हरकत नाहीं. जेव्हां एखाद्या सप्ताहाचा कार्यक्रम ठरवितांना प्रथम मिरवणूक काढावयाची असा कार्यक्रम सुचविला जातो, तेव्हां नक्की समजावें, ह्या 'कार्यकर्त्यांना' या

कार्यक्रमापासून सर्वस्वी अलिप्त राहावयाचें आहे. तेव्हां त्यांच्या या तंत्रापासून शाळाचालकांनीं सावध राहणें अगत्याचें आहे. मिरवणुका न काढतां कार्य–प्रचार, कार्य–होतें व किती भरघोस यश त्याला येतें याचा एकदां धडाडीनें व धिटाईनें प्रयोग करूं या.

विद्यार्थ्यांच्या बेजबाबदार वर्तनाची मीमांसा मोठमोठीं माणसें आज करीत आहेत. त्यांत हा एक सूर आहेच कीं, स्वातंत्र्यपूर्व काळांत संप, हरताळ, मोर्चे यांच्या कामीं विद्यार्थ्यांचा जो वापर करण्यांत आला, त्यामुळें त्यांच्यांत एक प्रकारचा, ‘उच्छृंखलपणा’ व बेछूटपणा आला आहे. या विधानांत कांहीं तथ्यांश आहे असें आम्ही मानीत असूं तर या प्रचारकी सप्ताहांतील मिरवणुकांपासून विद्यार्थ्यांना अलिप्त राखण्याची आजच्या सरकारची जबाबदारी आहे कीं नाहीं ?* रस्त्यानें घोषणा करीत हिंडणें यापलिकडे मिरवणुकांचें उद्दिष्ट कोणतें आहे ? विद्यार्थ्यांच्या दृष्टीनें मोर्चा आणि मिरवणुका यांत तफावत फारच थोडी आहे. नि त्यांतील घोषणांचा अर्थ तर राहूं द्या पण मिरवणुकीचा उद्देशहि कितींना कळलेला व कळण्यासारखा असतो ? आणि कळला तरी अशा कामीं त्यांनीं आपला वेळ घालविणें आपल्याला सर्वच बाजूंनीं परवडेल काय ?

आपल्या राष्ट्रासमोर विकासाच्या असंख्य योजना आहेत. वनमहोत्सव, ग्रामसुधार, बचतयोजना या त्यापैकींच. त्यांचें महत्त्व विद्यार्थी-दशेंत कांहीं अंशीं कळायला हवें हेंहि कबूल. पण तें कार्य मिरवणुकांनीं होणारें नाहीं. खरी गरज आहे कृतीची, कृतियुक्त ज्ञानाची, कृतिपूर्व संस्काराची, पण त्यांची नांवगोष्ट नाहीं. गेल्या दहा वर्षांत कोणत्याहि शाळेचें आवार पांच-पंचवीस झाडांनीं पुष्पित, सुफलित झालेलें दिसत नाहीं. कोणत्याहि खेड्यांत ग्रामीण व्यवसायाची जोपासना करायला पांच-पंचवीस विद्यार्थी पुढें आलेले दिसत नाहींत. आरोग्याच्या संवयींत तसूभर परिवर्तन नाहीं आणि या सर्वांचें कारण एकच. आम्ही देखाव्याचे भुकेले बनत आहोंत. मृगजळांनीं आमची तृप्ति होत आहे !

* * *

---

* अलिकडेच शिक्षणखात्यानें परिपत्रक काढून सप्ताह साजरे करणें ही बाब ‘ऐच्छिक’ केली आहे.

# गणराया, पालकांना सुबुद्धि दे !

पुढील आठवड्यांत श्रीगणरायाची स्वारी वाजत-गाजत, मिरवत घरोघर येईल. सनया तुताऱ्यांच्या सुरांत त्यांचें स्वागत होईल. गांवांतील एखादी धूळ खात पडलेली पालखी पुनः लोकांच्या खांद्यावर चढेल. तालमीच्या कोपऱ्यांत स्तब्ध होऊन बसलेल्या लेझिमी पुनः खळखळूं लागतील. रस्तोरस्तीं गुलाल शिंपडला जाईल. मिरवणुकींत दाखल होऊन कपाळीं गुलाल माखून घेण्यांत व इतरांना माखण्यांत बालकांप्रमाणें प्रौढांनाहि उन्माद चढेल व अभिमान वाटेल. केवडा-कमळांचा सुगंध चहूंकडे दरवळेल. बँडचे खडे सूर गणपति बाप्पांच्या आगमनाची द्वाही सर्वत्र फिरवतील. सारें वातावरण गणराजांच्या जयघोषानें दुमदुमून जाईल. आजकालचा जयहिंद घोष वगळला तर आषाढी—कार्तिकीच्या निमित्तानें उठणारा ग्यानबा तुकाराम या सामुदायिक नामघोषाच्या खालोखाल महाराष्ट्रांत तरी कोणत्या जयघोषाचा क्रम लागत असेल तर तो गणपति—बाप्पांच्या नामघोषाचाच. कारण महाराष्ट्रांतील आबालवृद्ध जनता या उत्सवाच्या निमित्तानें जेवढी एकत्र येते, तेवढी अन्यथा क्वचितच येते. दुसऱ्या कोणत्याच सांस्कृतिक कार्यक्रमासाठीं वा उत्सवासाटीं ती अशी जमत नाहीं.

हिंदुधर्मात मूर्ति-पूजेचे अनेक प्रकार आहेत. पंथ आहेत व उत्सवहि आहेत. त्यांचे उपासक त्यांना सामुदायिक व विशाल स्वरूप देण्याचा प्रयत्न करतातहि. पण त्यांत त्यांना फारसें यश आलेलें नाहीं. पण लोकमान्यांच्या प्रयत्नानें व पुण्याईनें गणरायांचा उत्सव धार्मिकतेच्या चौकटींत बंदिस्त न राहतां संकुचिततेच्या व सांप्रदायिकतेच्या सीमा ओलांडून ‘ सामाजिक ’ व ‘ सार्व-

जनिक ' बनला आहे. हें भाग्य दुसऱ्या कोणत्याहि उत्सवाला लाभलेलें नाहीं. तशी आतां गरजहि नाहीं. पण ही ' सामाजिकता ' केवळ कांहीं संस्थांच्या वा शहरीय विभागांच्या उत्सवापुरती मर्यादित राहाण्यांत तिची कृतार्थता नाहीं. शिवाय, केवळ 'जमाव' गर्दी म्हणजे 'समाज' नव्हे. खूप मोठ्या गर्दीनें एखादा उत्सव साजरा झाला. केवळ अनेकांनीं आपली वर्गणी दिली, एवढ्यानें तो उत्सव सामाजिक व सार्वजनिक होत नाहीं. सामाजिकतेला विचारांची, ध्येयांची, उद्दिष्टांची एकता, एकात्मता लागते. सहविचार आणि सह-अनुभव यांची बैठक लागते. तिचा आरंभ कुटुम्बांतून करतां येईल. व्यक्ति आणि समाज यांचा दुवा कुटुम्ब जोडीत असतें. म्हणून या सामाजिकतेला आरंभ कुटुंबांतून व्हावा, तेथें ती पोसली जावी हें कुटुंबसंथेचें प्रयोजन आहे व कार्य आहे. तें सफल व्हावें, म्हणून गणरायाच्या पदरवाची चाहूल लागली असतांनाच प्रार्थना करावीशी वाटते कीं, हा बुद्धिदाता पालकांना सुबुद्धि देवो !

उत्सव म्हटला कीं, मुलांच्या, युवकांच्या उत्साहाला भरतें यावें हें स्वाभाविक आहे. नित्यक्रमाचें स्वरूप बंधनांनीं इतकें जखडून टाकलें आहे कीं, ते पार पाडतांना पिंजऱ्यांत अडकलेल्या पक्षांप्रमाणें आमचीं मनें तडफडत असतात. त्यांतून सुटण्याची संधि तीं आतुरतेनें बघत असतात. सण-सुटी म्हणजे सुटका वाटावी असाहि कदाचित् नित्याच्या तोच–तो–पणाचा कंटाळा आल्यानें मनुष्य-स्वभाव बनला असेल. मनुष्य-मन नावीन्याचें भुकेलें आहे. वातावरणांत थोडाहि बदल झाला कीं त्या इवल्याशा नावीन्यानें त्याचा शीणभार हलका होतो. उत्साहाला पुनः टवटवी येते. पण पालकांना व युवक–युवतींना उत्सवाचें आकर्षण वाटतें तें केवळ या बदलांसाठीं, नावीन्यासाठीं नव्हे. त्यांत त्यांच्या उत्साहाला कृतिशीलतेला अवसर मिळण्याची ' संभाव्य शक्ति ' असते म्हणून. त्यांना आरडाओरडा करायला, अनिरुद्ध संचाराला संधि उत्सवांतच मिळते. एरवी कुणी तासनूतास गाणीं म्हणूं देणार नाहीं, पत्ते ' कुटूं ' देणार नाहीं, फुगड्या खेळूं देणार नाहीं. रात्र रात्र जागूं देणार नाहीं. पण उत्सवाच्या निमित्तानें हें सारें शक्य होतें. सवलती मिळतात. परवाने लाभतात. ' निधर्मी ' व ' कायदेबाज ' सरकारहि जेथें आपले निर्बन्ध सैल करतें, तेथें कुटुंबांतील प्रेमळ–वत्सल

मनें जरा अधिक उदार धोरण स्वीकारूं लागलीं तर नवल नाहीं. पण केवळ उत्सवाच्या निमित्तानें स्वैरस्वातंत्र्य दिल्यानें कुटुंबांची जबाबदारी संपणार नाहीं. केवळ मुलांच्या गर्दींत, मेळाव्यांत मुलें सामील झाल्यानें त्यांच्यांत 'सामाजिकता' येत नाहीं. त्यासाठीं सुव्यवस्थित कार्यक्रमच हवा. कांहीं योजनाबद्धताच हवी. म्हणून गणरायांच्या आगमनाच्या नौबती झडूं लागलेल्या पाहतांच, प्रार्थना करावीशी वाटते कीं, बुद्धिनायका पालकांना सुबुद्धि दे.

उत्सवाचीं मुख्य आकर्षणें दोन. त्यांतली आरास आणि त्यांतली करमणूक. या दोन्ही गोष्टी खरें पाहिलें तर व्यक्ति–विकासाला, सामाजिकतेच्या परिपोषाला उपकारक आहेत, पण त्यांचा कौशल्यानें उपयोग केला तर. पूर्वीं गणपति उत्सव म्हटला ( किंवा घरांतला अन्य देवतेचा उत्सव म्हणला ) कीं त्यांत करण्यासारख्या किती तरी गोष्टी असत. भिंती रंगवणें, चित्रें, रंगावली काढणें, कामट्यांचीं मखरें बनविणें, चित्रांची सजावट करणें, इत्यादि अनेक गोष्टी असत. त्यांत कांहीं गोष्टी परंपरागत-रीतीनें केल्या जात. कांहींत स्वतःचें कौशल्य दाखविलें जाई. या गोष्टी बहुधा घरोघर होत व त्यामुळें प्रत्येकाला आपलें स्वत्व प्रगट करण्याला वाव असे. प्रत्येकाच्या हाताला, डोक्याला कामें असत. उत्सव सामुदायिक झाले तरी या गोष्टी सामुदायिक सहकार्यानें घडवितां येतील. पण दुर्दैवानें कुटुम्बनिहाय उत्सवांची परंपरा लोपत आहे. जवळ जवळ लोपली आहे आणि आळींतल्या उत्सवांची सजावट ठेकेदारांकडे गेली आहे. सजावटीच्या कलेचें 'केन्द्रीकरण' झालें आहे. त्यामुळें असंख्य चिमुकल्या हातांना काम उरलेलें नाहीं. त्यांच्या कल्पनेला पंख फुटायला ऊबदार वातावरण नाहीं. आज अनेक मुलें शाळेंत हस्तव्यवसाय शिकतात. उत्कृष्ट चित्रकला शिकतात. पण त्यांच्या गृहजीवनांत, गृहव्यवस्थेवर त्याचा ठसा उमटलेला दिसत नाहीं. शाळेंत झालेल्या संस्काराचा ( impression ) घरांत आविष्कार (expression) नाहीं. त्यामुळें या 'शालेय' विषयांचें जीवनांतील स्थान व महत्त्व मुलांच्या लक्षांत येत नाहीं. त्यामुळें सार्वजनिक उत्सवांत मुलांना एकच काम उरतें, तें म्हणजे 'बघेगिरी' चें. त्यामुळेंच उत्सावांत झुंडीच्या मानसशास्त्रांतील सारे प्रकार कमी-अधिक प्रमाणांत दृग्गोचर होतात.

गणपतिउत्सवासारख्या उत्सवांत आपल्या घरांतील मुलांनीं व वाड्यांतील वा गल्लींतल्या मुलानीं एकत्र येऊन ४–५ दिवसांचा उत्सव पार पाडावा, कौशल्यपूर्वक आरास रचावी, आजचें वैज्ञानिक ज्ञान व उपकरणें यांचें साहाय्य घेऊन त्याची खुलावट वाढवावी, अनेक तपशीलांचा भाग एकत्र येऊन सहकार्यानें ठरवावा, असें सक्रिय प्रोत्साहन पालकांनीं आपल्या मुलांना दिल्याशिवाय मुलांमध्यें 'सामाजिक भावना, समाजशील वृत्ति रुजतील, बाणतील काय? आज आम्ही पुढारीपणाबद्दल सर्वत्र ओरड ऐकतों. पण 'संघटन' वाढविण्याचा कोणता विधायक प्रयत्न करतों? बालगोपाळांच्या लहान लहान अनौपचारिक 'मंडळ्या' एके काळीं अशा उत्सवासाठीं असत. मुलां-मुलींमध्यें जर सामाजिक जीवनाबद्दल आस्था निर्माण करावयाची असेल तर सामाजिक वातावरणांत वागण्याचें बाळकडू त्यांना पाजल्यानेंच ती उत्पन्न होईल. हा उत्सव–कार्यक्रम 'आपला आहे' अशी आपुलकी वाटावयास लावण्यासाठीं त्यांनीं आपला कांहीं श्रमाचा, शक्तीचा, बुद्धीचा भाग त्यासाठीं अर्पण करायला हवा. तसा करीत असतांनाच सामाजिक समतास्थापनेचें, परस्परांशीं मिळवून–जुळवून–सांभाळून वागण्याचें शिक्षण नकळत पण अनुभवानें त्यांना मिळतें. ही गोष्ट पालकांना दृष्टिआड करून चालेल काय? म्हणून विघ्नहर्त्यांच्या आगमनाची वार्ता कळतांच प्रार्थना करावीशी वाटते कीं, हा सुखकर्ता पालकांना सद्बुद्धि देवो!

*　　　*　　　*

जी गोष्ट आराशीची तीच करमणुकीची. करमणुकीच्या साधनांबद्दल–माध्यमांबद्दल 'विधायक' दृष्टि देणें ही आजची गरज आहे. ज्या पिढीला 'नका खेळ खेळूं अहो गंजिफांचे! नको खेळ गादीवरी बैसण्याचे!' म्हणून पाठ्यपुस्तकांतून आवर्जून उपदेश केला होता, त्या पिढींत पत्त्यांच्या विविध व 'साहसी' खेळांचें केवढें प्राबल्य आहे, हें सर्वांना ठाऊक आहे. करमणुकीसाठीं–मनोविनोदासाठीं जर सारेच हपापलेले असतात, तर मुलांना तशी संधि देणें व निकोप करमणुकींच्या साधनांची जोपासना करणें ही जबाबदारी कुणाची? पत्ते आणि सोंगट्या

यापेक्षां बुद्धिबळें व कॅरम यांच्यांत अधिक कौशल्य आहे याची जाणीव मुलांना होणें अगत्याचें नाहीं काय ? काव्य–संगीताची, नकला–नाट्य–नृत्याची गोडी 'उजळ माथ्यानें' मुला-मुलींना लागावी याबद्दल आम्ही सोत्सुक आहोंत का ? आमच्या मुलांचे-मुलींचे स्नेहसंबंध कुणाशीं कसे आहेत याची पालकांना माहिती असते काय ? उत्सव म्हणजे आपल्या मुला-मुलींना आपल्या घरांतच मित्र-मैत्रिणींच्या परिवारांत मोकळेपणें वावरूं देण्याला, नियंत्रणपूर्वक स्वातंत्र्याच्या वातावरणांत मोकळेपणीं वाढायला, त्यांच्या अभिरुचीला वळण लावायला एक अमूल्य संधिच नाहीं का ? हें पालकांना समजत नसेल का ? नसेल तर त्यासाठीं प्रार्थना करावीशी वाटते कीं, 'हा दुःखहर्ता पालकांना सद्‌बुद्धि देवो.'

* * *

हरतालिका, गणेशचतुर्थी, ऋषिपंचमी व गौरीपूजन हे चार उत्सव म्हणजे मुली, मुलगे, प्रौढ पुरुष व गृहिणी अशा कुटुंबांतील सर्वांचे, व्यक्तिशः प्रत्येकाचे पण इतरांच्या हातभारामुळें कुटुम्बांतील सर्वांचे उत्सव. केवढा गडबडीचा, उत्साहाचा, आनंदाचा काळ. पण कां कुणास ठाऊक आम्ही हा उत्सव 'मामुली' स्वरूपांत यांत्रिक रीतीनें 'हाताळतों' उपभोगीत नाहीं. प्रौढांची उदासीनता मुलांत संसर्गानें व अनुकरणानें निर्माण झाली आहे. त्यांच्या उदासीनतेचें सावट धाकट्यांच्या मनावर पडलें आहे. महागाई, व्यवसाय धंद्याचें काम या साऱ्या व्यर्थ सबबी आहेत. महागाई व व्यवसाय तर जन्माचेच सोबती आहेत. मग काय सारें जीवन 'चिंतातुर जंतू' प्रमाणेंच आम्ही जगणार आहोंत ? याचा अर्थ असा आहे कीं आम्हांला जीवनांत 'प्रमाणबद्धता' व 'समतोल' साधत नाहीं. जीवनांतील बहुविधतेची आम्हांला जाणीव नाहीं. या एकांगीपणामुळेंच जीवन एकलकोंडेपणें आम्ही जगत आहोंत. ही 'असामाजिकता' आमच्या विकासाला पायबंद घालीत आहे. निदान पुढच्या पिढीला तरी आमच्या प्रौढांच्या दोषांचा संसर्ग लागूं नये. यासाठीं कुटुम्बांतील उत्सवांत सामाजिक वातावरण प्रकर्षानें निर्माण व्हावें. तरुण पिढींतली भाविकता, श्रद्धा, आदर कमी झाली आहे, अशी केवळ

कुरकुर करण्यांत अर्थ नाहीं. या गोष्टी, या मनो-वृत्ति बौद्धिक शिक्षणानें येत नाहींत. शाळांनाच जबाबदार धरण्यांत अर्थ नाहीं. ह्या तऱ्हेचे इष्ट वाटणारे भावसंस्कार विशिष्ट वातावरणांतच निर्माण होतात. घरगुती उत्सव–समारंभ गंभीर, सुस्वर प्रार्थना, सुन्दर, स्वच्छ, पूजा–अर्चा विधि यांच्या साह्यानें शांत गंभीर वातावरणांत पार पाडणें हा त्यासाठीं फार महत्त्वाचा भाग आहे. ख्रिस्ती लोकांच्या प्रार्थना, रा. स्वयंसेवक संघाचें गुरुपूजन समारंभ हे या दृष्टीनें पाहण्यासारखे असतात. तरुण पिढीचें हें भावसामर्थ्य वाढविण्यासाठीं तरी हा सर्वगुणांचा गणाधीश पालकांना सद्बुद्धि देवो !

* * *

# ‘ मानव तितुका एकच आहे. ’

दहा डिसेंबर हा ‘ मानव-हक्कदिन ’ म्हणून पाळला जातो; २४ ऑक्टोबर हा युनो-दिन म्हणून पाळला जातो; त्याचाच हा पूरक दिन. कुठल्याहि विचाराचें मनोवृत्तींत रूपांतर व्हायला त्याला चिंतनाच्या कक्षेंतून कृतीच्या क्षेत्रांत आणावें लागतें. त्यासाठीं कार्यक्रम असतात. दिन ‘ साजरा ’ करण्यापेक्षां, तो भूषविण्यापेक्षां, तो ‘ पाळला ’-सांभाळला, जतन केला, तर तो जीवनाचा भाग बनेल. विचार समजून घेणें हें ‘ ज्ञान ’, कृतींत उतरविणें हें ‘ कर्म ’ व त्याबद्दल निष्ठा असणें ही भक्ति. या तिन्हींची ‘ मानव-हक्क दिना ’ साठीं गरज आहे.

*　　　*　　　*

अंगदशिष्टाई यशस्वी झाली असती, तर राम-रावणाचें अनुपम युद्ध टळलें असतें. श्रीकृष्णशिष्टाई यशस्वी झाली असती, तर अठरा अक्षौहिणी सैन्य कुरुक्षेत्रावर चिरनिद्रा घेत पडलें नसतें. कुलक्षय टळला असता नि यमुनेचें काळें पाणीहि मानवाच्या समजुतदारपणानें उज्ज्वल होऊन गंगाफेनाला त्यानें लाजविलें असतें. या कथा इतिहासजमा झाल्या असल्या तरी ‘ मानवाला ’ हें जमलें नाहीं ही त्याची सल अद्याप कायम आहे. निकिता क्रुश्चेव्ह आणि आयसेनहॉवर यांच्यांत मत-मिळणी झाली तर तिसऱ्या जगड्व्याळ व विश्वसंहारक युद्धाचें संकट टळेल या आशेवर आज सामान्य मनुष्य जगत आहे. राम-रावणांचें युद्ध लंकेच्या परिसरापुरतें मर्यादित होतें. अठरा अक्षौहिणी सैन्याला कुरुक्षेत्राची लक्ष्मणरेषा घातली होती. विश्व-लयाचें कार्य अंगावर घेतलेल्या महारुद्रानें तिसरा डोळा उघडला पण त्यांत फक्त एका व्यक्तीची-रतिपतीची आहुति पडली नि ‘ अनंग ’ होऊन

तो फिरून जिवंत राहिला नि अमर झाला तें वेगळेंच, पण तिसरें महायुद्ध 'भस्मासुरी घाला' ठरणार आहे. अग्न्यस्त्र, सर्पास्त्र, गरुडास्त्र, यांपेक्षां वेगळेंच अस्त्र मानवानें निर्माण केलें आहे. या अस्त्राला नांव द्यायचें असेल तर ते 'अजगरास्त्र' द्यायला हवें. हा 'अजगर' सर्वभक्षक आहे. अनेक उल्कापात घडविण्याचें सामर्थ्य त्याच्यांत आहे. 'जगत् कृत्स्न सचरा-चरम्' चुटकीसरसें त्याच्या भक्ष्यस्थानीं पडणार आहे. मानव 'कल्मषपाद' होऊन स्वतःला जाळायला सिद्ध झाला आहे. हजारों वर्षांची तपश्चर्या झिजून-राबून जोपासलेली संस्कृति होती कीं नव्हती असें ठरणार आहे. कोटिकोटि ग्रहगोलांत एका धूलिकणाप्रमाणें असणारी पृथ्वी अंतरिक्षांतील खरोखरच 'धूमः ज्योतिः सलिल-मरुतां संनिपात' धूप, तेज, पाणी यांचा एक गोळा ठरणार आहे. आणि या आत्मसंहारांतून फिनिक्स पक्षाप्रमाणें नव-जीवनाची आशा नाहीं ती नाहींच. आणि याचें कारण एकच—मानव तितुका एकच आहे; या साध्या, सरळ, धोपट, सत्याची जाणीव न ठेवणें, आपल्यावरून जगाची परीक्षा न करणें, परदुःख शीतल असणें !

* * *

रावणानें स्वतःच्या आकांक्षेसाठीं असंख्य स्वजनांचा बळी दिला, कारण तो हुकुमशहा होता. दुर्योधनानें अकरा अक्षौहिणी आपल्या बाजूनें उभ्या केल्या. कारण तो 'अरेराव' होता. हिटलरनें एका पिढीचा होम केला. कारण तो सर्वाधिकारी होता. पण असे अरेराव, हुकूमशहा, सर्वाधिकारी अखेर जनताच निर्माण करीत नाहीं काय? सामान्य जनता जेव्हां आपली विचार-शक्ति नेत्याकडे गहाण ठेवते, तेव्हां नेता 'शिरजोर' होतो. सामान्य जनताच जेव्हां त्याला फूस देते, तेव्हां तो डोक्यावर बसतो. त्याच्या आकांक्षांना जेव्हां वेळींच पायबंद घातला जात नाहीं, तेव्हां तो जनतेला पायदळीं तुडवितो. जनता जेव्हां विभूति-पूजक बनून त्याला डोक्यावर घेते, तेव्हां तो सर्वांच्या डोक्यावर मिरे वाटतो. जनता जेव्हां जेव्हां 'मुकी बिचारी कुणी हांका' अशी मेंढरू बनते, तेव्हां तो 'वाघ' होऊन त्या 'मेंढरा'ला गिळंकृत करतो. असे हुकूमशहा नि अरेराव केवळ राजकीय पक्षांतच नसतात, ते धर्मकारणांत असतात. समाजकारणांत

असतात. ते वॉल्स स्ट्रीटवर असतात, चौपाटीवर असतात, काळबादेवीवर असतात, भेंडीबाजारांत असतात, तसेच मलबार हिलवर असतात, नगर-पालिकांच्या राजकारणांत असतात, साहित्य परिषदेच्या संमेलनांत असतात, व शिक्षणाच्या पवित्र प्रांगणांत असतात. जेथें जेथें विचाराचा मक्ता मलाच आहे, निर्णयाचा निधि माझीच बुद्धि आहे, न्यायाचा तराजू मीच तोलायचा आहे, असें मानलें जातें, तेथें तेथें अरेरावी असते, हुकूमशाही जन्माला येते आणि त्याचें कारण हेंच, आम्ही इतरांची प्रतिष्ठा पाळीत नाहीं. इतरांच्या आकांक्षांची ओळख ठेवीत नाहीं, इतरांच्या बुद्धीची कदर करीत नाहीं. आम्ही विसरतों–' मानव तितुका एकच आहे. '

*   *   *

' महजब नहीं सिखाता आपसमें बैर रखना ' हें जितकें खरें, तितकेंच देशभक्ति युद्धाची शिकवण देत नाहीं, हेंहि खरें. ' माझा देश, माझा देश ' म्हणून अभिमान बाळगणें, आत्मीयता राखणें वेगळें आणि सर्वोपरि तोच विराजेल, विराजण्याचा त्याचाच मान, म्हणून गर्वोद्धत होऊन गर्जना करणें वेगळें; पण कधीं सत्तेच्या लोभांतून तर कधीं रक्ताच्या अतिरंजित अभिमानांतून, कधीं व्यक्तिगत मानापमानाच्या कल्पनांतून तर कधीं स्वतःचें तत्त्वज्ञान विश्वविजयी व्हावें या भावनेंतून, मानवाची सारासार शक्ति लोपली आहे, बुद्धि अंध झाली आहे, विकाराची ती बटीक बनली आहे असा प्रत्यय येतो. प्रत्येकाला त्याचा धर्म प्यारा असतो, कर्म प्यारें असतें, घर प्यारें असतें, ही जाणीव नाहींशी होते. ' प्यारें असतें ' म्हणजे चांगलें वाटतें. चांगुलपणाचा मक्ता कुणा एका वंशाला, गणगोताला, कुळाला, भाषेला, देशाला मिळालेला नाहीं. तसा कुणी हक्क सांगूं नये. दावा करूं नये. संस्कृति आचारापेक्षां विचारांत असते, अभिरुचींत व्यक्त होते आणि जितक्या व्यक्ति तितक्या तऱ्हा असतात–असूं शकतात; पण भिन्नता म्हणजे विरोध नव्हे, वैर नव्हे. एकाच मातींतून हरतऱ्हेचीं फुलें उमलतात, पिकें पिकतात; तसेंच मानवी अंतःकरणाचें आहे. त्यांतून प्रकट होणारे आविष्कार विविध असतील, अनंत असतील, पण त्यांतील भावना, आकांक्षा, सुखदुःखें यांचें स्वरूप एकच. पण मुळांतील एकतेचा

विसर पडतो. मग ‘ पर ’ म्हणजे ‘ अन्य ’ राहत नाहीं, तो लगेच ‘ परका ’ म्हणजे संशयास्पद बनतो ! परका म्हणजे धोका ! ! तो आक्रमण करील ही भीति वाटते. तो माझें सर्वस्व हरील म्हणून मन शंकाकुल बनतें. एका बाजूला ‘ स्व ’चा अहंकार. दुसऱ्या बाजूला ‘ परा ’बद्दलची भीति. दोन्ही अज्ञानाचीं रूपें ! त्याच्या मुळाशीं आहे एका जाणीवेचा अभाव. आणि ती म्हणजे—‘ मानव तितुका एकच आहे. ’

*　　　*　　　*

नव्या पिढीला या जाणीवेची, या मंत्राची शिकवण देण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. जगानें शांततेनें, प्रेमानें एकत्र नांदायचें असेल तर ही वृत्ति बालपणापासून बनत गेली पाहिजे. हा अमक्या जातीचा म्हणजे घाणेरडा असणार, तो तमक्या जातीचा म्हणजे लबाड असणार, अशा गोष्टी स्वतःला उच्चकुलीन मानणारीं कुटुंबें मुलांच्या मनावर लहानपणींच बिंबवतात. जाती–वंश–धर्म यांच्या भेदाबरोबर विभक्तपणाचे, विरोधाचे, वैराचे धडे लहानपणींच मिळतात. अमक्याच्या हातचें खाऊं नये, तमक्याच्या घरीं पाणी पिऊं नये, अमक्यासारखा पोषाख करूं नये, ही शिकवण देतांना दुसऱ्याला हीन लेखण्याची, दुसऱ्याबद्दल विद्वेषाची वृत्तीच प्रायः भिनवली जाते. ‘ युद्धाचें बीज ’ केवळ युद्धाच्या अंतांतूनच फुटत नाहीं. हीं बीजें माणसाच्या मनांत रुजवलीं जातात. युद्धें आधीं मनांत जन्माला येतात नि मग बाहेर प्रकटतात. म्हणून नव्या जगाच्या निर्मितीसाठीं नव्या मनोरचनेची निर्मिति आवश्यक होऊन बसली आहे. तिचा मंत्र एकच —‘ मानव तितुका एकच आहे. ’

*　　　*　　　*

या नव्या मंत्राचा ‘ ऋषि ’ स्वतः मानवच आहे. त्याची ‘ देवता ’, त्याचा ‘ छंद ’ सहकार–स्नेह आहे. त्याचें ‘ ध्यान ’ बंधुता आहे. सर्व मानवांना जगांत समान प्रतिष्ठा असली पाहिजे. मानव जाति, वंश, धर्म-वर्ण या गोष्टीनें नव्हे तर ‘ मानव ’ म्हणून ओळखला गेला पाहिजे. हा त्या मंत्राचा अर्थ आहे. त्यांत मानवी स्वातंत्र्याची प्रेरणा आहे. मानवी समानतेची भक्ति आहे, सर्वांना समान न्याय मिळावा अशी निष्ठा आहे.

 मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ७ स्थळप्रत.
अनुक्रम ............ वि.

जसा देश तसा वेष बनतो. ती एक भौगोलिक परिस्थितीनें निर्माण केलेली बाब आहे. भिन्न देशांत भिन्न भाषा जन्माला आल्या आहेत नि एकाच देशांत एकाच भाषेचीं अनंत रूपें आहेत. तीं तरी कुठें स्थिर आहेत, पण त्या भिन्न वेषाखालीं झांकलेले देह सारे मानवाचेच असतात. भिन्न वर्णोचारांच्या-भाषांच्या आत्म्यांत प्रकट झालेल्या भाव-भावना आशा-आकांक्षा अखेर मानवीच असतात, ही ओळख पटविणें, पटवून देणें, पटवून घेणें ही अगत्याची गरज आहे. इतरांना समजून घेतलें तर कळेल–' मानव तितुका एकच आहे. '

* * *

युनो, युनेस्को, युनिसेफ या सर्वांचें ध्येय आज हेंच होऊन बसलें आहे. राष्ट्राराष्ट्रांतील कलह मिटवणें, युद्धपिपासु वृत्तीला कह्यांत ठेवणें, युद्धमान राष्ट्रांत मध्यस्थी करणें हीं कार्यें महत्त्वाचीं असलीं तरी तीं अभावात्मक आहेत. त्यांचें भावरूप कार्य आहे नव्या मनोवृत्तीची घडण. आणि म्हणूनच मानवाला संयुक्त राष्ट्रसंघानें–युनोनें–दिलेली मानवी हक्काची सनद सर्वांना समजली पाहिजे. १० डिसेंबर १९४८ ला उद्घोषित केलेल्या या सनदेंत मानव जन्मतःच 'स्वतंत्र' असतो, समान असतो, सर्वांना मूलभूत समान हक्क असतात, अशी ग्वाही फिरविण्यांत आली आहे. बहुतेक लोकशाही राज्य-घटनांनीं स्वतःच्या राज्यघटनेंत अंतर्भूत करून घेतलेल्या जीवित, वित्त, व्यवसाय, कौटुंबिक जीवन, या बाबत सुस्थिरता, संरक्षण व न्याय मिळण्याबाबतच्या हमींचा अंतर्भाव आहे. भाषण, मुद्रण, सभा यांच्या स्वातंत्र्याचा स्वीकार आहे. मतस्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य सर्वांना दिलें आहे. स्वतःच्या देशाच्या राज्यकारभारांत सहभागी होण्याचा हक्क मान्य केला आहे. व्यवसाय निवडण्याचा, व्यावसायिक संघांत सामील होण्याचा, समान कामाबद्दल समान वेतनाचा सर्वांचा अधिकार मंजूर केला आहे. अन्न–वस्त्र-निवारा यांच्या शाश्वतीचें, वैद्यकीय उपचारांचें, वृद्धापकाळांत आजीविकेचें आश्वासन दिलें आहे. शिक्षण देण्याचा व घेण्याचा व समाजाच्या सांस्कृतिक जीवनांत सहभागी होण्याचा प्रत्येकाचा हक्क मान्य केला आहे. पण त्या बरोबरच या सनदेंत प्रत्येकाला आठवण करून दिली आहे कीं, केवळ

स्वतःच्या हक्काची जपणूक केल्यानें नव्हे, तर इतरांच्याहि याच हक्कांबद्दल आदर बाळगण्यानें, जागरूक राहिल्यानें स्वतःचे हक्क उपभोगतां येणार आहेत. या बाबतींत सामाजिक कर्तव्यांचें पालन झटून करायला हवें. कारण समाजांत राहूनच व्यक्तीला आपला विकास करून घेतां येणार आहे.

* * *

यूनोच्या सनदेंतील ३० कलमें काय किंवा भारतीय घटनेंतील २० कलमें काय यांची बौद्धिक नोंद सर्वत्रच केली जाते. खरा प्रश्न येतो तो आत्मनिरीक्षणाचा, व्यवहारांतील मूर्त, सजीव प्रश्न घेऊन त्याच्या अभ्यासाचा. प्रत्यक्ष व्यवहारांत काय चाललें आहे, माणसें व्यक्तिशः वा संघशः कशीं वागत आहेत, स्वतःच्या वासनांना वा विकारांना कशीं अनिर्बंध दौडूं देत आहेत, याचा अभ्यास हाच या तत्त्वाचें मर्म आकलन करण्याचा उपाय आहे. विविध संस्थांनीं एकत्र यावें, विविध जमातींनीं परस्परांत मिसळावें, विविध भाषिकांचें सम्मेलन भरावें, आपल्या परंपरा, आपलें साहित्य यांतील मानव्याच्या पोषणाला उपकारक असणारा भाग परस्परांना सांगावा-ऐकवावा-दाखवावा, आणि बाह्य भिन्नतेच्या अंतर्यामीं एकाच मानव्याचा आविष्कार सदा सर्वकाळ झाला आहे, याचा साक्षात्कार सर्वांना घडवावा. असले कार्यक्रम केवळ सहकार्याच्या, सहजीवनाच्या आनंदासाठींच असावेत. त्यांत स्पर्धांना—पारितोषिकांना वाव नाहीं. स्पर्धा, पारितोषिकांची लालसा यांना सहजीवनांत स्थान नाहीं. स्पर्धा व बक्षिसें यांवर आधारलेली शिक्षणसंस्कार-पद्धति बंदच व्हायला हवी. जगांत भांडवलशाही राष्ट्रांनीं या स्पर्धा-मनोवृत्तीची आजवर जोपासना केली तिचीं कटु फळें जगानें फार चाखलीं. स्पर्धांत जिंकलेल्या ढाली स्वतःच्या अंतःकारणांतील द्वेष व हिंसा झाकणाऱ्या, त्यांचें समर्थन करणाऱ्या ढाली बनतात.

* * *

कृण्वन्तो विश्वं आर्यम्-जगाला आर्य, सुसंस्कृत, ‘ मनुष्य ’ बनवायला निघालेल्या उपनिषद्कालीन ऋषीच्या अंतःकरणांत हीच मानवतेची मंगल ज्योत उज्ज्वल करण्याची कल्पना स्फुरली होती. ‘ अवघें विश्वाचि माझें घर ’ म्हणून भक्तांची वृत्ति वर्णन करणाऱ्या ज्ञानेश्वराचें, ‘ अवघाचि संसार

सुखाचा करीन ' म्हणून प्रतिज्ञा करणाऱ्या तुकोबांचें हृदय याच मानवतेच्या प्रेमानें कांठोकांठ भरलें होतें. ' यत्र विश्वं भवत्येकनीडम् ' हें ब्रीद डोळ्यांसमोर ठेवून शांति-निकेतनाचें मंदिर उभारणाऱ्या व ' अविभक्तं विभक्तेषु ' असें धोरण बाळगून आन्तर भारतीचें स्वप्न पाहणाऱ्या साने गुरुजींचें मन त्याच उदात्तभावानें ओथंबलें होतें. तेंच कार्य पद्धतशीर रीतीनें, राष्ट्राराष्ट्रांतील विचारवन्तांच्या, तज्ज्ञांच्या, शास्त्रज्ञांच्या व समाज-सेवकांच्या सहकार्यानें युनेस्को, युनो आदि संस्था करीत आहेत. त्या साऱ्यांचा मार्ग एकच–' मानव तितुका एकच आहे. '

* * *

# विद्यार्थ्यांच्या रंगीत चष्म्यांतून

रंगीत चष्म्यांतून जगाची मौज बघायला सर्वांनाच आवडते. हल्लीं रस्त्यावर फुगे विकणारांजवळ रंगीत कागदांचे चष्मेहि असतात आणि विशिष्ट वयाच्या मुलांच्या त्यांच्यावर उड्या पडतात. मोठेपणीं हीच हौस कांहीं अंशीं कायम असावी. तसें नसतें तर दृष्टिदोष घालविण्यासाठीं म्हणून चष्मे वापरायचे आणि त्यांत निळ्या, हिरव्या, किरमिजी झांक असलेल्या कांचा वापरावयाच्या याची संगती कशी लावावयाची? आरोग्य-शास्त्रदृष्ट्या अन्य तऱ्हेनें एखादा नेत्रविशारद ती लावीलहि. पण फ्राईडचा अनुयायी बहुधा असेंच म्हणेल कीं, बालवयांत जडलेली आणि तरुण वयांत रेंगाळत राहिलेली कुठली तरी सुप्त इच्छा आहे ही! आणि पु. ल. यांच्या विनोदी पद्धतीनें या सुप्त इच्छेचा मागोवा घ्यावयाचा असेल तर त्याचें स्पष्टीकरण बालपणाची एक निरागस हौस एवढ्या सोंवळ्या पद्धतीनेंच आपण देऊन मोकळे होऊं शकूं! रंगीत चष्मे चढविल्यानें दृष्टीला पडणारें सृष्टीचें स्वरूप अधिक 'खुलतें,' असें माझे एक लघुनिबंधकार स्नेही मानतात. मीहि तसेंच मानतों, पण त्यांच्या लेखी 'खुलणें' याचा अर्थ सौंदर्यानें झळकणें असा आहे आणि मला अभिप्रेत अर्थ आहे व्यक्त होणें, स्पष्ट होणें—कळी खुलते ना, त्याप्रमाणें! पण रंगीत चष्मे लावून नेहमीं जगाकडे पाहण्यापेक्षां एखादेवेळीं तीच नजर जर स्वतःकडे फिरवली, रोखली तर—? म्हणजे मग इतरांच्या नजरेंतून 'आपुलेंच रूप पाहिलें म्यां डोळा' असा आत्मसाक्षात्काराचा सोहळा पाहावयाला मिळेल!

*　　*　　*

शिक्षकांच्या प्रतिष्ठेचा प्रश्न गेल्या पांच-पंचवीस वर्षांत मोठ्या निकरानें पुढें आला आहे. शिक्षकांना प्रतिष्ठा नाहीं म्हणजे नेमकें काय नाहीं ? आणि प्रतिष्ठा हवी म्हणजे नेमकें काय हवें, याच्या तपशीलांत मात्र शिरण्याला कुणी फारसें तयार दिसत नाहीं. कुस्तीगिरांची अंगाला अंग न भिडवतां व पेंच न घालतां दुरूनच झटापट चालते, तसलाच कांहींसा हा प्रकार ! शिक्षकांच्या दृष्टीनें प्रतिष्ठा–स्टेटस–ही आर्थिक स्थितीवर अवलंबून आहे; कारण 'सर्वे: गुणाः कांचनमाश्रयन्ते' हा अनुभव गांधीजींच्या अनासक्तीच्या व अपरिग्रहाच्या युगांत बिचाऱ्यांना आला आहे; तर प्रतिष्ठा ही त्यागानें, सेवेनें मिळेल, अशी आशा ध्येयपूर्ण विचारांनीं भारलेल्या हवेंत सदैव श्वासोच्छ्वास करणाऱ्यांना वाटत आहे. एवढेंच दोघांच्या दृष्टिकोनांत जमीन-अस्मानाचें अंतर आहे. असा हा जमिनीवर चालणारा शिक्षक आणि विमान–प्रवासी, अन्तराळीं वास्तव्य करणारा नेता यांच्यांतला झगडा आहे.

* * *

हा झगडा तूर्त बाजूला ठेवून शिक्षकांनीं थोडें अन्तर्निरीक्षण करायची खासच गरज आहे. समाजांत प्रतिष्ठा मिळवावी लागत नाहीं, ती मिळत असते, आपल्या पायांनीं चालून येते, असें म्हटलें तर वावगें होईल काय ? कर्म, ज्ञान, भक्ति–प्रतिष्ठा मिळविण्याची हीच सोपान परंपरा आहे. शिक्षकांनीं आपलें कर्म, आपला आचार, आपली नीति, आपली कर्तव्य-परायणता तपासावी; आणि त्याबाबतींत आपलीच 'अन्तःकरण-प्रवृत्ति' (कारण सज्जनांना अखेर तीच प्रमाण असते) आपली मनोदेवता काय कौल देते तो पाहावा. (आणि या 'शिक्षक' शब्दांत प्राथमिक शिक्षकांपासून उच्च विद्यालयीन प्राध्यापकांपर्यन्त सर्वांचा समावेश होतो.) आपल्या 'कर्मा'चा समाजाला आणि त्यांतला अगदीं जवळचा भाग म्हणजे जो विद्यार्थी-समाज त्याला काय व कसा उपयोग होतो, हेंहि अन्तरींच्या अंतरीं सारे राग-द्वेषाचे पापुद्रे बाजूला सारून तपासून पाहावें. आपली ज्ञाननिष्ठा पाहावी, ज्ञानलालसा, ज्ञानसाधना अवलोकावी. आणि भक्ति म्हणजे व्यवसायनिष्ठा किती निर्भेळ आहे हें बघावें, आणि या कर्म-ज्ञान-भक्तीचा कुठें मेळ साधला आहे का याचाहि विचार करावा.

अर्थात् शिक्षकांनीं हें केलेंच पाहिजे असें नाहीं. कारण लोकशाहींत असली भलती सक्ति करण्याचें धाडस कोण करील? म्हणून हें सारें विनंतीच्या, अजीजीच्या, आर्जवाच्या स्वरांत मी सांगत आहें. कारण मला त्यांच्या निदर्शनास एक मोठी विचित्र गोष्ट आणून द्यावयाची आहे. त्यांच्यावर अशी सक्ति करायला लावणारी एक शक्ति आहे. आणि ती—'रंगीत चष्म्याची'; विद्यार्थी—समाजाच्या नजरा त्यांच्यावर सदैव रोखलेल्या आहेत. त्या नजरा अनेक रंगांच्या आहेत, अनेक आकांक्षांचे गहिरे रंग त्यांत भरलेले आहेत, ही शिक्षकांच्या दृष्टीनें भयानक बाब आहे. त्यांच्या या नजरा त्यांच्या आंतरिक दृष्टीच्या असल्यामुळें ती नजर अन्तर्भेदी बनली आहे, हे डोळे 'जुल्मी' बनलेले आहेत. आपला मान आपल्या हातांनीं राखून घ्यायचा असतो, असें प्रतिष्ठेच्या बाबतींतले अनुभवी आप्तांचें वचन आहे. तें जर मान्य असेल तर या विद्यार्थी-समाजाच्या आशा-अपेक्षांनीं लुकलुकणाऱ्या, उमेदींनीं चमचमणाऱ्या, स्वाभिमानानें पाणीदार बनलेल्या आणि भावनांनीं ओथंबलेल्या असंख्य नजरांना आपण सहानुभूतीनें, आपुलकीनें, निर्भयतेनें आणि आत्मविश्वासानें प्रतिसाद देऊं शकतों असें शिक्षकाला ठामपणें सांगतां नको का यायला?

विद्यार्थ्यांच्या या चष्म्यांतील रंगाचें पृथक्करण शास्त्रज्ञांनीं आजकाल चालविलें आहे. विद्यार्थ्यांना कोणता शिक्षक हवासा वाटतो, कोणता आवडतो, शिक्षकांच्या ठिकाणीं कोणत्या रास्त गुणांची अपेक्षा विद्यार्थी करतात, याचा कानोसा अलीकडे सामाजिक शिक्षणशास्त्रांत घेण्यांत आला आहे. (तसलाच एक नम्र प्रयत्न प्रस्तुत लेखकानें करून पाहिला आहे.) या कानोसा घेण्याच्या पद्धति दोन आहेत. शिक्षकांच्या ठिकाणीं तुमच्या दृष्टीनें आवश्यक दहा गुण लिहा असें सरळ विद्यार्थ्यांना सांगणें हा एक प्रकार; किंवा एक गुणांची यादी देऊन त्यांत त्यांना क्रम लावावयाला सांगावयाचें आणि पौनःपुन्य क्रमावरून गुणांची श्रेणी ठरवावयाची हा दुसरा प्रकार. अर्थात् विद्यार्थ्यांच्या वयोमानाचा, रुचिभिन्नतेचा आणि वैयक्तिक गरजांचा प्रभाव त्या उत्तरांवर असणार हें उघड आहे. पण ते सारे घटक लक्षांत घेऊन महत्तम गुण-विभाजक काढतां येतोच.

* * *

पॉल विटी नांवाच्या एका संशोधकानें जरा हुशार मुलांनीं लिहिलेल्या चौदा हजार पत्रांचा निष्कर्ष काढला आहे. हीं सारीं पत्रें एकाच विषयावर होतीं. तो विषय म्हणजे 'ज्यांचें मला उत्कृष्ट साहाय्य लाभलें आहे, असे शिक्षक.' या उत्कृष्ट शिक्षकांचीं गुणवैशिष्ट्यें ह्या पत्रांतून व्यक्त झालीं आहेत, तीं अशीं–उत्कृष्ट शिक्षकाची भूमिका सहकाऱ्याची असते. त्याची मनोवृत्ति लोकशाही पद्धतीची असते. असे शिक्षक विद्यार्थ्यांकडे कनवाळूपणें पाहतात; आणि त्यांच्या भावनांची कदर करतात. ते धीराचे, सहनशील असतात. त्यांना विविध विषयांची गोडी असते. त्यांची वागणूक, त्यांचा पोषाख व राहणी आल्हाददायक असते. ते निःपक्षपाती असतात. त्यांच्या ठायीं विनोद-बुद्धि–सेन्स ऑफ ह्यूमर–असते. त्यांच्या ठिकाणीं सौजन्य असतें आणि वागणूक घरसोडीची नसते. विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी ते समजावून घेतात; त्यांत लक्ष घालतात. ते मनाचे मोकळे आणि नव्याशीं जुळवून घेणारे असतात. विद्यार्थ्यांच्या गुणांची योग्य बूज करून त्यांना प्रोत्साहन देतात. आपल्या विषयांत ते विशेष तरबेज असतात.

इतरांनीं केलेल्या संशोधनांत आणखी दोन गुणांचा उल्लेख आढळतो. एक म्हणजे उत्कृष्ट शिक्षक चांगल्या तऱ्हेनें वर्ग-नियंत्रण करूं शकतो. (याचा अर्थ मुलांना अभ्यासांत गोडी वाटली तर वर्गात गोंगाट-गडबड त्यांना खपत नाहीं.) आणि दुसरा म्हणजे चांगला शिक्षक उपहास, वक्रोक्ति यांचा अवलंब करीत नाहीं. (तिखट जिभेच्या बाबतींत पुरुष-शिक्षक स्त्री-शिक्षकांनाहि मागें टाकतात असें म्हणतात. त्यांनीं यापासून बोध घ्यावा.)

प्रस्तुत लेखकानें केलेल्या निरीक्षणांत विद्यार्थ्यांनीं निवेदन केलेल्या आणखी दोन गुणांचा निर्देश करतां येईल. (१) शिक्षक वर्गावर जाण्यांत, गृहपाठ तपासून देण्यांत तत्पर व वक्तशीर असतात. (२) ते कमींत कमी अनुपस्थित असतात. (बहुधा भारतीय स्वभाव, परिस्थितीमुळें या अपेक्षा व्यक्त झाल्या असाव्यात.) एकून ही सोळा गुणांची यादी. या षोडश कलांनीं परिपूर्ण असें व्यक्तिमत्त्व दुर्लभ असेल; तसें करण्याचा मी प्रयत्न करीत आहें,

म्हणून ‘ जन्म कर्म च मे दिव्यं, ’ असा अत्मविश्वास असणारे महाभागहि दुर्मिळ असतील. पण विद्यार्थ्यांना हवा असलेला ‘ चंद्र ’ मात्र हा असा आहे. एक लेखक म्हणतो, शिक्षणाचीं उद्दिष्टें सफल व्हावयाची असतील तर विद्यार्थ्यांना प्रथम शिक्षकांबद्दल प्रेम वाटायला हवें. विद्यार्थ्यांच्या मनांत प्रयत्न, पुस्तकें, शाळा व शिक्षक या बद्दल अरुचि निर्माण झाली तर शिक्षणपद्धति संपूर्णपणें अयशस्वी झाली असें स्पष्ट समजावें.

* * *

# भीष्म–द्रोणांचे नवे अवतार !

"......विद्यार्थी खूपच खूष आहेत. दोन समारंभांचें अध्यक्षस्थान भूषवण्याचा मानहि मिळाला त्यामुळें...पण जानेवारी उजाडल्यावर, ह्यांतून एक नवीनच प्रश्न उपस्थित झाला आहे माझ्यापुढें. तो म्हणजे अनेक विद्यार्थ्यांचा आणि पालकांचाहि शिकवणी घ्या म्हणून आग्रह सुरू झाला आहे मला. त्यांत श्रीमान् ...हें गांवांतलें बडें प्रस्थ आहे. त्यांनीं घरीं मुलाला शिकवणीला येत चला म्हणून सुचविलें आहे. मला या बाबतींत आपलं थोडं मार्गदर्शन हवं आहे......"

* * *

माझ्या एका तरुण विद्यार्थी मित्राकडून आलेल्या या पत्राला काय उत्तर लिहावं, या फिकिरींत होतों मी. माझ्या मित्रानं शिक्षकाच्या पेशांत पदार्पण केलं होतं. विश्वविद्यालयांतून उच्च पदवी घेऊन बाहेर पडलेला ताज्या दमाचा गडी होता तो. रुबाबदार राहणी, सुंदर वक्तृत्व, खेळाची आवड आणि खिलाडू वृत्ति यामुळें विद्यार्थ्यांचीं मनें आपल्याकडे वेधून घ्यायला त्याला वेळ लागला नाहीं आणि प्रयासहि पडले नाहींत. त्याच्या पत्रावरून विद्यार्थीवर्गातील त्याची वाढती प्रियता, विद्यार्थ्यांना साहित्याची गोडी लावण्यासाठीं त्यानें सुरू केलेले उपक्रम, विद्यार्थ्यांसमवेत काढलेल्या सहली, चांदण्यांतील गप्पाष्टकमंडळ अनेक गोष्टी मला कळत. वरील पत्र तसेंच असेल अशी माझी प्रथम कल्पना होती. शिकवणीच्या मुद्यावर येतांच मलाच प्रश्न पडला कीं शिक्षकाच्या व्यवसायांत पडल्यावर ज्या गोष्टीसाठीं सामान्यत: मनुष्य उत्कंठित असतो, तिचें सोत्साह स्वागत करतो, ती गोष्ट

पुढें येतांच माझ्या मित्राला प्रश्न कां पडावा ? पत्राच्या अखेरीला त्यानें आपली अडचण मोकळेपणीं मांडली होती. ती म्हणजे शिकवणी घेतल्यावर कोणतीं नैतिक बंधनें आपल्यावर येतात, याबद्दल त्याला मार्गदर्शन हवें होतें.

मला कांहीं वर्षांपूर्वींचा एक प्रसंग आठवला. संध्याकाळीं पर्वतीहून फिरून मी घराकडे येत होतों, अ. वि. गृहाच्या पुढें आलों तोंच आमचे एक + + + नांवाचे सहकारी उपरणें सांवरीत लगबगीनें येतांना दिसले. मी सहज विचारलें, " कां हो, फार गडबडींत दिसतां ? " " हं, एकादष्णीला चाललों आहें. " मी जरा बुचकळ्यांत पडलों. आज सोमवार नव्हता. एकादशी-शिवरात्र असल्याचें मला ठाऊक नव्हतें. म्हणून मीं त्यांना प्रश्न विचारला. त्यांना एकदम हंसूंच लोटलें. माझें काय चुकलें मला समजेना. मनांत मात्र विचार चमकून गेला कीं + + + च्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें हा कांहीं वाक्प्रचार असावा. हंसण्याची उबळ ओसरतांच त्यांनीं खुलासा केला, आणि माझा तर्क खरा ठरला. " अहो एकादष्णी म्हणजे शिकवणी. हे जे नंदीपुढले किंवा नंदीवरचें असतात, त्यांच्यावर धार धरल्यावाचून का त्यांचा उद्धार होत असतो ! " नासिकला आल्यावर मला आणखी एक नवा वाक्प्रचार समजला. तो म्हणजे, ' बेल घालणें. ' दूधवाला जसा रतीब घालतो, माळी जसा फुलाचा पुडा आणून टाकतो, ( किंवा टाकीत असे. आतां माळ्याच्या दुकानावर सामान्यतः लोकांना जावें लागतें—अर्थात कांहीं ' सन्माननीय ' अपवाद वगळल्यास ) त्याप्रमाणें हा शिकवणीला जाण्याचा प्रघात आहे, अशी मी कल्पना करून घेतली. माझ्या तरुण मित्राची शंका खरी आहे, हें या आठवणीमुळें माझ्या मनाला पटलें. एखाद्या मुलाची शिकवणी घेतली म्हणजे त्याच्या उत्तीर्ण होण्याची नैतिक जबाबदारी आपल्यावर कितपत येते, आणि त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या घरीं शिकवणीला गेल्यानें आपली प्रतिष्ठा कितपत कमी होते, ही त्याची शंका वाजवी आहे हें माझ्या ध्यानांत आलें. त्याच्या पत्राला काय उत्तर द्यावें याचा मनाशीं विचार करीत असतांनाच वसंतरावांची स्वारी आंत आली. आठ दिवसांपूर्वींच मजकडून नेलेला मुदलियार समितीचा अहवाल त्यांनीं माझ्या टेबलावर आदळला त्यांची मुद्रा विजयी हास्यानें उजळली

होती. "हें बघा, आम्ही म्हणत होतों तेंच या तुमच्या तज्ज्ञांनीं सांगितलें आहे कीं नाहीं! Private tuition should be abolished. त्यांचं मत-देखील हेंच आहे. नाहींतर तुम्ही मंडळींनीं घरोघरीं जशी पाणपोई घातली आहे. ओंजळी दोन ओंजळी वाटेल त्यानें येऊन प्राशन करून घ्याव्यात. हें निव्वळ ज्ञानपण्य आहे. बाजार आहे शुद्ध बाजार!" मी त्यांना डिवचण्या-साठीं मुद्दामच म्हटलं, 'छेः, भलतंच वसंतराव, अहो, आमची ही गुरुकुल पद्धति आहे. वर्गांत व्यक्तिशः शिक्षकांचा विद्यार्थ्यांशीं संबंध येत नाहीं. इथं हमखास येतो. विद्यार्थी-वर्गांत मुकस्तंभ असतात. त्यांच्या तोंडाला खीळ बसलेली असते. इथं तीं पोटांतल्या गोष्टी मोकळेपणीं सांगतात. त्यांच्या शिक्षकाबद्दलच्या भल्याबुऱ्या भावना, राग, द्वेष सारे कळतात. त्यांच्या घरच्या अडीअडचणी कळतात..."

माझ्या भाषणानं वसंतराव आणखीच भडकले. जरा हेटाळणीच्या सुरांतच ते म्हणाले, "तर तर आणि मग तुमच्याबद्दल भीष्म-द्रोणाइतकाच आदर, भक्तिभाव तुमच्या या शिष्यगणांच्या मनांत निर्माण होत असेल नाहीं! त्या मी मी म्हणणाऱ्या भीष्मद्रोणांनासुद्धां कसोटीची वेळ येतांच 'अर्थस्य पुरुषो दासः' म्हणून कानावर हात ठेवून गप्प बसावें लागलें, तेथें तुम्ही किस झाड की पत्ती! शिकवणी ठेवली कीं मुलगा पास व्हायचाच. मिठाला जागावंच लागतं ना!" इ. इ.

* * *

खाल्लेल्या मिठाला शिक्षक जागतात हा वसंतरावांचा शिक्षकांना शाबासकीचा शब्द आहे कीं शालजोडींतला आहेर आहे, हें समजून घ्यायला मी उत्सुक होतों. पण त्यांना अधिक संतापविण्यांत अर्थ नव्हता. नागरिक-शास्त्र माणसाला निष्ठांतील अग्रक्रम ठरवायला निश्चित मदत करतें म्हणतात. शिक्षकांच्या पुढें या द्विविध निष्ठा शिकवणी उभी करते—जी शाळा पगार देते, तिची, तिच्या कार्यपद्धतीची निष्ठा आणि शिकवणी ठेवणाऱ्या पालकांबद्दल निष्ठा. ज्यांचें चारित्र्य-नैतिक इच्छाशक्ति दृढ असते, त्यांना हा पेंच नसतोच हें मला माहीत आहे. पण ज्यांचं चारित्र्य दुबळं असतं, (आणि अशांची संख्या प्रायः समाजांत अधिक) ते जर प्रलोभनांत पडले, स्खलनशील झाले तर दोषी कोण?

हा प्रश्न उपस्थित करण्याचं कारण असं कीं ज्या मुदलियार समितीची ढाल करून वसंतराव माझ्याशीं दोन हात करूं इच्छित होते, त्याच समितीनें शिक्षकांच्या अंगावर संरक्षणक्षम एक चिलखत चढवलं होतं, हें सांगायचं ते विसरलें. "शिक्षकांना भरपूर वेतन दिलं कीं शिक्षकांना शिकवणी करण्याची गरज पडणार नाहीं." असं स्पष्ट वाक्य त्याच परिच्छेदांत नमूद आहे. शिक्षकाला मानानं जगण्याइतकं वेतन द्यायला सरकार व समाज तयार नाहींत. थोडी फी-वाढ केली तर लगेच पालक कुरकुरतील, विद्यार्थी मोर्चे काढतील. पण इकडे शिकवणीकरतां भरमसाट पैसे खर्च करतील. शाळेंत अर्धनादारीसाठीं अर्ज करणारे, पुस्तकाला पैसे नाहींत सांगणारे, वेळेवर फी न भरणारे अनेक विद्यार्थी जेव्हां शिकवणीसाठीं पैसा खर्च करतात, तेव्हां अनेकदां मन बुचकळ्यांत पडतें. सरकार पुरेसें वेतन देत नाहीं, तोंपर्यंत खाजगी शिकवण्या बंद करण्याचा सरकारला नैतिक हक्क पोहोंचला नाहीं, अशी शिक्षकबंधूंची कैफियत आहेच. 'शिकवणी'साठीं शिक्षकांच्या जगांत 'बेल घालणें,' रतीब घालणें, यासारखें वाक्प्रचार शिक्षकांची भाडोत्री वृत्ति नाहीं कां दाखवीत, असें विचारणारांना 'मास्तर ठेवले आहेत,' या पालकांच्या तोंडीं असणाऱ्या वाक्प्रचारांत कोणती आदराची भावना व्यक्त होते, असें कुणी विचारलें तर! तेव्हां हा शब्दाचा वाद माजविण्यांत अर्थ नाहीं. खाजगी शिकवण्यांमुळें शिक्षकांचा नैतिक दर्जा खालावतो निदान खालावण्याला वाव आहे, यांतील तथ्य कुणीच नाकारूं शकत नाहीं. पण मग ज्या सामाजिक अर्थव्यवस्थेनें ही शिकवण्या करण्याची पाळी शिक्षकांवर आणली, ती सामाजिक अर्थपद्धति बदलायला नको काय, हेंच या प्रश्नाचें उत्तर आहे. इतकेंच नव्हे तर आणखी पुढें जाऊन व खोलवर विचार करून प्रचलित अभ्यासक्रम व परीक्षापद्धति यांचेंच शिकवणी हें अपत्य आहे असें जर म्हटलें तर!

* * *

शिक्षकांच्या प्रतिष्ठेचा प्रश्न खाजगी शिकवण्यांशीं निश्चित निगडित आहे. याची जाणीव माझ्या तरुण मित्राला आहे. याबद्दल मी त्याचें मनःपूर्वक अभिनंदन करणार आहें. त्याची नैतिक संवेदनक्षमता नाजुक आहे

आणि सदसद्विवेक बुद्धि जागी आहे, याबद्दल त्याला मी धन्यवाद देणार आहे. प्रतिष्ठा टिकवायला मनुष्यानें थोडें निःस्पृह असावेंच लागतें आणि निःस्पृहता हें नेहमींच निर्धनतेला निमंत्रण नसते. पण त्याबरोबरच वसंतराव-सारख्या स्नेह्यांना मात्र मला सांगावेसें वाटतें कीं, मास आणि क्लास हे शब्द समाजशास्त्रांत कितीहि विरोधी असोत, पण शिक्षणांत तरी ' मास ' स्केलवर शिक्षण दिलें जाऊं लागल्यामुळेंच खाजगी क्लास–पद्धति सुरू झाली आहे. आणि पोटामुळें मनुष्य गुलाम होतो, असें जर तुम्हांला मान्य असेल तर अल्पवेतन देऊन भीष्म-द्रोणांचे नवे अवतार निर्माण करण्याचें पाप समाजानेंच करतां कामा नये.

* * *

# सोवळे पालक नि ओवळे शिक्षक

'पत्रें म्हणजे भावगीतें' असं, मला वाटतं, खांडेकरानीं म्हटलं आहे. आज भावगीतांच्या जमान्यांत हें पुष्कळसं खरंहि आहे. ज्यांना भावगीतें लिहितां येत नाहींत, तीं माणसं पत्रं लिहितात. मोठी सुरेख, हृद्य नि हृदयस्पर्शी. जीवनांत असा एक काळ असतो कीं अशीं पत्रं लिहिण्या-साठीं, मनींचं हितगुज कुणाजवळ तरी कुजबुजण्यासाठीं मित्रमैत्रीण हवी असते. या मैत्रीच्या वेलीवरच त्या काळांतील भावसुमनें उमलतात, नि बहरतात. म्हातारपणीं माणसं जशीं गोष्टी-वेल्हाळ असतात, तशीं या कौमार्य-यौवनाच्या संधिकाळांत पत्र-वेल्हाळ असतात, असं म्हटलं तरी चालेल. निदान आमचा विश्वास ( आतांचे विश्वासराव ) तसा होता. पत्र लिहिणं हा त्याचा विरंगुळा नव्हता, तर त्याचं तें जणूं जीवनचं होतं. प्रियकर आपल्या प्रेयसीला किंवा नूतन परिणीत आपल्या पत्नीलासुद्धां इतकीं पत्रें लिहीत नसेल, इतकी तो आपल्या मित्रांना लिहावयाचा, असा त्याचा तो 'षोक' पाहून आम्ही थट्टेनं म्हणत असूं.

पण अलीकडे कित्येक वर्षे मात्र त्याचा हा नित्यक्रम बंद पडला होता. त्यामुळं आतां त्याचं पत्र आलं कीं, 'उंबराला आलं फूल' ही भावगीताची ओळ मला स्फुरते. विश्वासराव साधा भाबडा गडी. पस्तीशी ओलांडली तरी त्याला व्यवहार जमला नाहीं. व्यवहार म्हणजे अन्यायाशीं तडजोड—आणि यशस्वी व्यवहार म्हणजे हें अन्यायाचं हालाहल हसत हसत प्राशन करणं, हें त्याला कळलं नाहीं, उमगलं नाहीं. त्यामुळें अन्याय-असत्य म्हटलं कीं स्वारीचं पित्त खवळायचं. भारीच गरम रक्त. एकदां आमच्या एका प्राध्यापकाशीं तो हस्तांदोलन करीत होता. त्याचा तो गरम गरम

हाताचा स्पर्श होतांच जरा हसत ते म्हणाले होते—विश्वासराव, या वयांत एवढं गरम रक्त असणं बरं नव्हे. त्यांच्या भाषणांतली खोंच आम्हांला कळून एकच हंशा पिकल्याचं अजून मला आठवतं.

हा सगळा इतिहास सांगण्याचं कारण म्हणजे त्याचं मला परवां आलेलं पत्र. विश्वासरावाचं पत्र पाहून माझं मन उचंबळून आलं होतं. तें पाकीट हाताला जड लागल्यामुळं मन जरा हर्षोत्फुल्ल झालं होतं. विश्वासच्या हृदयांतली गुप्त झालेली भावनोत्कटतेची राजापुरची गंगा प्रकट झाल्याच्या कल्पनेनं मन उल्हासलं होतं. पण—! प्राजक्ताचीं फुलं उचलायला जावं नि हातांत अंगारकण यावेत, तसं झालं मला. विश्वासरावांचं पत्र जळजळीत निखाऱ्यानं भरलेलं होतें. त्याच्या भावनेला तींच धार होती, पण तिला झणझणीत अंजनाचं पाणीहि होतं. पुढील भाग वानगीदाखल वाचा म्हणजे माझ्या म्हणण्याचं प्रत्यंतर येईल तुम्हाला.

*    *    *

"...तुम्ही अशा तऱ्हेनं या कृत्यांचं समर्थन कराल अशी मला कल्पना नव्हती. फार निराशा केलीत तुम्ही माझी. खाजगी शिकवण्याच्या पापाचं सारं खापरं तुम्ही समाजाच्या, परिस्थितीच्या माथीं फोडून मोकळे झालांत. परिस्थितीवर मात करायला तुम्ही तोंडानं मुलांना शिकवणार आणि परिस्थितीला शरण जाऊन शिकवणीच्या रूपानं उष्ट्या पत्रावळींचं चर्वितचर्वण करीत बसणार ! शाळेंत शिकवलेले विषय पुनः घरीं दळतांना तुमच्या बुद्धीला किळस कशी नाहीं येत ? सार्टर रिसार्टस मध्यें कार्लाइलनं ग्रामरग्राइंडर म्हणून शिक्षकांचा नि पंडितांचा उपहास केला आहे, त्यांचं मर्म जेव्हां समोरच्या चाळींतल्या नारायणरावांकडे शिकवणीसाठीं मुलींचे ताफे येतांना मी पाहतों, आणि पलीकडल्या कॉलनीमधल्या मनोहरपंतांच्या बंगलींत मुलांचे क्यू बघतों, तेव्हां चांगलं समजूं लागलें मला. कांहीं नवीन वाचावं, कांहीं चिंतन करावं, नवा विचार करावा, चार चौघांत जावं, जरा आनंद लुटावा, असं यांना कधींच वाटत नाहीं. शिक्षक होणं म्हणजे काय आजन्म पोरांच्या संगतींत राहण्याचं वाण घेणं नव्हे ना ? शिक्षक मंडळी अव्यवहारी कां असतात याचं......"

" शिक्षकांचें वेतन वाढवून दिलें म्हणजे खाजगी शिकवण्यांचं बंड कमी होईल, असं तुम्हांला खरंच वाटतं ? इतकं वेतन मिळालं तर खाजगी शिकवणीसाठीं दाराशीं मुलाला उभं करणार नाहीं, नि कुणी आलाच तर त्याला मुक्त हस्तानं विद्या-दान करीन, असं छातीठोकपणें सांगणारे शिक्षक किती आहेत ? वेतनाचा प्रश्न समाधानकारक सोडविल्यावरहि शिक्षक आपला आचार ' आदर्श ' ठेवतील का ?......"

" आजकाल तुमच्या प्राध्यापक-शिक्षकांत रस्त्यानं सिगरेटी फुंकीत जाणारे किती आहेत ? हॉटेलांत चहापिणं ह्या गोष्टी तर सर्रास चालूच आहे. आमच्या वेळीं कुणी पान खाऊन वर्गांत आला तर त्या विद्यार्थ्यांची बत्तिशी पुनः रंगविली जाई—पण आज पान चघळीत वर्गांत जाणं ही जणूं आवश्यक बाब बनली आहे. शिक्षकांनीं पोरकट पोशाख करण्यांत जणूं पोरांशीं स्पर्धाच चालविली आहे. शिक्षकांचा कोणता आचार, कोणतं वर्तन स्वतःच्या व्यवसायाची प्रतिष्ठा कायम राखणारी आहे ? शिक्षकांच्या गप्पांचे विषय पाहा, त्यांच्या वाचनाचीं पुस्तकें पाहा, त्यांचें सिनेमाचें वेड पाहा,...माझ्या शेजारच्या खोलींतला शनिवार-रविवारचा ब्रिज-रमीचा अड्डा पाहिला कीं मला शिसारी येते. ही मंडळी शिक्षक आहेत कीं ड्रायव्हर-कंडक्टर आहेत असा मला भ्रम पडतो. हा वेळेचा अपव्यय आणि अनाचार पाहून मला उबग आला आहे.....

* * *

विश्वासरावांच्या आक्षेपांना पुष्टी द्यावी कीं त्यांच्या टीकेचं खंडन करावं ? मीं दोन्ही न करण्याचं ठरवलं आहे. कारण शिक्षकांच्या आचार-वर्तनाकडे विश्वासरावांप्रमाणें तुम्हीहि सोवळेपणानें पाहातां, असें म्हणून त्यांना पुष्टी देणारांवर आक्षेप घेतला जाईल, तर त्यांच्या टीकेचं खंडन करणं म्हणणें शिक्षकांच्या स्वैर स्वातंत्र्याचा पुरस्कार असंहि कुणाला वाटेल. म्हणून विश्वासरावांच्या पत्रांतून जो प्रश्न निर्माण होतो, त्याचीच दखल आपण घेऊं या. तो प्रश्न आहे शिक्षकांच्या व्यवसायाची कांहीं स्वतंत्र आचार-संहिता Code of etiquette असावी काय ? त्यांच्या वर्तनावर

कांहीं समाज-बंधनें असावींत काय ? कीं इतर नागरिकांप्रमाणेंच त्यालाहि आचार-स्वातंत्र असावे ?

* * *

समाज शिक्षकांकडून वेगळ्या रीति-नीतींची अपेक्षा करतो, हें नाकारण्यांत अर्थ नाहीं. पूर्वींच्या काळांत विद्यादानाचें कार्य करणाऱ्या वर्गाचा आचार डोळ्यांत भरावा, मनावर ठसावा, असा होता. साधी राहणी, विद्याव्यासंग, पोशाखांतील रुबाबदारपणा, वृत्तीचा निःस्पृहपणा, व्यवसायांतील नैपुण्य, अंगी बाजलेली कडक शिस्त यामुळें शिक्षक हा भीतीचा व आदराचा विषय होता. पण शिक्षण-प्रसाराच्या कार्याबरोबर बहुजनांतून शिक्षकांची 'भरती' सुरू झाली. स्वभाव, चारित्र्य यांची घडण होण्याच्या आंतच व्यक्ति शिक्षक-गुरुजी बनूं लागल्या. व्यक्ति-स्वातंत्र्याच्या कल्पनांबरोबर आहार-विहार-पोशाखाच्या तऱ्हांबद्दल बेदरकार भूमिका घेण्यांत येऊं लागली, एका बाजूनें समाजाची शिक्षकांवरील पकड सुटली. शिक्षकाचें वर्तन पसंत न पडलें तर 'अरे वारे गुरुजी !' एवढा सखेद आश्चर्याचा उद्‌गार काढण्यापलीकडे सामान्य मनुष्य शिक्षकावर नियंत्रण चालवूं शकत नाहीं. समाजाजवळची 'दंडशक्ति' जवळ जवळ लोपली आहे. दुसऱ्या बाजूनें शिक्षकांची समाजावरची पकड गेल्यानें तो स्वतः आपली प्रतिष्ठा गमावून बसला आहे.

सर्वच पालक विश्वासरावांइतके 'सोवळे' नसतील, हें मला ठाऊक आहे. शिक्षक हाहि एक मनुष्य आहे, त्याला भावना आहेत, कुटुंब आहे, करमणुकीची गरज आहे, इतरांप्रमाणेंच तो एक नागरिक आहे, असा अनेकांचा सुबुद्ध दृष्टिकोण असेलहि. पण त्यांच्या या उदार दृष्टिकोणामुळें शिक्षकांची स्वतःवर बंधन घालून घेण्याची जबाबदारी वाढत नाहीं काय ? समाजांतले सारे व्यवसाय सारखेच प्रतिष्ठित मानले जावेत, हें मला मान्य आहे. पण व्यवसायाची प्रतिष्ठा कशावर अवलंबून असते ? स्वतःच्या व्यवसायाविषयीं निष्ठा बाळगून ती निष्ठा व्यक्तविण्याचे कांहीं नैतिक आचार, नैतिक मूल्यें यांचें पालन करावें, तेव्हां ही प्रतिष्ठा मिळते. प्रत्येक व्यवसायाचें त्याच्या स्वरूपानुरूप एक नीतिशास्त्र तयार होत असतें व त्याचें पालन

करण्याची जबाबदारी कायद्यानें वा समाजमतानें त्या त्या व्यावसायिकांवर येते. वकिल वा डॉक्टर आपल्या अशिलानें दिलेल्या माहितीबद्दल गुप्तता राखण्याला बांधलेला असतो; वकील, डॉक्टर, एंजिनियर एका विशिष्ट प्रौढपणानें, आढ्यतेनें वागून आपली प्रतिष्ठा सांभाळून असतात. शिक्षकाच्या व्यवसायाला अशी कांहीं व्यावसायिक नीति आहे काय, हाच मला वाटते, विश्वासरावांच्या लिखाणांतील महत्त्वाचा मुद्दा आहे.

*　　　*　　　*

विश्वासरावांनीं उल्लेखिलेल्या आचार-धर्मांचा भागहि आपण घटकाभर बाजूस ठेवूं. कारण आचारधर्म हा काल-सापेक्ष आहे. स्वच्छ नेहरू-शर्ट ( वा बंगाली ) आणि स्वच्छ पायजामा हा पोशाखहि कुणाला या ‘ सादगी ’च्या ( नि कदाचित महागाईच्या ) युगांत पोरकट वाटणार नाहीं. विदर्भांतील पान-भक्ति पाहून विड्यानें तोंड रंगलेलें असणें यांतहि कुणाला कांहीं अनुचित वाटणार नाहीं. हे सारे वरवरचे आचार-उपचार समजूं या. पण स्वकर्माविषयीं किती औदासीन्य असावें, व्यासंगाविषयीं किती अरुचि असावी, सहव्यावसायिकांत किती लावालाव्या कराव्यात, वरिष्ठांची किती सेवा करावी—‘ खाविन्द-चरणीं मिलिंदायमान वृत्ति ’ म्हणून ज्या लीनतेचा चिपळुणकरांनीं अधिक्षेप केला, ती किती असावी, विद्यार्थ्यांच्या पदरांत विद्येचें माप टाकतांना किती अंगचुकारपणा असावा, हे सारे व्यवसायाच्या नीतीशीं निकट जडलेले, आंतरिक नीतिमत्ता कसोटीला लावणारे प्रश्न आहेत. १९२० सालीं असहकारितेच्या आंदोलनाच्या आरंभीं गांधीजींनीं उद्विग्नपणें उद्गार काढले होते—“ हमारे शिक्षक अपना पुरुषत्व जरुर गंवा बैठे हैं। ” याचें कारण परकीय राजवटींत महात्माजींनीं दिलें होतें—“ मारपीट कर उनसे कोई कुछ नहीं कराता, लेकिन सूक्ष्म बलात्कार तो उनपर होता ही है। अपने बडे अफसरों की धमकियाँ, वेतनके नुकसान, या वेतन न बढ सकनेकी धमकियाँ या सूचनाओंसे शिक्षक घबरा जाते हैं। ”—चाळीस वर्षांत या परिस्थितीचा लंबक दुसऱ्या टोकाला गेला आहे. शिक्षक आज कशालाच घाबरत नाहीं. ‘आजादी’चा अर्थ बेफिकिरी झाला आहे. Independence means indifference. याचा अर्थ शिक्षक

अजूनहि स्वतःच्या मनाचें नियंत्रण करीत नाहीं. कुठल्यातरी अन्य कल्पनाच त्याच्या मनावर ‘ बलात्कार ’ करीत आहेत व म्हणून आजहि तो ‘ अपना पुरुषत्व गंवा बैठा है। ’

*  *  *

‘ लायन क्लब ’ नांवाची जगांत जी एक आंतरराष्ट्रीय बंधुभाव वाढविणारी संघटना आहे, तिच्या सभासदांचें एक ‘ कोड ऑफ एथिक्स ’ —आचार—नीतिसूत्रें आहेत. त्यांतील पहिलीं दोन मला विशेष महत्त्वाचीं वाटतात. तीं सूत्रें अशीं :

1. "To show my faith in the worthness of my vocation by industrious application to the end that I may merit a reputation for quality of Service."

2. To Seek success and to demand all fair remuneration or profit as my own just due, but to accept no profit or success at the price of my own self-respect lost because of unfair advantage taken or because of questionable acts on my part."

“ माझ्या व्यवसायांत मी यशस्वी झालों आहें अशी मान्यता मिळवण्यासाठीं माझ्या व्यवसायाच्या उद्दिष्टसिद्धीसाठीं तनमनानें झटून माझ्या व्यवसायाच्या श्रेष्ठतेवरील माझी निष्ठा मी व्यक्त करीन. ”

“ माझ्या व्यवसायांत मी यश संपादीन आणि मग माझा न्याय्य वांटा म्हणून योग्य तें वेतन वा नफा यांची मागणी मी करीन; कुठलाहि अन्याय्य लाभ घेऊन वा आक्षेपार्ह वर्तन करून स्वसन्मानाचा बळी देऊन मी कुठलाच लाभ वा यश कधीं पदरांत पाडून घेणार नाहीं. ”

—मला वाटतें हीं दोन सूत्रें जरी आम्हीं आचरलीं, तरी स्वाभिमानशून्यतेच्या पोटीं व्यवसायनिष्ठेच्या अभावीं आम्हांवर येणारे ओवळेपणाचे आरोप टळतील.

★ ★ ★

# विविध परीक्षांचा हव्यास

शालेय जगांतील परीक्षापद्धतीवर अनुकूल-प्रतिकूल टीका गेली पांच-पन्नास वर्षें सुरू आहे. तिच्यांतील विविध दोषांची चिकित्सा तज्ज्ञांनीं चालविली असून नवनवे उपाय व योजना सुचवण्यांत येत आहेत. प्रचलित परीक्षापद्धतींत आमूलाग्र सुधारणा कशा करतां येतील, सध्यांच्या पद्धतींच्या जागीं नवे उपक्रम कोणते सुरू करतां येतील, हें अजमावण्यांत तज्ज्ञ गुंतलेले आहेत. परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांना एक मोठा कांच वाटतो, विद्यार्थ्यांची प्रकृति खालावते, परीक्षेला अवास्तव महत्त्व मिळाल्यामुळें अध्यापनहि त्याचसाठीं व उथळ होऊं लागलें आहे, परीक्षांचे निकाल जेवढे वस्तुनिष्ठ असायला हवेत तेवढे असत नाहींत, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचें मूल्यमापन आजच्या परीक्षा करूं शकत नाहींत—एक ना दोन, कितीतरी दोषांचा पाढा आपल्यापुढें प्रत्यहीं वाचला जातो आणि 'शिशु-काल' ठरलेल्या या आधुनिक 'शिशुपालाचे' शंभर अपराध भरत आल्यानें त्याचा उच्छेद करणारें एखादें 'सु-दर्शन' लवकरच दृष्टीस पडेल, अशीहि आशा वाटूं लागली आहे.

एकीकडे परीक्षापद्धतींतील दोषांची व तिच्यावर केल्या जाणाऱ्या शिव्याशापांची रास फुगत चालली असतांना दुसऱ्या बाजूला शाळेबाहेरच्या विद्यार्थी-विश्वांत अनेक परीक्षा सुरू होत आहेत. परीक्षामंडळें स्थापन होत आहेत. वर्ग उघडले जात आहेत. विद्यार्थ्यांत त्यांचें आकर्षण वाढत आहे आणि हजारोंनीं विद्यार्थी-विद्यार्थिनी त्यांत सामील होत आहेत. हिंदी परीक्षा, मराठी परीक्षा, संस्कृत परीक्षा, अर्धमागधी-पाली परीक्षा, इतिहास-परीक्षा, संगीत-शिवण-

चित्रकला परीक्षा या त्यांतल्या त्यांत डोळ्यांत भरणाऱ्या व सार्वत्रिक परीक्षा होत.

ज्या संस्थांनीं या परीक्षा सुरू केल्या त्या सर्वांमध्यें 'धंदेवाईक' दृष्टि आहे वा मुळांत तशी होती, असें कोणीच म्हणणार नाहीं. पण हळूहळू त्यांत धंदेवाईक दृष्टि शिरू पाहात आहे, हें नाकबूल करण्यांत नाहीं. त्या त्या भाषेच्या वा कलेच्या प्रसारासाठीं, उन्नतीसाठीं, सखोल अध्ययनासाठीं वा व्यासंगाची आवड निर्माण करण्यासाठीं म्हणून या अवान्तर परीक्षा निर्माण झाल्या. पण दुर्दैवानें या आपल्या मूळ उद्दिष्टाचें संचालकांना सोयीस्कर विस्मरण पडत असून अर्थप्राप्तीचें सुलभ साधन म्हणून परीक्षा-शुल्कांकडे नजर ठेवूनच त्यांची योजना आंखली जात असावी असें वाटायला जागा झाली आहे. परीक्षा हें द्रव्यप्राप्तीचें साधन होऊं शकतें, हें एकदां ध्यानांत आलें कीं, त्यासाठीं परीक्षार्थींची संख्या वाढविणें, प्रचारक नेमणें, केंद्रें उघडणें, पाठ्यपुस्तकें तयार करणें हा खटाटोप करावाच लागतो. या तऱ्हेचा 'संसार' परीक्षा घेणाऱ्या बहुतेक संस्थांनीं आतां थाटला आहे. (शिक्षण खात्याचें एस्. एस्. सी. बोर्डहि त्याला अपवाद नाहीं.) या संस्थांची कार्यपद्धति कशी असावी, याचा विचार करण्याचें येथें कारण नाहीं. परीक्षापद्धति व संस्थांचें आर्थिक जीवन कशीं निगडित असतात हें यावरून स्पष्ट होईल.

शाळेबाहेरच्या जगांतील परीक्षा या केवळ हौसेखातर द्यावयाच्या परीक्षा असायला हव्यात. संगीत-चित्रकलादि विषयांत सामान्यतः तशा त्या असतातहि. या बाहेरच्या परीक्षांची सक्ती कोणीं केलेली नसते आणि म्हणूनच या परीक्षा घेणाऱ्या संस्थांवर टीका करण्यापेक्षां, त्या परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या व बसविणाऱ्या पालकांच्या वृत्तीची चिकित्सा करणें हेंच श्रेयस्कर ठरेल.

खरें पाहिलें तर जी गोष्ट मनुष्य हौसेनें करतो, ती अधिक प्रामाणिक-पणें करील, आपली पारंगतता, नैपुण्य वाढविण्यासाठीं करील अशी सर्वसाधारण अपेक्षा असते. तसा अनेकदां अनुभवहि येतो. हौसेनें केलेली गोष्ट सुंदर, कलात्मक, सारें अन्तःकरण ओतून केलेली असावी आणि क्रीडेचा व कलेचा सृजनात्मक व रसास्वादजन्य आनन्द तिच्यापासून मिळावा. तसें झालें तरच ती स्वतःच्या विकासाला पोषक ठरेल आणि तिच्या द्वारां

खराखुरा आत्माविष्कार व साक्षात्कार होईल. हौसेनें द्यावयाच्या परीक्षांना तरी निदान हें तत्त्व कां लागू पडूं नये ?

याचें उत्तर एकच : प्रशस्तिपत्रकांची ‘ चलत ’ जमविण्याचा जबरदस्त हव्यास विद्यार्थि-वर्गाला जडला आहे. हव्यासानें हौशीच्या गळ्याला नख लावलें आहे. नौकरी-व्यवसायाला उपयोगी पडणाऱ्या साधनांना ‘ पूरक ’ साधनें म्हणून या बाह्य परीक्षा व प्रशस्तिपत्रकें यांच्याकडे बघितलें जात आहे. हवें असतें तें प्रशस्तिपत्र—पारंगततेची पर्वा कुणालाच नाहीं. पाहिजे आहे तो यशाचा आनंद—पण त्यासाठीं कर्तृत्वाची कमाल करण्याची इच्छा मात्र नाहीं. परीक्षाफल स्वस्त झालें कीं गुणवत्तेचा दर्जा ढासळावयाचाच. या परीक्षांमुळें स्वत:ची गुणवत्ता किती वाढली, ज्ञानाची पातळी किती उंचावली, व्यासंगाचें कौशल्य किती हस्तगत झालें, ज्ञानाच्या नव्या क्षेत्रांत भरारी मारल्याचा आनंद किती लाभला, याचा विचार करण्याची गरजच कुणाला उरली नाहीं. खरें म्हणजे असल्या ‘ किरकोळ ’ गोष्टींचा विचार करण्याइतकी फुरसतच नाहीं कुणाला !

वर्षांतून या परीक्षांचें चक्रीपुराण कसें चालू असते पाहा. सप्टेंबरमध्यें हिंदीची परीक्षा, डिसेंबरमध्यें मराठीची परीक्षा, फेब्रुवारींत संस्कृतची, आणि एप्रिलमध्यें शाळेची—आणि अन्य भाषेची नसली तर त्याच भाषेची पहिली, दुसरी, प्रथमा-प्रवेश या तर आहेतच ! खरेंच का आमच्या विद्यार्थ्यांची बौद्धिक ‘ कूस ’ इतकी सुपीक आहे कीं तिला हा तीन महिन्यांचा ‘ पाळणा ’ सहज पेलतो ? मातृभाषेंतील साहित्याला अनभिज्ञ असलेला व सतरावें वर्ष न उलटलेला विद्यार्थी राष्ट्रभाषेंतलें ८-१० पुस्तकांचें ‘ सत्त्व ’ पचवूं शकतो ! या घनचक्करीचा परिणाम असा होतो आहे कीं, परीक्षेसाठीं नेमलेलीं पुस्तकें वाचायला विद्यार्थ्यांना सवड नाहीं. अनेकदां मूळ पुस्तक त्यांनीं ( अगदीं वाच्यार्थानें ) पाहिलेलें नसतें ! ‘ मित्रमार्गदर्शकां ’च्या संगतींत व ‘ प्रभाज्योतीं ’च्या झगझगीत प्रकाशांत त्यांची पदयात्रा चालू असते. छापण्याच्या कलेचा उदय झालेल्या युगांतहि केवळ गुरुमुखांतील प्रवचनावर तृप्ति मानून हे परीक्षार्थी ‘ बहुश्रुत ’ बनत असतात !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम .................... दि: ..................
क्रमांक ....................

आज शाळांबाहेर घेतल्या जाणाऱ्या बहुतेक परीक्षा भाषा विषयांच्या आहेत. भाषाविषयाचें मूल्य जीवनांत असाधारण आहे. भाषेंतून जसे विचार व्यक्त करतां येतात, तशीच बुद्धीला, विचाराला चालनाहि तिच्यांतून मिळते. मानवी स्वभावविशेषांचें प्रतिबिंब साहित्यांत प्रकटतें आणि त्याच्या दर्शनानें भावनांचा विकासहि होतो. संस्कृतीचें दर्शनहि साहित्य घडवतें आणि तें जीवनविषयक दृष्टिकोण बनविण्यास उपकारक ठरून चारित्र्य-संगठनास साहाय्य करतें. वाङ्मयाचा आनन्द घेतां येणें हें सुसंस्कृत जीवनाचें लक्षण मानलें जातें. व्यावहारिक दृष्टीनें पाहिलें तरी भाषाप्रभुत्व हें स्वावलंबनानें जीवन कंठण्यास लागणाऱ्या हत्यारांपैकीं एक हत्यार आहे. आज हिंदीचा व इंग्रजीचा अभ्यास होतो व व्हावा तो याच उद्देशानें. भाषणशक्ति, अर्थज्ञान, साहित्यपरिचय, आनन्दप्राप्ति या 'पुरुषार्थ'–चतुष्टयापैकीं कोणतें उद्दिष्ट आमचें विद्यार्थी स्वतःच्या जीवनांत सिद्ध करतात, असें विचारलें तर काय उत्तर मिळेल ? परीक्षेच्या निमित्तानें भरपूर वाचनाची संधि मिळावी, अनेक मतमतांतरांची विद्यार्थ्यांत खळबळजनक चर्चा व्हावी, वाचलेल्या भागाचें मननचिंतन व्हावें आणि त्याद्वारां मन-बुद्धि-हृदय पुष्ट व तुष्ट व्हावीं, ही खरीखुरी अपेक्षा. पण तिचें-नांव गांवहि कोठें उरलेलें नाहीं. अभ्यासपद्धतींतील चिन्तन-मनन-चर्चा या मानसशास्त्रीय दृष्ट्या उपकारक मानलेल्या पद्धतींना केव्हांच अर्धचन्द्र मिळाला आहे. पाठान्तर उरलें आहे पण तें 'सत्त्वा'चें नसून पाखडलेल्या 'फोलकटाचें' आहे !

भाषांच्या परीक्षांतून 'आशया'चें जसें उच्चाटन झालें आहे तशीच शुद्धतेचीहि 'शुद्ध' लोपली आहे. विचारपरिप्लुत, तर्कसंगत, पूर्व-पक्ष-उत्तर-पक्षांच्या मांडणीनें सजलेले निबंध ही दुर्मिळ चीज झाली आहे. बरें, बाह्य सजावट, डौल, 'नखरा'–या दृष्टीनेंहि कांहीं प्रगति आहे म्हणावें तर तेंहि नाहीं–असणें शक्यच नाहीं. कारण आशय, आणि शैली यांची फारकत तुम्ही करणार कशी ? निदान व्याकरणदृष्ट्या 'शुद्ध' भाषा एवढी तरी दृष्टी ठेवून सुबोध, सरळ व शुद्ध अशा लेखनाची अपेक्षा करावी, तर तेथेंहि निराशाच. भाषेची 'सेवा' करण्याच्या उद्देशानें निघालेल्या संस्था, काम करणारे प्रचारक, आणि परीक्षेला बसणारे विद्यार्थी यांनीं प्रामाणिक विचार करायला हवा कीं, तुटपुंजें ज्ञान मिळवून व भाषेच्या शुद्धतेची व सौंदर्याची

उपेक्षा करून आपण कोणती महनीय सेवा बजावतों ? ही स्व-पर-वंचना नव्हे काय ?

एकीकडे चिपळूणकर, टिळक, आगरकर, केळकर, खाडीलकर, केतकर, वा. म. जोशी इत्यादि महाभागांचे, महाराष्ट्र शारदेच्या दरबारांतील मातबर मनाकऱ्यांचे ग्रंथ 'असूर्यंपश्या' प्रमाणें वाचनालयांत पडून राहत आहेत; आणि दुसरीकडे आमची मायबोली अमृतरसाची निर्झरिणी आहे, चिरंतनतेचा अमरपट्टा घेऊन आली आहे, असा आम्ही नगारा पिटीत आहोंत ! भाषेंतील सद्ग्रंथांचें वाचन-मनन झाल्याशिवाय त्या ग्रंथांना व भाषेलाहि लाभणारें चिरंजीवत्व काय मोलाचें व किती भरीव असणार ? ज्या वयांत वरीलसारख्या लेखकांच्या कृति, किंवा त्याच्याहि पुढें जाऊन रामायण, महाभारत, उपनिषदें इत्यादि आमच्या संस्कृतीला आधारभूत असलेल्या ग्रंथांचा परिचय करून घ्यावयाचा आणि पौरस्त्य-पाश्चिमात्य प्राचीन-अर्वाचीन विचारवंतांच्या उक्तींचा व कृतींचा आशय जाणून घ्यावयाचा, परिशीलन करावयाचें, त्या वयांत विद्यार्थ्यांनीं केवळ परीक्षांचा हव्यास धरावा, आणि 'मूळ ग्रंथ न पाहातां' बोलणारांची रामदासांनीं जी 'संभावना' केली आहे, ती स्वतःची करून घ्यावी, हें दृश्य मोठें दयनीय वाटतें, मन विषण्ण करतें !

या बाबतींत सुबुद्ध पालकांची व शाळाचालकांची कांहींच जबाबदारी नाहीं काय ? आपल्या मुलामुलींच्या परीक्षांतील यशाचें कोडकौतुक करणाऱ्या पालकांनीं आपल्या पाल्यांनीं मिळवलेल्या गुणवत्तेचा पल्ला काय आहे याचा कधीं कानोसा घ्यायला नको काय ? कीं सिनेमाला जाण्यापेक्षां कुठल्या तरी परीक्षावर्गाला आपलीं मुलें जातात, एवढें समाधान त्यांना पुरेसें वाटतें ? बाहेरच्या जगांत परीक्षांचा जांच कमी व्हावा, मनावर ताण न पडावा, मनःस्वास्थ्य व प्रकृतिस्वास्थ्य बिघडूं नये म्हणून शिक्षणतज्ज्ञ व शिक्षक मनापासून झटत आहेत. त्यांच्याशीं या बाह्य परीक्षांचें ध्येयधोरण किती विसंगत आहे ! परस्पर भिन्न मूल्यांच्या कात्रींत मुलांचीं मनें सांपडल्यानें त्यांच्या व्यक्तित्वाचा सुसंगत विकास कधींतरी होणें शक्य आहे काय ?

आपापल्या संस्थांच्या परीक्षांना सरकारी व सामाजिक मान्यता मिळवून त्यांचा बाजारभाव वाढविण्याचा प्रयत्न करणाऱ्या संस्थांनीं या

बाबतींत कांहीं करणें आवश्यक नाहीं काय? ज्याप्रमाणें विद्यापीठांची जबाबदारी केवळ परीक्षा घेण्याची नाहीं, तर अध्ययन-अध्यापनाचा दर्जा वाढविण्याची व त्याबरोबरच संशोधनाचीहि आहे, त्याप्रमाणेंच या भाषाप्रसारासाठीं बद्धपरिकर झालेल्या संस्थांनींहि परीक्षाविषयक का होईना कांहीं संशोधन कां करूं नये? भारतीय भाषा शिकण्याचे सुलभ व शास्त्रशुद्ध मार्ग सप्रयोग कां शोधूं नयेत? परीक्षांत भाषाविषयक कौशल्यें अजमावण्याच्या कांहीं वस्तुनिष्ठ कसोट्या कां निर्माण करूं नयेत? असा प्रयत्न सुरू झाल्यास सरकारकडून द्रव्यसाहाय्यहि खचित त्यांस लाभेल. आम्हांला हिन्दीचा प्रचार त्वरित करावयाचा आहे, तो भाषण-लेखनशक्तीचा खराखुरा विकास साधण्यासाठीं ना? आज महाराष्ट्रामध्यें कितीतरी अन्य भाषिक स्थायिक झाले आहेत. नोकरीनिमित्त येत आहेत. त्यांच्या मुलांना प्रादेशिक भाषा सक्तीनें शिकावी लागत आहे. पण ती सहज कशी शिकवावी याबाबत पद्धति उपलब्ध नाहींत, निदान तेथें काम करणाऱ्या शिक्षकांना अवगत नाहींत, योग्य पाठ्य-पुस्तकें नाहींत, त्यामुळें या विषयांचें अध्ययन म्हणजे एक हास्यापद थट्टा झाली आहे. या प्रश्नाकडे लक्ष देण्याची नैतिक, राष्ट्रीय जबाबदारी या संस्थांची नसेल तर मग ती कोणाची?

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 10052

# मार्गदर्शक पुस्तकांवरील अनाठायीं अनुराग

" घ्या माधवराव, हा पेढा घ्या, बडा लज्जतदार आहे. "

" कां बुवा. का खास सुरतेबिरतेचा आहे कीं काय ? "

" नाहीं हो. आहे इथलाच. पण हा आमच्या पराभवाचा पेढा आहे. " माधवराव नुसते चकित मुद्रेनें पाहात होते. आमचे प्रिन्सिपल बोलूं लागले–" ज्या विद्यार्थ्यानं हे आणले, तो सांगत होता–मागच्या वेळीं मी ' टेक्स्ट ' वाचलीं तेव्हां नापास झालों. पण या खेपेस ' गाईडस् ' वाचलीं म्हणून पास झालों. मग सांगा, हा आमचा–म्हणजे आमच्या शिक्षण-पद्धतीचा पराभव नव्हे काय ? माझं असं मत आहे–आमच्या विद्यार्थी-पिढीला ' त्रिदोषानं पछाडलं आहे. कफ-वात-पित्त-हे झाले जुने त्रिदोष. आजचे त्रिदोष म्हणजे ट्यूशन-गाईडस-रॉक-एन-रोल-संगीत ! "

आमच्या प्रिन्सिपलच्या विनोदावर मी पोट धरधरून हंसलों आणि मला एका पुस्तकविक्रेत्या मित्राची आठवण झाली. तो म्हणत असतो, ' आम्ही एक महिना पाठ्यपुस्तकें विकतों व मग वर्षभर त्यांचे ' सोबती ' खपवितों. ' एक नवी उपमा द्यावयाची म्हणजे सकाळीं दूध विकून दिवसभर ' हातभट्टी 'ची विकण्याचाच हा प्रकार ! किंवा दसऱ्याला खरेंखुरें सोनें विकून वर्षभर गिनी-गोल्डचे दागिने विकण्यासारखेंच. माझा एक प्रकाशक-मित्र नव्या पाठ्यपुस्तकांचें नेहमींच स्वागत करतो. कारण नवें पाठ्यपुस्तक म्हणजे नव्या ' मार्गदर्शका 'ला संधि ! नवा कायदा झाला म्हणजे वकिलांना जसा आनंद होतो, किंवा नव्या गटविकास योजनांमुळें कांहीं समाजसेवकांना वा अधिकाऱ्यांना जसा आल्हाद होतो म्हणतात, –कारण नवे कज्जे, नवे संपत्तीचे गुप्त झरे, यांचीं बीजें त्यांत असतात–

त्याप्रमाणेंच पाठ्यपुस्तकांचें आहे, असें हा प्रकाशक-मित्र म्हणतो. एखादा काव्यसंग्रह वा एखादी कादंबरी बाजारांत 'पडून' असते; पण तिच्यावर 'पाठ्यपुस्तक' असा शिक्कामोर्तब झाला कीं सवत्स धेनूप्रमाणें ती फलदायी ठरते. तें पुस्तक तर खपतेंच, पण त्याशिवाय दोनचार गायीडांना घेऊन व त्या लेखकाचें उखळ पांढरें करून तें नांव काढतें !

असुक एक वस्तु शाप कीं वरदान असा चर्चेला विषय घेऊन शेवटीं तें सारें उपयोग करणारावर अवलंबून आहे, असा एक चर्चेचा सांचेबंद शाळकरी प्रकार आहे. अणु-शक्ति, शस्त्रें हीं स्वतः मारक नाहींत, तारक नाहींत; योजना, उपयोग करून घेणारा ज्या मनोवृत्तीचा असेल त्याप्रमाणें होईल; 'भवति योजयितुर्वचनीयता'. पण असा निष्कर्ष काढण्याइतका हा मार्गदर्शक पुस्तकांचा प्रश्न निरागस व निरुपद्रवी नाहीं. ज्यांचा खरोखरी सदुपयोग होईल अशीं मार्गदर्शक पुस्तकें थोडीं व त्यांचा कुशलतेनें उपयोग करणारे विद्यार्थी तर त्याहून थोडे ! आज बाजारांत बुजबुजाट आहे तो 'तुरंत दान, महापुण्य' मिळवून देणाऱ्या 'वाटाड्यां'चा ! पहिलीपासून तो थेट एम्. ए. एलएल्. बी. परीक्षेपर्यंत, प्रवेशपासून विशारद, प्रवीण, पंडितपर्यंत सर्व पुस्तकांचे मार्गदर्शक ! ही या पदव्यांची थट्टा नव्हे काय ? उद्यां प्राध्यापक, वकील, शिक्षक होणारा मनुष्य जेव्हां अशा कुबड्यावर उभा राहूं इच्छितो, तेव्हां तो इतरांचें नेतृत्व काय करणार ? सारेच 'अंधेन नीयमाना अंधाः' व परप्रत्ययनेय-बुद्धि ! तान्ह्या मुलांना दूध पचत नसलें म्हणजे त्यांत पाणी घालतात. तसें हें सोपें, सुगम, गिळायला सुलभ ज्ञानाचें रांजण सर्वत्र भरलेलें आहे. त्यांची जणूं पाणपोई उघडली आहे !

'बालानां सुखबोधाय' टीका, टिप्पणी, वृत्ति नि वार्तिकें लिहिण्याची परंपरा आपल्या देशांत पुरातन-सनातन आहे हें खरें. पण एक तर हें 'भाष्य'ग्रंथ त्या योग्यतेचे असत. आणि प्रत्येक टीका केवळ अर्थाचें विशदीकरण नसे. नव्या दृष्टिकोनांतून जुन्याचा तिच्यांत विचार असे व त्यामुळें त्यांत नवीन अर्थांची भर पडे. 'इंटरप्रिटेशन' व 'रिइंटरप्रिटेशन'-करतांकरतां नवनिर्मिति घडे, आशयाची कक्षा व खोलीहि वाढविण्याची धडपड दिसे. म्हणून स्वतंत्र ग्रंथांची योग्यता या टीका-वृत्तींना आपोआप येई. त्यांचा अभ्यास हा स्वतंत्र विषय बने. केवळ परीक्षा तरून जाण्यासाठीं

भोपळे म्हणून, वरच्या वर्गांत उडी मारण्यासाठीं कुबड्या म्हणून त्यांचा उपयोग झाल्याचें ऐकिवांत नाहीं.

कॉलेजकारितां सटीप व सटीक पुस्तकांच्या आवृत्त्या नेहमींच निघतात. त्यांत मूळ संहिता ( टेक्स्ट ) पाठभेद, व स्पष्टीकरणार्थ टीपा आणि रहस्योद्घाटनहि असतें. मल्लिनाथीचेच नवीन आविष्कार—प्रा. एम्. आर. काळे, प्रा. गजेंद्रगडकर, डॉ. बेलवलकर या पूर्वींच्या पिढ्यांतील विद्वद्वरांनीं वा आधुनिक रसिक प्राध्यापकांनीं संपादिलेल्या संस्कृत काव्य-नाटकांच्या आवृत्त्या या अशा पैकीं होत. इंग्रजीसाठीं कॉलेजांत लावलेले वेंचे तर बहुतेक 'ॲनोटेटेड' असतात. त्यांची तशी गरज असते. केवळ शब्दार्थाव्यतिरिक्त ऐतिहासिक, पौराणिक वाङ्मयीन संदर्भ समजावयाला त्यांची फार मदत होते. शिवाय, अनेक रसिक टीकाकारांचे अभिप्रायहि त्यांत नमूद केलेले असतात. शेक्सपीअरच्या अनेक नाटकांच्या आवृत्त्या याच स्वरूपांत उपलब्ध आहेत. प्रा. आर. के. लागू, कु. सुलभा पाणंदीकर, प्रा. सत्तेगिरी यांनीं एकेकाळीं अशीं वेंच्यांचीं पुस्तकें संपादून शिक्षकांना उत्कृष्ट मार्गदर्शन केलें आहे, त्यांची रसिकता जोपासली आहे. अशा पुस्तकांची तुलना साखरेबुवांची टीका, सोनोपंतांची ज्ञानेश्वरी इत्यादींबरोबर केली तर शोभून दिसेल. पण हीं पुस्तकें 'पाठ्य-पुस्तकें' होतीं व त्यावरील टीकांचें स्वरूप अभ्यासाची दिशा दाखवण्याचें होतें, आयते तयार 'घांस' करून देण्याचें नव्हतें. या तोलामोलांचीं पुस्तकें कोणीकडे, आणि आज गांवगन्ना जाहिरातीप्रमाणें खपणारी 'प्रश्नोत्तरी' 'परीक्षेच्या वाटेवरचा सोबती' इत्यादि चोथापाणी चोपडी कोणीकडे ! कुठें इंद्राचा ऐरावत नि कुठें शामभट्टाची तट्टाणी ! या साऱ्यांना एका माळेंत गोंवणें म्हणजे 'श्वानं, युवानं, मघवानं' करण्या-सारखेंच नव्हे काय ?

सुतार-कामाचें गाईड, टायपिंगचें गाईड, सारंगी वाजवण्याचें गाईड, मोटार चालवण्याचें गाईड, घर बांधण्याची मार्गदर्शिका, चित्रकला-ज्योति, गणपति बनवण्याची कला—असल्या पुस्तकांचीं नांवें कुणाच्या ऐकिवांत आहेत काय ? किंवा अशीं पुस्तकें वाचून कोणी त्या त्या कलेंत प्रावीण्य संपादन केल्याचें ऐकिवांत आहे काय ? हजार 'पाक-क्रिया' वाचून गृहिणी

किती ' सुगरण ' बनतात हें ' छापील संसार ' नाटकानें लोकांना दाखविलेंच आहे. मग ' इतिहासाचा सोबती, ' ' भूगोलाचा मार्गदर्शक ' ' विज्ञानाचा वाटाड्या '—अशा पुस्तकांची भरमसाट निपज कां असावी ? यांतील फरक सकृद्दर्शनीं असा दिसतो कीं, आरंभीं उल्लेखिलेले विषय हस्तकौशल्याचे आहेत व इतिहास-भूगोलादि शालेय विषय मुखोद्गत करण्याचे, घोकंपट्टीचे आहेत. म्हणजे या विषयांची घोकंपट्टी आम्हांला हवी आहे म्हणा, किंवा परीक्षांचें स्वरूप तसें असतें म्हणून म्हणा, तें काम सुकर करून देणाऱ्या पुस्तकांना मागणी आहे, भाव आहे. पण असे घोकंपट्टीचें शिक्षण व त्यावर आधारलेल्या परीक्षा या जीवनाच्या दृष्टीनें कवडीमोलच नव्हेत काय ? ज्या ज्ञानाचा विनियोग करतां येत नसेल तें ज्ञान नव्हे, तें माहितीचें ओझें आहे, आणि परीक्षार्थी परीक्षा संपतांच डोक्यांत कोंबलेलें ज्ञान, पाण्यानें भिजलेला कुत्रा जसा अंग झाडून मोकळा होतो, त्याप्रमाणें झटकून मोकळे व ' कोरडे ' होतात हा अनुभव आहे. असें जर आहे, तर या घोकंपट्टीला हातभार लावणाऱ्या व पर्यायानें विद्यार्थ्यांना निष्क्रिय, विचारशून्य व नादान बनवणाऱ्या पुस्तकांबद्दल चीड व किळस आली, तर त्यांत कुणाला राग कां यावा ?

असें जर आहे, तर या पुस्तकांना येवढी मागणी कां ? त्यांच्याबद्दल जबरदस्त आकर्षण कां ? याचें उत्तर सोपें आहे. परीक्षेची व परीक्षा उत्तीर्ण होण्याची वाटणारी निकड. परीक्षांना, प्रशस्तिपत्रकांना, पदव्यांना आलेलें अवास्तव महत्त्व ज्ञानाची पातळी उंचावीत नसून खालीं आणीत आहे. शाळांकॉलेजांच्या परीक्षाच नव्हे तर हिंदी, संस्कृत, मराठी इत्यादि शाळाबाह्य परीक्षांहि त्याच कोटींत गेल्या आहेत. ' परीक्षांचा हव्यास ' गुणविकासासाठीं नसून प्रशस्तिपत्रकांच्या प्रलोभनानें होत आहे. त्यामुळें समाजांत आज जणूं साक्षरतेचें पेंव फुटल्यासारखें झालें आहे. सुशिक्षितपणाची समृद्धि झळकत आहे. पण बारकाईनें पाहिलें, तर सज्ञानतेनें येणारें सामर्थ्य, संस्कारितेनें येणारें सौजन्य अभावानेंच तळपत आहे. जी दिसते आहे, ती सारी फुगवट आहे, सूज आहे, गोंडस, सत्त्वशाली बाळसें नव्हे !

ज्याला ज्ञानग्रहण-व्यापाराचें मर्म माहीत आहे, तो पाठ्यपुस्तकालाच मुळीं वेगळ्या तऱ्हेनें हाताळतो. पाठ्यपुस्तकांत असतात, त्या प्रा. व्हाईटहेडच्या शब्दांत साऱ्या जड कल्पना, ' मृतज्ञान. '—( innert knowledge

dead ideas ) शिकणाराच्या व शिकवणाराच्या परस्पर क्रियाप्रतिक्रियांत त्या जिवन्त बनवावयाच्या असतात. ह्या जिवन्तपणाचा उगम असतो शिकणाऱ्यांच्या पूर्व अनुभवांत, त्याच्या विचारशक्तींत, आस्थेनें केलेल्या स्वयंशोधनांत, प्रयत्नांत म्हणजे नव्या अनुभवांत. कुशल कारागिराच्या हातांत दगड-माती जशी सजीव होतात व नवा आकार घेऊं लागतात, त्याप्रमाणेंच पुस्तकांतील विषयांचें आहे. खरा ज्ञानव्यापार हा क्रियाशील असतो, निष्क्रियतेनें केलेलें ग्रहण म्हणजे ज्ञानार्जन नव्हे. सुईनें औषध टोंचून घ्यावें, त्याचप्रमाणें गुरुमुखांतील बोल श्रवणांत घुसून मस्तकांत जाऊन बसले कीं, विद्याप्राप्ति होते, ही समजूत खुळचटपणाची आहे. ‘ श्रुत ’ आणि ‘ विद्वत्ता ’ यांचें एकेकाळीं केलेलें समीकरण आज वाच्यार्थानें खरें ठरणारें नाहीं आणि ज्या काळांत तें समीकरण झालें, त्यांत बहुश्रुततेंत स्वतंत्र विचारशक्ति नव्हती, असें म्हणणें धाडसाचें होईल. अशा स्थितींत प्रचलित अध्यापन व त्याची ‘ री ’ ओढणारी मार्गदर्शकें विद्यार्थ्यांना निष्क्रिय, निर्जीव, भारवाहक बनवीत आहेत. म्हणून त्यांचा उबग वाटला तर त्यांत अनुचित काय आहे ?

विषयावरील—विशेषतः भाषेवरील-प्रभुत्व अजमावयाचें असतें, तें ठाऊक झालेल्या ज्ञानाचा कसा कौशल्यानें उपयोग करतां येतो यावरून. कल्पनांची गुंफण, मांडणी, स्वतःचें म्हणणें, मत, विचार सडेतोडपणें, स्पष्टपणें, रेखीवपणें मांडण्याचें कौशल्य, समर्पक शब्दांचा उपयोग व चपखल दृष्टान्ताची ( म्हणजेच पर्यायानें उपोद्बलक पुराव्याची ) योजना इ. त्याच्या कसोट्या असायला हव्या. आतांच्या सदोष परीक्षा पद्धतींमुळें पाठांतराला—स्मरणाला— अवास्तव महत्त्व चढलें आहे आणि पाठ्यवस्तु मोजकी बनवून द्यायला मार्गदर्शिका हातभार लावतात असा परीक्षार्थींना विश्वास वाटून ते त्यांचा ‘ सहारा ’ घेतात व ज्ञानाच्या क्षेत्राचें ‘ सहारा वाळवंट ’ बनवितात.

मार्गदर्शक पुस्तकाबद्दल शिक्षकांना सवतीमत्सर वाटत असेल काय ? मार्गदर्शक लिहिणारे ‘ घरभेदे ’च असतात, हे शिक्षकांना काय ठाऊक नाही ? आणि शिक्षकांनीं कितीहि जळफळाट केला म्हणून मार्गदर्शक पुस्तकें वापरण्याचा विद्यार्थ्यांचा ‘ हक्क ’ कोणतें सुप्रीम कोर्ट हिरावून घेऊं शकेल ? द्विभार्या-प्रतिबंधक कायदा झाला म्हणून कांहीं तो विवाहितांना

अन्य स्त्रियांवर ( वा पुरुषांवर ) ‘ प्रेम ’ ( प्लेटॉनिक प्रेम बरं कां ! ) करायला प्रतिबंध तर करूं शकत नाहीं ? पण यांतील खरा मुद्दा आहे तो ‘ निष्ठे ’चा. द्विभार्या-प्रतिबंधक कायद्यानें ‘ गृहिणी-निष्ठा ’ शिकवितां येईल कीं नाहीं हा मुद्दा बाजूस ठेवूं या. त्यांतील तत्त्व आहे कुटुंबनिष्ठेचें. त्याचप्रमाणें विद्यार्थ्यांनीं आपल्या गुरुजनावर निष्ठा ठेवावी—नेतरेषु जनेषु—आणि विषय समजावून घेण्याची कोशिस करावी, अशी स्वाभाविकच शिक्षक—प्राध्यापकांची इच्छा असणार. मूळ ग्रंथ, लेख व त्यावर अधिकारवाणीने केलेलें विवरण बाजूस सारून जेव्हां ‘ ज्योति—प्रकाश—दीपा ’शीं हे ‘ ज्ञान-भ्रमर ’ चुंबाचुंबी ( फ्लर्टिंग ) करूं लागतात तेव्हां स्वतःचें बलिदान करण्यावाचून दुसरें काय तें साधणार ? नि चांगल्या पुस्तकांच्या साहाय्यानें अभ्यास केल्यावरहि मार्गदर्शक पुस्तकें हाळताणें म्हणजे घरांत श्रीखंडपुरीवर ताव मारल्यावर हॉटेलांत जाऊन शिळी मिसळप्लेट चिवडण्यासारखेंच नव्हे काय ?

मार्गदर्शक पुस्तकांची ही ‘ डुकर-निपज ’ किंवा चांगल्या शब्दांत ‘ टांकसाळ ’ थांबवायची असेल तर सगळ्या शिक्षणपद्धतीचा नव्यानें विचार करावा लागेल. आम्हीं कां शिकवतों, आणि कशाची परीक्षा घेऊं इच्छितों, याचा मुळाशीं जाऊन विचार करावा लागेल. सरकारनें पाठ्यपुस्तकांच्या मार्गदर्शनपर पुस्तकावर बंदी घातली आहे. तीं छापणारांचीं पाठ्यपुस्तकें मंजूर केलीं जात नाहींत. शाळेच्या आवारांत आलेलें गाईड जप्त करण्याचा मुख्याध्यापकांना अधिकार आहे म्हणतात. शाळेच्या वाचनालयांत ते दिसल्यास शाळेच्या ग्रँटवर गदा येईल असेंहि सांगण्यांत येतें. सारांश, मार्गदर्शक पुस्तकें सरकारच्या लेखी कुष्ठरोगापेक्षांहि अधिक भयानक आहेत. पण कुष्ठरोग्यांच्या संचारावर बंधनें घातल्यानें जसा त्याला आळा बसत नाहीं व त्यांचें निर्मूलन होत नाहीं; त्याप्रमाणेंच मार्गदर्शिकांच्यावर ‘ संचार-बंदी ’ लादून त्यांना नेस्तनाबूद करतां येणार नाहीं. त्यासाठीं पाठ्यपुस्तकांचा दर्जा सुधारणें, अध्ययन-अध्यापन-पद्धति बदलणें व परीक्षांचें अवास्तव बंड कमी करणें, हाच खरा राजमार्ग आहे.

म्हणून मार्गदर्शक पुस्तकांचा विजय म्हणजे सध्यांच्या शिक्षण पद्धतीचा पराभव असें जें आमच्या प्रिन्सिपलनीं म्हटलें तें मला अगदीं रास्त वाटतें.

* * *

# स्वस्ति-वाचन पुरें !

भारतीय जनता स्वातंत्र्याचा वाढदिवस दरवर्षी साजरा करते; आनंद, उत्साह आणि अभिमान यांना या दिवशीं भरतें यावें असाच हा प्रसंग असतो. लहान मुलें दुडूदुडू चालायला लागलीं कीं, आपल्याला उभें राहतां येतें हा आत्मविश्वास त्यांच्यांत आपोआप दृढ होतो. चार पावलें चालतां आलें कीं,पुढें जाण्याची आकांक्षा दुणावतच जाते. घराचा उंबरठा ओलांडला कीं, गांवाची वेसहि थिटी वाटूं लागते. केवळ मनोरथालाच 'अगति' नसते असें नव्हेतर साकार व समूर्त चैतन्ययुक्त पिंडाच्या हालचालींनाहि मर्यादा असत नाहीं. 'पंख-फुटे पांखरूं' फक्त पंख फुटायचीच वाट पाहत असतें; एकदां ते फुटूं लागले कीं, त्यांतील चैतन्य गरूडाप्रमाणें सारें गगन-मंडळ कवेंत घेण्यासाठीं धडपडूं लागतें. आणि मिळालेल्या यशाच्या आनंदानें स्फुरलेल्या ललकाऱ्यांनीं दिगंत भरून टाकतें. हाच उत्साह, हाच आत्मविश्वास, आणि हाच अभिमान भारतीयांनीं स्वातंत्र्य दिनीं प्रकट करावा हें स्वाभाविक आहे. जें मिळविलें तें राखतां येतें, याचा तो आनंद नि आत्मविश्वास आहे. आपल्याबद्दल दाखविलेला अविश्वास, व्यक्त करण्यांत आलेली भीति आपण निराधार ठरवीत आहोंत, आणि इतरांच्या विश्वासाला पात्र होत आहोंत याबद्दल तो आनंद आहे. हा उत्साह दुथडी भरून वाहायलाच हवा, तो आत्मविश्वास प्रकट व्हायलाच हवा. आणि तो स्वाभिमान उंच मान करून चमकायलाच हवा. कारण त्यांना जिवन्त ठेवण्याचा, त्यांचें जतन करण्याचा आणि त्याचें संवर्धन करण्याचा तोच मार्ग आहे.

वाढदिवसाच्या दिवशीं नवे कपडे शिवण्याचा प्रघात आहे. प्रघात गरजेंतून निर्माण होत असतो. बाळ मोठें झालेलें असतें. अंगापिंडानें वाढूं

लागलेलें असतें. हाडापेरानें तें मजबूत होत चाललें असतें. त्यानें शतायुषी बनावें, ही इच्छा सफल होत चालल्याची ती साक्ष असते आणि ती समाधानाची समृद्धि करते. आनंदांत भर घालते. पण समाधानांत नि आनंदांत एक अतृप्तीची झांक विलसतच असते. मात्र ती चिंतेची काळी कडा नसते. वात्सल्याच्या पोटीं जन्मलेली एक गोड हुरहुर, पुरुषार्थाला मिळालेलें एक प्रेममय आव्हान हें त्या अतृप्तीचें स्वरूप असतें. बालकाच्या शारीरिक गरजांबरोबर मानसिक, बौद्धिक भावनिक गरजा वाढल्या आहेत, त्याची तृप्तता करावयाची आपली जबाबदारी वाढली आहे, अशी ती सुखद, प्रेरक जाणीव आहे. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या वाढदिवशीं या नव्या गरजांची, नव्या कपड्यांची, नव्या भरणपोषणाच्या जबाबदारीची जाणीव व्हायला हवी आणि या नव्या आव्हानाचा प्रसंग जुन्या-नव्यांना सारखाच, रोमहर्षक, स्फुरणदायक आणि गौरवशाली वाटायला हवा.

गेल्या पन्नास वर्षांत फिलिपाईन्समध्यें आणि दुसऱ्या महायुद्धा-नंतरच्या काळांत जपानमध्यें लोकशाही प्रवृत्ति रुजविण्याचा उपक्रम अमेरिकेनें केला. जनमत सुबुद्ध, बहुश्रुत आणि कृतिप्रवण असणें हाच लोकशाहीचा आधार असल्यानें खेडीं, शहरें आणि राज्यें या सर्व पातळ्यां-वरून शिक्षणसंस्थांचें जाळें तेथें निर्माण करण्यांत आलें. केवळ शिक्षणसंस्थाच नव्हे, तर अन्यतऱ्हेच्या संस्थाहि. वस्त्राचा गाभा जसा उभ्या-आडव्या धाग्यांनीं विणलेला असतो आणि वस्त्राची किनार फक्त या धाग्यांनीं बनलेल्या पटाचें संरक्षण करते तद्वत् लोकशाही समाजांत विविध शैक्षणिक, सांस्कृतिक संस्था आणि सरकार यांचें कार्य आहे. खरा लोकशाहीचा गाभा, जीव या संस्थांत सामावला आहे. सरकार ही फक्त किनार आहे. त्या उभ्या आडव्या तंतूंतच जीव नसेल, तर ती किनार वस्त्राचें आयुष्य वाढवूं शकत नाहीं, तें पेहरणाराची अब्रू वाचवूं शकत नाहीं. लोकशाहीवृत्तीचें बाळकडू या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक संस्थांतून व आचार-विचारांतून मिळावें लागतें. अमेरिकन लोकशाहीचें यश या विचारसरणींत व कार्य-प्रणालींत आहे.

कुठल्याहि कार्याची, ध्येयाची सफलता आधीं ध्येयाचें व कार्याचें समग्र स्वरूप आकलन होण्यावर अवलंबून आहे. समग्र स्वरूप याचा अर्थ

केवळ त्याच्या वैचारिक स्वरुपाची ओळख नव्हे, तर आचारांतील, व्यवहारांतील त्याच्या कार्यात्मक पैलूंपैलूंचें दर्शन. स्वातंत्र्यपूर्व काळांत आमच्या शिक्षणपद्धतीला ध्येय नाहीं, असा आम्ही कंठशोष केला. स्वातंत्र्योत्तर काळांत लोकशाही समाजासाठीं कार्यक्षम नागरिक तयार करणें हें ध्येय उच्चरवानें उद्घोषित केलें जातें. पण हा लोकशाही समाजांतील नागरिक 'कसा बोले, कसा चाले' याचा तपशीलांत जाऊन आम्ही विचार केला आहे काय? त्याचीं लक्षणें निश्चित केलीं आहेत का? आणि हीं लक्षणें क्षणशः, कणशः, क्रमशः त्याच्या वृत्तींत, त्याच्या पिंडांत, त्याच्या चित्त-चंद्रांत तिळातिळानें, कलेकलेनें वृद्धिंगत होतील, असें परिसर त्याच्या-भोंवतीं निर्माण केलें आहे काय? आपलीं साधनें म्हणजेच आपली कार्य-पद्धति, अध्ययन-अध्यापन पद्धति या साध्याला पोषक आहेत, अशी किती संस्था ग्वाही देऊं शकतील?

संघटना, समाज आणि राष्ट्र म्हटलें कीं, त्याला नियमांचीं बंधनें आलींच. चार मित्रांचें मंडळ असलें तरी त्याचे कांहीं संकेत असतातच, तीच गोष्ट कुटुम्बाची, संस्थांची. लोकशाहींत व्यक्तिस्वातंत्र्य असतें. पण तो स्वैराचार नसतो. लोकशाहीचा पुरस्कर्ता राज्य नियमांवर, कायद्यावर अधिष्ठित असतें, या तत्त्वावर श्रद्धा ठेवतो. आणि म्हणून जबाबदारीची जाणीव आणि आत्मसंयमन वा स्वयंशासन या वृत्ति त्याच्यांत बाणत जातात. हाहि अनुभवाचा, शिक्षणाचाच संस्कार होय. पाश्चात्य देशांत अभ्यासविषयांना Disciplines म्हणजे शासनें वा नियमनें या नांवानें संबोधण्याची प्रथा आहे, पण मूळ विषयांत हें सामर्थ्य नसतें. ते विषय ज्या पद्धतीनें शिक्षक-विद्यार्थ्यांकडून हाताळले जातात, अभ्यासिले, चर्चिले जातात, त्याचा हा परिपाक आहे. या दिशेनें आम्ही शिक्षणपद्धतीला वळण दिलें आहे काय? शालेय, महाविद्यालयीन जीवनाची घडी पुन्हां नवी बसविली आहे काय, हा स्वतःला विचारण्याजोगा प्रश्न आहे, आणि तो विचारण्याचा हा क्षण आहे.

अमेरिकन शिक्षण-पद्धतीचें आणखी एक वैशिष्ट्य. तें केवळ शिक्षण-पद्धतीचेंच नव्हे तर त्यांच्या जीवन-पद्धतीचें व जीवननिष्ठेचेंहि तें द्योतक आहे. तें वैशिष्ट्य म्हणजे अमेरिकेचा नागरिक शाळा, शिक्षण-संस्था व शिक्षणपद्धति

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ........ वि:
नों. दि:

आपली आहे असें मानतो. शाळा हें समाजजीवनाचें केंद्र अशी त्याची विचार-सरणी आहे. आणि समाज हें शिक्षणाचें केंद्र. परस्परांत अनुभवाची देवघेव आहे. आदान-प्रदान आहे. त्यामुळें शिक्षण समाज-जीवनापासून दूर जात नाहीं, समाज शाळेला विसरूं शकत नाहीं. गांवांतील लोक अधिक शिक्षणासाठीं शाळेंत जातात. शाळेच्या वाचनालयाचा, नाट्यगृहाचा, क्रीडांगणाचा व उद्योगा-लयाचा फायदा घेतात. शाळेच्या अडीअडचणींचा विचार करतात. यथाशक्ति हातभार लावतात. आमच्याकडे म्हणे कुठली तरी एक सार्वजनिक संस्था कुठल्याशा शाळागृहाचा वापर करीत होती. कांहीं पायापुरतें पाहणारे जीव विव्हळूं लागले, ‘ त्यांच्या बापजाद्याची का ही दौलत ? ’ अमेरिकन नागरिक हक्कानें मानतो कीं, माझ्या स्वतःच्या, माझ्या वाडवडिलांच्या मिळकतींतून, निढळाच्या घामांतून ती संस्था उभी राहिली आहे, तिच्यावर माझा हक्क आहे. नागरिकांचीही ये जा व पाय-रव आपुलकीला पोषक ठरतो. शिक्षणाचें महत्त्व कळल्यावांचून हा आपुलकीचा उमाळा येणार नाहीं. आमच्यांत ही पोटतिडिक आहे काय, कीं ती आमची आस्था दिखाऊ आहे, याचा विचार करण्याची आणि त्याबाबतींतली जबाबदारी आनंदानें उचलण्याची ही घडी आहे.

शिक्षणाची पातळी हा आजकाल एक वादाचा विषय होऊन बसला आहे. कोणी ती उतरत आहे म्हणून खिन्न आहे तर कोणी संख्यात्मक वाढीनें संतोष मानून तिचें समर्थन करूं पाहत आहेत. समाजांतील ज्ञानप्रसार वाढतां असणें हा जसा लोकशाहीच्या स्थैर्याचा पोषक भाग, त्याच बरोबर त्या ज्ञानाची उच्च पातळी राखणें हाहि महत्त्वाचा भाग आहे. लोकशाही म्हणजे बहुमताचें राज्य खरें. पण तें मत सुबुद्ध हवें, संस्कारयुक्त हवें, डोळस हवें आणि म्हणून ज्ञानाची, शिक्षणाची पातळी खालावणें हाहि लोकशाहीला धोकाच आहे. समाजांतील व्यासंगी लोकांचें प्रमाण कमी होणें याचा अर्थ भूतकाळांचा वारसा गमावणें आणि भविष्यकाळांत उपाशी राहणें. लोकशाहींत जर बहुजन समाजाच्या कल्याणाची, सुखाची, मुक्तेचीं स्वप्नें आपण रंगवीत असूं तर तीं स्वप्नें साकार करणारे हात, डोळे शिक्षणांतून तयार व्हायला पाहिजेत. लोकांच्या वाढत्या आकांक्षा विज्ञानाच्या जोरावर हींच कुशल मनें तृप्त करतील. हें एक लोकाराधनेंचेंच व्रत आहे आणि त्यांत मानवीय व नैतिक

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें
दा. क्र. १०८५२

दृष्टि आहे. पूर्वी राजे लोक स्वतःच्या संतोषासाठीं विद्वानांना आश्रय देत. पण लोकशाहींत लोकांच्या उद्धारासाठीं विद्येला लोकाश्रय मिळायला हवा आणि लोकाश्रयानें विद्या पुढें जाईल तरच तिचें स्वातंत्र्य व पावित्र्य टिकण्याची शक्यता आहे. प्रत्येक शाळेंत आणि कॉलेजांत बुद्धिमान मुलें निवडून त्यांची प्रगति वेगानें होईल, अशी तरतूद लोकशाही राष्ट्रें कटाक्षानें करतात, त्याचें इंगित आम्ही ओळखावयास नको काय ?

*　　*　　*

प्रतिवर्षीप्रमाणें स्वातंत्र्यदिनाचा सोहळा यथासांग ( म्हणजे वरून सांगितलें जाईल तसा ? ) यंदांहि पार पडेल. विद्यार्थ्यांच्या मिरवणूका निघतील, सैन्याचें संचलन होईल. ' तिरंगी प्यारा ' डोलानें फडकत राहील. वक्त्यांची भाषणें होतील आणि बुभुक्षितांच्या भुका शमतील. तें सर्व जरूर व्हावें. पण या वर्धापनदिनानें वाढलेली जबाबदारी सर्वांना कळावी. या ' बरसगांठी ' नें ' हृदयांतील संशयग्रंथी ' छिन्नभिन्न व्हावी. केवळ ' सुजला-सुफला ' वर्णनानें धरणी सस्यश्यामला होत नाहीं. ' सर्वेऽपि सुखिनः सन्तु ' या मंत्रजपानें दारिद्र्य दैन्यावर जय मिळत नाहीं. कामना म्हणजे साधना नव्हे. उचंबळलेल्या भावनांना कृतिद्वारा वाट न मिळाली तर मनुष्य भावविवश, स्वप्नाळू बनतो, आणि म्हणून या ' स्वातंत्र्य-बटू ' च्या स्वस्तिवाचनाच्यावेळीं तें स्वस्ति, तें कल्याण कसें साधावयाचें याची रूपरेषा आंखून त्या दिशेनें पाऊल पडायला हवें. स्वस्तिवाचन तर आठ वर्षें चालूंच आहे. आतां प्रत्यक्ष ' उपनयनाची ' घटका आली आहे.

REFBK-0010852

मराठी ग्रंथ संग्रहालय
वि: ..........
अनुक्रम .......... नों: दि: ..........
क्रमांक ..........



**प्रिं. ग. वि. अकोलकर** हे मराठी शिक्षण - क्षेत्रांत सुपरिचित आहेतच. शिक्षण-शास्त्र, मानसशास्त्र व अध्यापनकला यांतील त्यांचा गाढ व्यासंग व अधिकार यांचा प्रत्यय सर्वांना आलेला आहे. तत्त्वचिंतन आणि काव्यात्मवृत्ति, पांडित्य आणि रसिकता यांचा मनोहर मिलाफ त्यांच्या केवळ लेखनांतच नव्हे तर शालेय संचालनांतहि दिसून येतो.

शास्त्रीय सिद्धान्तांच्या आविष्काराबरोबर त्यांचें उपयोजनहि प्रिं. अकोलकर कलावंताच्या भूमिकेवरून करतात हा त्यांचा विशेष होय. मराठीच्या अध्यापनांत, शालेय व्यवस्थेंत व नव-शिक्षणांतील प्रवाह–प्रवृत्तींची ओळख करून देण्यांत ह्या विशेषाचा प्रत्यय जाणवतोच. पण ' मादाम मेरी क्यूरी ' आणि ' अमृत-तुषार ' या लालित्याच्या सीमारेषेवर रेंगाळणाऱ्या कृतींतूनहि त्यांच्या स्वतंत्र प्रतिभेचीहि साक्ष पटते.

लोकशाही मूल्यांचा आग्रह नव्हे, पण निष्ठापूर्वक पुरस्कार, नव्या पिढीबद्दल आत्मीयता व शिक्षण- व्यवसायावर नितांत श्रद्धा हीं प्रिं. अकोलकरांचीं दुसरीं वैशिष्ट्यें. शिक्षण-क्षेत्रांतील कांहीं प्रसंग व समस्या त्यांनीं खेळकर दृष्टीनें व मार्मिकपणें टिपल्या आहेत. या प्रसंगांचें व समस्यांचें दर्शन ' नवीं क्षितिजें नवी दृष्टि ' घडवीत आहे.